दैनिक
अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ७ वे I पाने ८ I मुल्य रू. ४.०० I अंक ३०० I गुरुवार १३ ऑगस्ट २०२६
I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com

## धीरज परदेशी खुनातील आरोपीचे घर पाडण्यास हायकोर्टाची स्थगिती

**अहिल्यानगर :** धीरज परदेशी खून प्रकरणात आरोपी राहत असलेल्या मिळकत क्रमांक २५१७ मधील घराच्या बांधकामावर नागरदेवळे ग्रामपंचायतकडून प्रस्तावित कारवाईच्या नोटीसला मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने मंगळवारी स्थगिती दिली आहे.

याचिकाकर्ते याकूबमिया मिरतपटेल सय्यद यांच्या वतीने ॲड. अनघा पेडगावकर यांनी ही याचिका दाखल केली होती. त्यावर पुढील आदेश येईपर्यंत याचिकाकर्त्याच्या संबंधित मिळकतीवर पाडकामासारखी कोणतीही सक्तीची कारवाई करू नये, असे आदेश न्यायालयाने देण्याचे ॲड. पेडगावकर यांनी सांगितले.ग्रामपंचायत कार्यालय, नगरदेवळे यांनी ७ ऑगस्ट रोजी संबंधित मिळकतधारकाला नोटीस बजावली होती. यात अनाधिकृत बांधकाम, अतिक्रमण झाल्याचे नमूद करून महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ च्या कलम ५३ अन्वये बांधकाम काढून टाकण्याची कारवाई करण्याचा इशारा दिला होता. या प्रस्तावित कारवाईविरोधात सय्यद यांनी (पान ४ वर)

# महाराष्ट्रात १ कोटी ८० लाख मतदार अपात्र ?

## गणना प्रपत्रे जमा करण्याचे निवडणूक आयुक्तांचे आवाहन

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**मुंबई : राज्यात मतदार यांद्याच्या विशेष सखोल फेरतपासणी (एसआयआर) मोहिमेअंतर्गत घरोघरी जाऊन गणना पत्रे भरून घेण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून सुमारे १८.४६ टक्के म्हणजेच एक कोटी, ८० लाख, ६० हजार मतदारांनी गणना प्रपत्रे जमा केलेली नाहीत. त्यामुळे हे मतदार मतदार यादीतून वगळले जाण्याची शक्यता वर्तविली जात आहे. या मतदारांची यादी जिल्हा स्तरावर जाहीर केली जाणार असून त्यांनी त्वरित गणना प्रपत्रे भरुन द्यावीत, असे आवाहन मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी बुधवारी केले.**



राज्यातील एकूण ९ कोटी ७८ लाख ५४ हजार मतदारांपैकी ९९ टक्के म्हणजेच ९ कोटी ६९ लाख ९८ हजार मतदारांपर्यंत गणन प्रपत्र वाटप करण्यात आले आहे. यापैकी ७ कोटी ६० लाख ९८ हजार(७७.७७टक्के) मतदारांकडून स्वाक्षरीसह प्राप्त झालेल्या गणना प्रपत्रांचे डिजिटायझेशन पूर्ण झाले असून १८.४६ टक्के मतदारांनी गणना प्रपत्र जमा केलेली नाहीत. तर ३६ लाख ९५ हजार मतदारांच्या गणना प्रपत्रावर कार्यवाही सुरु आहे. ज्या १८.४६ टक्के मतदारांचे गणना प्रपत्र जमा झालेले नाही त्यामध्ये प्रामुख्याने गैरहजर, स्थलांतरित, मृत आणि दुबार मतदारांचा सामावेश आहे. विशेषतः मुंबई, ठाणे, नागपूर, पालघर, रायगड या जिल्हयात गणना प्रपत्र जमा न करणाऱ्या मतदारांची संख्या अधिक असल्याची माहितीही चोकलिंगम यांनी पत्रकार परिषदेत दिली.

मुंबई शहर आणि मुंबई उपनगर या दोन्ही जिल्ह्यांचा विचार करता आतापर्यंत ६३ टक्के गणना प्रपत्रांचे डिजिटायझेशन पूर्ण झाले आहे. सुमारे ३० टक्के गणना प्रपत्र मतदारांनी दिलेली नसून ७ टक्के प्रकरणांची प्रक्रिया सुरू आहे. ठाण्यातही स्थलांतरित मतदार अधिक असल्याने मतदान नोंदणी अधिकारी( बीएलओ) यांना मतदारांर्यंत पोहचण्यात अडचणी येत आहेत. महानगर क्षेत्रांमध्ये स्थलांतरित लोकसंख्येमुळे अशा प्रकरणांचे प्रमाण तुलनेने अधिक असल्याचेही मुख्य निवडणूक अधिकारी यांनी सांगितले.

सध्याची प्रक्रिया १७ ऑगस्टपर्यंच चालणार असून ज्या मतदारांकडून गणना प्रपत्र मिळालेले नाहीत त्यांची यादी सबंधित जिल्हाधिकाऱ्यांच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येणार असून राजकीय पक्षांनाही उपलब्ध करुन दिली (पान ४ वर)

### दुबार नाव असल्यास एका ठिकाणची नोंद रद्द

**एखाद्या मतदाराला एकापेक्षा अधिक ठिकाणी गणना पत्र प्राप्त झाले असल्यास एका ठिकाणची नोंद नाकारावी. एकापेक्षा अधिक ठिकाणी नाव असणे कायद्यानुसार कारवाईस पात्र ठरू शकते. निवडणूक यंत्रणेकडून छायाचित्रावर आधारित समान नोंदींची तपासणी केली जात असली तरी नागरिकांनीही आपले नाव दोन ठिकाणी नोंदलेले नाही याची खात्री करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.**



# शिरूरजवळ चार वाहनांचा भीषण अपघात

### वाडेगव्हाणचे उद्योजक किशोर यादव व दुचाकी स्वार प्रथमेश लाड जागीच ठार

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**सुपा :** पुणे-अहिल्यानगर महामार्गावर शिरूर बायपासजवळ मंगळवारी (दि. ११ ऑगस्ट) सायंकाळी कंटेनर, कार, दुचाकी आणि बस अशा चार वाहनांचा भीषण अपघात झाला. या दुर्घटनेत दोन जणांचा जागीच मृत्यू झाला. मृतांमध्ये वाडेगव्हाण (ता. पारनेर) येथील उद्योजक किशोर नामदेव यादव (वय ३८) आणि दुचाकीस्वार प्रथमेश प्रकाश लाड (वय ३०) यांचा समावेश आहे. या अपघाताचा व्हिडीओ समोर आला आहे. किशोर यादव यांच्या निधनाने वाडेगव्हाण गावावर शोककळा पसरली आहे.

पोलिसांकडून समजलेली सविस्तर माहिती अशी की, किशोर यादव हे त्यांच्या एन्डेवर कारने (एमएच १२ एसयू ५५८९) शिरूर येथे कामानिमित्त आले होते. काम आटोपल्यानंतर मित्रांना भेटून ते वाडेगव्हाणकडे जाण्यासाठी पुणे-अहिल्यानगर मार्गावरून हॉटेल संग्रामसमोर यू-टर्न घेत होते. त्याचवेळी रस्ता दुभाजकाजवळ प्रथमेश लाड हे दुचाकीसह (एमएच १० डीयू ५०५२) थांबले होते. एन्डेवरचा वेग कमी होत असतानाच मागून भरधाव आलेल्या कंटेनरने एन्डेवरला जोरदार धडक दिली. त्यामुळे एन्डेवर दुचाकीवर आदळून दुचाकीसह विरुद्ध बाजूला गेली.

याचवेळी छत्रपती संभाजीनगरकडे जाणाऱ्या पुणे-संभाजीनगर शिवाई बसने (एमएच ४९ बीझेड ८०६०) एन्डेवर आणि दुचाकीला जोरदार धडक दिली. या भीषण धडकेत एन्डेवरच्या पुढील भागाचा चक्काचूर झाला. किशोर यादव यांचा कारमध्येच मृत्यू झाला, तर एन्डेवर आणि बसच्या मध्ये चिरडल्याने प्रथमेश लाड यांचाही जागीच मृत्यू झाला.

अपघातानंतर काही वेळातच दोन-तीन वाहने एकमेकांवर आदळल्याने मोठा आवाज झाला. त्यामुळे परिसरात (पान ४ वर)

## महत्त्वाचे..

### पेपरफुटीवर नियंत्रणासाठी राज्यात उच्चस्तरीय समिती

**मुंबई :** सीईटी, नीटसह विविध स्पर्धा व प्रवेश परीक्षांच्या पेपरफुटीला आळा घालण्यासाठी राज्य सरकारने परीक्षा पद्धती अधिक सुरक्षित, पारदर्शक आणि सर्वसमावेशक करण्याच्या दृष्टीने उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे.

सामान्य प्रशासन विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव व्ही. राधा यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती काम करणार असून, पोलीस महासंचालक सदानंद दाते, माहिती-तंत्रज्ञान विभागाचे सचिव वीरेंद्र सिंग, पशुसंवर्धन विभागाचे सचिव डॉ. एन. रामास्वामी आणि नाशिक विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांचा समितीत समावेश आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी या समितीची घोषणा केली. सूचना व अडचणी जाणून घ्याव्यात आणि त्याआधारे राज्यासाठी समग्र परीक्षा सुधारणा धोरणाचा अहवाल सादर करावा, असे निर्देश देण्यात आले.

# १२० हून अधिक आरोपींच्या मुसक्या आवळल्या

## उत्तर नगर जिल्ह्यात पोलिसांचे 'ऑपरेशन ऑल आऊट'

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी श्रीरामपूर विभागातील पोलिसांनी मंगळवारी दिवसभर राबविलेल्या 'ऑल आऊट ऑपरेशन'ला मोठे यश मिळाले. फरार व पाहिजे आरोपी, वॉरंटमधील आरोपी, अवैध शस्त्र बाळगणारे, दारू-जुगार-मटका व्यावसायिक तसेच वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर पोलिसांनी एकाचवेळी धडक कारवाई केली. या कारवाईत १२०हून अधिक आरोपींना अटक करण्यात आली, अशी माहिती अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांनी दिली.

श्रीरामपूर विभागातील १७ पोलीस ठाण्यांच्या हद्दीत सकाळपासून रात्रीपर्यंत हे विशेष अभियान राबविण्यात आले. अनेक वर्षांपासून फरार, नजरेआड व पाहिजे असलेल्या ९२ आरोपींना जेरबंद करण्यात आले. त्याचबरोबर न्यायालयात हजर न राहणाऱ्या आरोपींविरुद्धही पोलिसांनी विशेष मोहीम उघडली. ९०० अजामीनपात्र वॉरंटची बजावणी करून आरोपींना अटक करत न्यायालयासमोर हजर करण्यात आले, तर ९४६ जामीनपात्र वॉरंटची बजावणी करण्यात आली. विविध प्रलंबित प्रकरणांतील ३३८ समन्सचीही बजावणी करण्यात आली. (पान ४ वर)



■ गुन्हेगारांवर वचक निर्माण करण्याबरोबरच प्रलंबित वॉरंटची बजावणी, फरार आरोपींचा शोध, अवैध शस्त्रे, दारू, जुगार, अमली पदार्थ आणि चोरीच्या वाहनांच्या व्यवहारांवर कारवाई करण्यासाठी ऑल आऊट ऑपरेशन राबविण्यात आले. पुढील काळातही अशा स्वरूपाच्या कारवाया सुरू राहतील **- सोमनाथ वाघचौरे, अपर पोलीस अधीक्षक**

### भंगार दुकानांत संशयास्पद वाहनांचा खच

श्रीरामपूर शहरातील बेकायदेशीर भंगार दुकानांवर पोलिसांनी विशेष लक्ष केंद्रित केले. चोरीच्या दुचाकी-चारचाकी वाहने व त्यांचे पार्ट्स भंगारात विकले जात असल्याच्या संशयावरून केलेल्या तपासणीत मोठ्या प्रमाणावर संशयास्पद वाहने व वाहनांचे सुटे भाग आढळून आले.

### ४ किलो गांजा; ५.६० लाखांचा मुद्देमाल जप्त

श्रीरामपूर शहरातील उपाध्ये मळा परिसरात पोलिसांनी कारवाई करत विक्रीच्या उद्देशाने ठेवलेला सुमारे ४ किलो गांजा जप्त केला. या कारवाईत कारसह सुमारे ५ लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून, संबंधित आरोपींविरुद्ध एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# उसापासून इथेनॉल निर्मितीवर निर्बंध?

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

### साखरेचे भाव नियंत्रणासाठी उत्पादन वाढविणार

**पुणे :** देशात साखरेचे भाव विक्रमी पातळीवर पोहोचले आहेत. त्यातच कमी पावसामुळे यंदा उसाचे उत्पादन घटण्याची शक्यता आहे. त्यामुळे साखरेचे उत्पादन वाढविण्यासाठी सरकारकडून उसापासून इथेनॉल निर्मितीवर निर्बंध आणण्याचा विचार सुरू असल्याची माहिती वरिष्ठ सरकारी अधिकारी आणि साखर कारखान्यांच्या सूत्रांनी दिली.

सप्टेंबरमध्ये संपणाऱ्या चालू हंगामात कारखान्यांनी एकूण साखर उत्पादनाच्या १० टक्के म्हणजेच ३० लाख टन साखर इथेनॉल निर्मितीसाठी वळवली आहे.

मात्र यंदा प्रमुख ऊस उत्पादक राज्यांमध्ये कमी पावसाचा ऊस पिकाला फटका बसत आहे. महाराष्ट्र आणि कर्नाटकात ऊस उत्पादन घटण्याची शक्यता आहे. त्यामुळे ऑक्टोबरपासून सुरू होणाऱ्या नव्या गाळप हंगामात इथेनॉल निर्मितीसाठी उसाचा वापर कमी करून साखरेचे उत्पादन वाढविण्याचा सरकारचा विचार आहे.देशात साखरेचा भाव मागील दोन महिन्यांमध्ये १० टक्क्यांनी वाढून विक्रमी पातळीवर पोहोचला आहे.

साखरेचा वाढलेला भाव पुढील तीन महिने टिकून राहण्याची शक्यता आहे. या काळात साखरेचा पुरवठा कमी राहून सणांमुळे मागणी वाढणार आहे. याचा आधार साखरेच्या भावाला असणार आहे.या क्षेत्रातील जाणकारांच्या माहितीनुसार, सरकार यंदा जास्त साखरेचे प्रमाण असलेल्या उसाचा रस आणि बी-हेवी(पान ४ वर)

# ट्रक-दुचाकीचा भीषण अपघातात दुचाकीस्वाराचा जागीच दुर्दैवी मृत्यू

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**कोपरगाव :** शहरालगत असलेल्या साई कॉर्नर येथे ट्रक आणि दुचाकीचा भीषण अपघात होऊन दुचाकीस्वाराचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना आज बुधवार, १२ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी सुमारे ३ वाजेच्या सुमारास घडली.

या अपघातात अशोक तुकाराम भवार र (रा. शिंगवे, ता. कोपरगाव) यांचा जागीच मृत्यू झाला. मिळालेल्या माहितीनुसार, भवर हे मुलाच्या महाविद्यालयीन कामासाठी कोपरगाव येथे आले होते. महाविद्यालयीन काम आटोपून ते घरी शिंगवे येथे जात असताना हा भीषण अपघात झाला.

अपघातानंतर ट्रक चालक घटनास्थळावरून फरार झाला आहे. घटनेची माहिती मिळताच कोपरगाव शहर पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून पोलिसांकडून पुढील कार्यवाही सुरू आहे.

या अपघातामुळे साई कॉर्नर परिसरात मोठी वाहतूक कोंडी झाली. काही काळ वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.

दरम्यान, मृतदेह अमित खोकले यांच्या रुग्णवाहिकेतून शवविच्छेदनासाठी ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आला आहे.फरार ट्रक चालकाचा शोध घेण्यासह अपघाताचा पुढील तपास कोपरगाव शहर पोलीस करत आहेत.दरम्यान यावेळी संतप्त नागरिकानी काही काळ महामार्ग अडवत संताप व्यक्त केला आहे पोलीस शहर पोलिसांनी घटनास्थळी येत नागरिकांची समजूत काढत वाहतूक सुरळीत करण्याचा प्रयत्न करत होते.



# चिडलेल्या जावयाने सासुरवाडीचे घर सुरुंग लावून उडवले

## बंद घरातून कानठळ्या बसवणारा स्फोट; वडील-मुलीचा जागीच मृत्यू, पाच जण गंभीर

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** सकाळची वेळ... अचानक एका बंद घरातून कानठळ्या बसवणारा मोठा स्फोट झाला. आवाजाने आसपासची घरे अक्षरशः हादरली. हवेत धुळीचे लोट पसरले आणि परिसरात आरडाओरड सुरू झाली. नेमके काय झाले, याचा अंदाज येण्याआधीच नागरिक घटनास्थळी धावले. मात्र, घराजवळ पोहोचताच उद्ध्वस्त झालेल्या घराचे दृश्य पाहून उपस्थितांच्या काळजाचा ठोका चुकला. हा सिलिंडरचा स्फोट नव्हता... घरगुती वादातून आणलेल्या स्फोटकांनी एका कुटुंबाचे आयुष्यच उद्ध्वस्त केले होते.

कर्नाटकातील कलबुरगी जिल्ह्यात ही थरारक घटना घडली. पुण्यातील दगडखाणीत काम करणारा ४९ वर्षीय शिवलाल बळीराम राठोड याचे पत्नी सवितासोबत काही दिवसांपासून वाद सुरू होते. सततच्या भांडणांना कंटाळून सविता आपल्या १५ वर्षांच्या मुलगी वीरा आणि १९ वर्षांच्या मुलगा प्रकाश यांना घेऊन नातेवाईकांकडे निघून गेली होती.



पत्नी आणि मुलांनी घर सोडल्याचा राग मनात धरून शिवलाल मंगळवारी सकाळी नातेवाईकांच्या घरी पोहोचला. दगडखाणीत कामाचा अनुभव असल्याने स्फोटकांची त्याला माहिती होती. त्याने पुण्याहून स्फोटके सोबत आणल्याचे सांगितले जाते. घरात पुन्हा वाद सुरू झाला आणि काही क्षणांतच परिस्थितीने भयावह वळण घेतले.

शिवलालने घराचा दरवाजा आतून बंद केला. घरात पत्नी, मुलगी, मुलगा आणि नातेवाईक असतानाच त्याने कमरेला बांधलेल्या स्फोटकांचा स्फोट घडवून आणला. एका क्षणात घर हादरले आणि होत्याचे नव्हते झाले. या भीषण स्फोटात शिवलाल आणि त्याची १५ वर्षीय मुलगी वीरा यांचा जागीच मृत्यू झाला. स्फोटाच्या तीव्रतेने घराच्या भिंती कोसळल्या. शिवलालची पत्नी सविता, मुलगा प्रकाश, नातेवाईक सुरेखा चव्हाण, तिचा १२ वर्षीय मुलगा विवेक आणि नितेश हे गंभीर जखमी झाले. उडालेल्या दगडांमुळे शेजारील दोन नागरिकांनाही किरकोळ दुखापत झाली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. सर्व जखमींवर कलबुरगी जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पुण्याच्या दगडखाणीत वापरली जाणारी स्फोटके शिवलालपर्यंत कशी पोहोचली? ती पुण्याहून कर्नाटकात कशी आणली गेली? या स्फोटामागे नेमकी कोणती पार्श्वभूमी होती? या सर्व प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी पोलिसांनी तपास सुरू केला आहे.एका घरगुती वादाने सुरू झालेल्या संघर्षाचा शेवट स्फोटात झाला आणि एका १५ वर्षांच्या मुलीला निष्पापपणे जीव गमवावा लागला. परिसरात मात्र अजूनही त्या स्फोटाच्या आवाजाची दहशत कायम आहे.

# लोकशाहीचा तांडा चालला झुंडशाहिकडे...

'उच्चपदी थोरही बिघडे' असे म्हटले जाते. याची प्रचिती सध्या येत आहे. राजकीय पक्षांचे नेते एकमेकांवर एकदम खालच्या पातळीवर आरोप–प्रत्यारोप करीत आहेत. चिखलफेक आणि चरित्रहनन करीत आहेत.यातून आपल्या राजकारणाची पातळी किती खालीवली आहे, हेच दिसते. या महाभागांमुळे राजकारण व समाजकारणातल्या पुढच्या पिढीला काय दिशा व शिकवण मिळत आहे, हा देशाच्या समाजजीवनासाठी चिंतेचा विषय आहे.

उच्चपदस्थ नेत्यांमध्ये सध्या वाक्युद्ध पेटले आहे. त्याकडे दुर्लक्ष करणे आवश्यक असताना प्रसिद्धी माध्यमे, विशेषतः दृश्य वाहिन्या त्यांना व्यापक प्रसिद्धी देत आहेत. फुकटाची प्रसिद्धी मिळत असल्याने, या महाभागांची 'आधीच मर्कट, त्यात मद्य प्याला' अशी स्थिती होत आहे. 'टी.आर.पी.' वाढविण्याच्या नादात, देशाच्या लोकशाहीचा 'टी.आर.पी.' रसातळाला जात आहे. त्यामुळे प्रसार माध्यमांनी अशा विकृतीला थारा देता कामा नये. त्याचप्रमाणे लोकांनीही असले विदूषकी चाळे खपवून घेतले जाणार नाहीत, असे या महाभागांना ठणकावून सांगण्याची आवश्यकता आहे.

भास्कर खंडागळे
अतिथी संपादक
संपर्क : 9890845551

संसद, विधानसभा हि लोकशाहीची व्यासपीठे आहेत. ह्या सर्वोच्च सदनाला जवाहरलाल नेहरू, लालबहाद्दूर शास्त्री, अटलबिहारी वाजपेयी,यशवंततराव चव्हाण,मधू लिमये, नाथ पै, गोविंदवल्लभ पंत, मधू दंडवते, शरद पवार अशा सुसंस्कृत नेत्याची परंपरा आहे.हे नेते एकमेकांचे विरोधक असत. पण, विरोध हा एकमेकांचा सन्मान राखून असायचा. मानमर्यादा सांभाळली जायची. आज मात्र सगळी संसदिय वीण उसवली आहे. विरोधक म्हणजे शत्रू इतकेच नाही तर देशद्रोही ठरविण्यापर्यंत मजल गेली आहे. हे लोकशाहीचे अवमूल्यन आहे.

लोकशाहीत संवादाला अन ण्यसाधारण महत्व आहे. तसेच एकमेकांचा यथोचित मानसन्मान राखणे हा लोकशाहीचा आत्मा आहे. यशवंततराव चव्हाण म्हणायचे ''मला विरोधक हा शब्दच मान्य नाही. कारण विरोधक असले तरी ते लोकप्रतिनिधी आहेत. त्यांचा सन्मान हा त्यांना निवडून देणाऱ्या जनतेचा असतो.''असेच मत जवाहरलाल नेहरू,लाल बहाद्दूर शास्त्री,अटलबिहारी वाजपेयी यांचेही होते.ती उदात्त लोकशाही कुठेतरी हरपली असून तीची वाटचाल झूडशाहिकडे होत आहे.

खरे तर सार्वजनिक जीवन आणि खाजगी जीवन यांचा परस्पर संबंध जोडण्याचे कारण नाही. राजकीय व सार्वजनिक क्षेत्राचे निकष अत्यंत वेगळे असतात. सार्वजनिक जीवनात काम करणाऱ्यांवर सामाजिक बंधने असतात आणि ती पाळणे बंधनकारक असते. सामाजिक बंधनात नीतिमत्ता, सुसंस्कृतपणा, सभ्यता, चारित्र्य आणि सामाजिक बांधिलकी समाविष्ट असते. अशा व्यक्तींकडून म. गांधी म्हणतात त्याप्रमाणे 'समाजाचे विश्वस्त' अशी भूमिका अपेक्षित असते.

आपल्या सार्वजनिक क्षेत्राचे सध्याचे चित्र याच्या अगदी उलटे आहे. भ्रष्टाचाराचे सरळ सरळ उदात्तीकरण होत आहे. राजकीय पक्षांचे प्रवक्ते निर्लज्जपणे भ्रष्ट नेत्यांची भाटगिरी करताना दिसतात. सुसंस्कृतपणा व सभ्यता तर नावालाही उरलेली नाही. लोकशाहीत बोलण्याचे स्वातंत्र्य आहे, याचा अर्थ स्वैराचाराला मुभा दिलेली नाही. अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली सरळसरळ स्वैराचार बोकाळला आहे.

ज्यांच्याकडून समाजाचे विश्वस्त अशी भूमिका अपेक्षित आहे, ते समाजाचा विध्वंस करायला निघाले आहेत. अशा विध्वंसाला माध्यमेही भान व जबाबदारी विसरून अमाप प्रसिद्धी देऊन उत्तेजन देत आहेत. त्यामुळे 'प्रसिद्धीसाठी वाट्टेल ते' अशी वृत्ती वाढत आहे. अशा विकृत प्रवृत्तीची वाढ देशाच्या समाजजीवनासाठी कर्करोग ठरणार आहे.

राजकीय क्षेत्रात खरे तर धोरण, विकास, अर्थकारण, सामाजिक प्रश्न, परराष्ट्र नीती, रोजगार निर्मिती, भवितव्याच्या उपाययोजना यावर भाष्य व चर्चा अपेक्षित असते. याउलट सध्या अमेरिकेच्या अध्यक्षपदासाठीचा निवडणूक प्रचार सुरू आहे, त्यातून आपल्या राजकारण्यांनी आणि जनतेनेही बरेच शिकण्यासारखे आहे. अमेरिकेत परस्पर विरोधी उमेदवार एकमेकांशी हस्तांदोलन करून, समोरासमोर धोरणांवर आणि विकासावर काय करणार यावर हस्तलाघव व तितक्याच गंभीरपणे चर्चा करतात. याउलट आपले महाभाग एकमेकांवर हात उगारतात! आपल्याकडे राजकीय प्रचारात एकमेकांचे उणेदुणे काढणे, चारित्र्यहनन करणे, शिवराळपणे भाषणे करणे, आरोप–प्रत्यारोपांची चिखलफेक करणे, लज्जा उत्पन्न होईल असे हावभाव करणे, एकमेकांच्या नकला करणे, विदूषकी चाळे करणे, अश्लील विनोद करणे, एकमेकांच्या आई–बापांचा उद्धार करणे, इतकेच नव्हे तर शारीरिक व्यंगावर टिका टिप्पणी करणे, असे घाणेरडे प्रकार चालतात आणि खपवून घेतले जातात. कोणाला प्रेसीसवर भाष्य करून 'लघुरुग' पदवी बहाल केली जाते, कोणाच्या पत्नीचा शोध लावला जातोय, कोणाला 'बुद्धू' किंवा 'माकड' अशी शेलकी विशेषणे लावली जातात. आपल्या लोकशाहीचा विकास इथपर्यंत येऊन पोहोचला आहे!

लोकशाहीचं असं अवमूल्यान , अधःपतन होण्यास लोकप्रतिनिधी,जनता आणि माध्यमे जबाबदार आहेत. आपण या महाभागांचा वायफळपणा, भंपकपणा मुकाटपणे बघतो. त्याला लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेली माध्यमेही खतपाणी घालतात. लोकशाहीमध्ये फक्त मत देणे एवढेच लोकांचे आणि प्रसिद्धी देणे इतकंच माध्यमांचे काम नसते. लोकशाही समृद्ध करणे आणि त्यासाठी लोकशाही व्यवस्थेवर म्हणजे राजकारणी, सार्वजनिक जीवनात वावरणाऱ्यांवर अंकुश राखणे, हे लोकांचे आणि माध्यमांचे कर्तव्य असते. आपण आणि प्रसार माध्यमे आपल्या कर्तव्यात कसूर करीत असल्याने आपली लोकशाही मोकाट बनली आहे.

भ्रष्टाचारी नेते ताठ मानेने वावरतात, गुन्हेगार नेते तुरुंगातून सुटल्यावर त्यांचे स्वातंत्र्य सैनिकांच्या थाटात जंगी स्वागत करण्यात येते. शिवराळ, चारित्र्यहनन, चिखलफेकीच्या भाषणांना टाळ्या पडतात. अशा नेत्यांचा जयजयकार होतो. त्यांना लोकप्रियताही लाभते. लोकच अशा चुकीच्या लोकांना लोकशाहीत अभय देत असतील, तर ह्या मोकाटांना उत येणार नाही तर काय होईल? लोकशाहीला कुठे न्यायचे हे लोकांच्या हातात असते. लोकशाहीतील गुण व दोष याचे धनीही लोकच असतात. याचे कारण लोकशाहीत लोक हेच लोकप्रतिनिधींचे जन्मदाते असतात. मतपेटीडरे सज्जनाचा गर्भ पोसायचा, की दुर्जनाचा हे जनतेने ठरवायचे असते. जनता जर सध्या जे घडतंय ते निमूटपणे बघणार असेल, माध्यमे आपल्या 'टी.आर.पी.' साठी वाटेल त्याला प्रसिद्धी देणार असतील, तर आपल्या लोकशाहीचे अधःपतन थांबणे अशक्य आहे. या वाटचालीतून आपल्या लोकशाहीचं बेबंदशाहीत रूपांतर होणे अटळ आहे. अशा परिस्थितीत लोकांनी आणि माध्यमांनी आपल्या लोकशाहीचा तांडा कोठे चालला, याचे आत्मपरीक्षण करण्याची आणि हा तांडा वेळीच रोखण्याची गरज आहे.

# अकारी पडीत जमिनी परत मिळवण्यासाठी उद्या नऊ गावांचा आक्रोश मेळावा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**माळवाडगाव** : शेती महामंडळाच्या हरिगाव मळा कार्यक्षेत्रातील नऊ गावांतील अकारी पडीत शेतकऱ्यांच्या जमिनी मूळ वारसांना विनामोबदला परत करण्याच्या मागणीसाठी १४ ऑगस्ट रोजी सहकुटुंब आक्रोश मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. संभाजीनगर उच्च न्यायालयाने १४ ऑगस्ट २०२४ रोजी जमिनी परत करण्याबाबत निर्णय दिला होता. या निकालाला दोन वर्षे पूर्ण होत असतानाही त्याची अंमलबजावणी झालेली नसल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.

हरिगाव मळा शेती महामंडळाच्या कार्यालयासमोर सकाळी १० वाजता हा मेळावा होणार आहे. शेतकरी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष ॲड. अजित काळे यांच्या मार्गदर्शनाखाली नऊ गावांतील अकारी पडीत शेतकऱ्यांच्या वतीने मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

जमिनीच्या प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी शेतकरी, महिला, युवक व ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. प्रत्येक गावातून जास्तीत जास्त ट्रॅक्टरसह सहकुटुंब उपस्थित राहण्याचे आवाहन नऊ गाव अकारी पडीत कृती समितीने केले आहे.दरम्यान, मेळाव्यात शेतकऱ्यांच्या जमिनीबाबत पुढील कायदेशीर व लोकशाही मार्गातील आंदोलनाची दिशा, निवेदने आणि शासनाकडे करावयाच्या पाठपुराव्याबाबत सामूहिक निर्णय घेण्यात येणार असल्याचे समितीने सांगितले.

# भंडारदरा पर्यटनासाठी १५ व १६ ऑगस्टला वाहतुकीत बदल

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी** : स्वातंत्र्य दिनाला जोडून सुट्या आल्याने भंडारदरा धरण परिसरात पर्यटकांची मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे. संभाव्य वाहतूक कोंडी व कायदा–सुव्यवस्थेचा प्रश्न टाळण्यासाठी १५ व १६ ऑगस्ट रोजी या परिसरातील वाहतुकीत बदल करण्यात आला आहे. जिल्हा पोलिस अधीक्षक मुमक्का सुदर्शन यांनी याबाबत आदेश दिले आहेत.

भंडारदरा धरण, रंधा धबधबा, कोकणकडा, हरिश्चंद्रगड, कळसुबाई शिखर आणि रतनवाडी येथील अमृतेश्वर मंदिर पाहण्यासाठी पुणे, नाशिक, मुंबई, ठाणे तसेच नगर जिल्ह्यातून मोठ्या संख्येने पर्यटक येतात. सध्या सुरू असलेल्या पावसामुळे रस्त्यांची अवस्था खराब असून अनेक मार्ग अरुंद असल्याने वाहतूक कोंडी होण्याची शक्यता आहे.

त्यानुसार रंधा फाटा येथून भंडारदरा दिशेने प्रवेश बंद करण्यात आला आहे. शेंडी व भंडारदरा येथे जाण्यासाठी वाकी फाटा व वारंघुशी फाट्यावरून प्रवेश करता येणार आहे. एकेरी वाहतुकीचा मार्ग वारंघुशी फाटा–वाकी फाटा–चिचोंडी फाटा–यश रिसॉर्ट–शेंडी–भंडारदरा धरण स्पिलवे गेट–भंडारदरा गाव–गुहीरे–रंधा असा राहणार आहे.

अत्यावश्यक सेवा, रुग्णवाहिका, अग्निशमन दल व शासकीय वाहनांना या निर्बंधातून वगळण्यात आले आहे. पर्यटकांनी वाहतूक नियमांचे पालन करावे. वाहनांची तपासणी होणार असल्याने मद्यपान करून वाहन चालवू नये तसेच मद्य सोबत बाळगू नये, असे आवाहन राजूर पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक किशोर पवार यांनी केले आहे.

# मुंबईत आ. लंघे यांची ना. विखेंशी विकासात्मक कामांवर सकारात्मक चर्चा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : राज्याचे जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांची आ.विठ्ठलराव लंघे यांनी मुंबई येथील रॉयल स्टोन बंगल्यावर मंगळवारी सदिच्छा भेट घेतली. नेवासा तालुक्यातील प्रश्नांसाठी पाठपुरावा करा निधीची तरतूद मी करतो अशी ग्वाही ना.विखे यांनी यावेळी चर्चेच्या प्रसंगी बोलतांना दिली.

नेवासा तालुक्याच्या विकासासाठी उपेक्षित घटक केंद्रबिंदू मानून काम करण्याचा संकल्प आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांनी केला. त्यांनी तालुक्यातील प्रलंबित असलेले विविध प्रश्न ना. राधाकृष्ण विखे यांच्या समोर मांडले. रस्ते, वीज पाणी या मूलभूत प्रश्नांवर विकासकामे मार्गी लावण्याच्या दृष्टीने तसेच जनतेशी संबंधित महत्त्वाच्या विषयांवर त्यांनी सविस्तर चर्चा केली.

या सर्व प्रश्नांच्या सकारात्मक आणि तातडीने सोडवणुकीसाठी आवश्यक पाठपुरावा करण्याची सूचना राज्याचे जलसंपदा तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांनी आमदार लंघे पाटील यांना केली. या संदर्भात सर्व प्रश्नांच्या कागदपत्रांची फाईल आ. विठ्ठलराव लंघे यांनी ना. विखे यांना दिली. त्यामुळे आगामी काळात भरीव असा निधी उपलब्ध होऊन प्रलंबित कामे मार्गी लागण्याची शक्यता व्यक्त होत असल्याने नेवासा तालुक्यातील जनतेतून समाधान व्यक्त केले जात आहे.

# योगितातार्इ कल्हापूरे यांचा दिंडी सोहळ्यात विशेष सन्मान

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : श्रीक्षेत्र देसवंडी ते श्रीक्षेत्र ताहाराबाद दिंडी सोहळा ११ ऑगस्ट रोजी भक्तिमय व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. दिंडीतील वारकरी, भजनी मंडळे तसेच ग्रामस्थांचे उत्स्फूर्त स्वागत करून त्यांचा सन्मान करण्यात आला. महिला वारकरी व महिलांची लक्षणीय उपस्थिती हे या सोहळ्याचे विशेष आकर्षण ठरले.

यावेळी देसवंडी गावच्या प्रथम लोकनियुक्त महिला सरपंच योगितातार्इ नितीनराव कल्हापूरे यांचा श्री संत कवी महिपती महाराज देवस्थानच्या वतीने विशेष सन्मान करण्यात आला. सरपंचपदाच्या माध्यमातून गावाच्या विकासासाठी काम करत असतानाच धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक परंपरा जपण्याचे काम कल्हापूरे कुटुंबीयांकडून सातत्याने केले जात असल्याचे यावेळी सांगण्यात आले.राजकारण केवळ निवडणुकीपुरते मर्यादित न ठेवता सर्वांना सोबत घेऊन गावाचा विकास, महिला सन्मान आणि सामाजिक एकजूट साधणे हीच विकासाची दिशा असल्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

भक्ती, महिला सन्मान, सामाजिक बांधिलकी आणि गावविकासाचा सुंदर संगम या दिंडी सोहळ्यात पाहायला मिळाला. यावेळी देवस्थानचे पदाधिकारी, भजनी मंडळे, महिला वारकरी, ग्रामस्थ व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# म्हैसगावच्या सरपंच पवारांना दिलासा नाहीच

## शासकीय जमिनीवरील अतिक्रमण प्रकरणी अंतरिम स्थगिती उठविली

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**म्हैसगाव** : शासकीय जागेवरील अतिक्रमणाच्या प्रकरणात म्हैसगाव ग्रामपंचायतीच्या लोकनियुक्त सरपंच सुजाता अरुण पवार यांना विभागीय आयुक्तांकडूनही दिलासा मिळाला नाही. जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी २३ जुलै २०२६ रोजी दिलेल्या अपात्रतेच्या निर्णयाविरोधात पवार यांनी अपर विभागीय आयुक्त, नाशिक विभाग यांच्याकडे अपील दाखल केले होते. याप्रकरणी ३० जुलै रोजी देण्यात आलेली अंतरिम स्थगिती १० ऑगस्ट रोजी झालेल्या सुनावणीत उठविण्यात आली असून, स्थगितीला मुदतवाढ देण्याची मागणीही नामंजूर करण्यात आली आहे.

म्हैसगाव सोसायटीचे चेअरमन विलास भागवत गागरे, अशोक कर्डे व प्रशांत सिताराम दुधाट यांनी सरपंच पवार यांच्या शासकीय जागेवरील अतिक्रमणाचा मुद्दा जिल्हाधिकाऱ्यांकडे मांडला होता. त्यानंतर तहसीलदार, राहुरी यांनी १० जून रोजी भूमी अभिलेख विभागाला म्हैसगाव येथील गट क्रमांक ३७१ मधील जागेची मोजणी करून हद्द निश्चित करण्याचे निर्देश दिले.

भूमी अभिलेख विभागाने २२ जून रोजी सादर केलेल्या मोजणी अहवालानुसार गट क्रमांक ३७१ व लगतच्या गट क्रमांक २ ची मोजणी करण्यात आली. त्यात सुजाता पवार यांच्या मिळकतीचा काही भाग सरकारी ओढ्यामध्ये येत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. मोजणी नकाशातील टिपणीतही संबंधित मिळकत सरकारी ओढ्यामध्ये असल्याचा उल्लेख असल्याचे अपर विभागीय आयुक्तांच्या आदेशात नमूद आहे.

उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे प्रथमदर्शनी सरकारी जागेवर अतिक्रमण झाल्याचे दिसून येत असल्याने स्थगिती अर्ज नामंजूर करणे योग्य व कायदेशीर असल्याचा निष्कर्ष अपर विभागीय आयुक्तांनी नोंदविला आहे.

या प्रकरणाची पुढील सुनावणी २० ऑगस्ट २०२६ रोजी होणार असून, त्याकडे म्हैसगाव ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

# डॉ. तनपुरे कारखान्याची गाळप क्षमता वाढविणार : अरुण तनपुरे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : एकेकाळी आशिया खंडात नावाजलेला डॉ. तनपुरे सहकारी साखर कारखाना काही कारणास्तव बंद पडला. कारखाना पुन्हा सुरू करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे राज्य सरकारकडे सादर करण्यात आली असून विकासासाठी ४७८ कोटी रुपयांच्या निधीची मागणी करण्यात आली आहे. निधी उपलब्ध झाल्यानंतर अत्याधुनिक मशिनरी बसवून कारखान्याची गाळप क्षमता वाढविण्यावर भर दिला जाईल, अशी माहिती कारखान्याचे अध्यक्ष अरुण तनपुरे यांनी दिली.

राहुरी तालुक्यातील उंबरे येथील आदर्श विद्यालयाला भेट देऊन तनपुरे यांनी शिक्षक, पालक व ग्रामस्थांशी संवाद साधला. यावेळी ते बोलत होते. कारखाना सुरू करण्यासाठी स्व. अजितदादा पवार यांची भेट घेऊन माहिती दिली होती. त्यांनी संबंधित विभागाला आवश्यक सहकार्य करण्याच्या सूचना दिल्या होत्या. मात्र, त्यांच्या निधनामुळे प्रक्रिया काही काळ रखडली, असे तनपुरे यांनी सांगितले. १९५३ सालचे मूळ प्रमाणपत्र व अन्य आवश्यक कागदपत्रांसह ४७८ कोटींच्या निधीचा प्रस्ताव सरकारकडे सादर करण्यात आला असून लवकरच निर्णय होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी सूतगिरणीच्या माध्यमातून काम सुरू असून लूज कांद्याची खरेदी तसेच परिसरात मोठा फळबाजार उभारण्याचे नियोजन असल्याचे त्यांनी सांगितले. शिक्षण क्षेत्रातही शाळांना सुविधा देण्याबरोबरच नर्सिंग, आयटीआय, बी.फार्मसी, आयुर्वेदिक महाविद्यालय, अटल लॅब, स्पर्धा परीक्षा व सैनिक स्कूलसाठी आधुनिक सुविधा निर्माण करण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला.

# ताहाराबाद येथे मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर उत्साहात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : श्री पांडुरंग महोत्सव व गोपाळकाला उत्सवानिमित्त ताहाराबाद येथील श्री संत कवी महिपती महाराज देवस्थान येथे मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर उत्साहात पार पडले. एच. व्ही. देसाई नेत्र रुग्णालय, हडपसर, पुणे संचलित नेत्र तपासणी केंद्र, राहुरी, दिव्यांग शक्ती सेवा संस्था व प्रहार दिव्यांग संघटनेच्या संयुक्त विद्यमाने शिबिराचे आयोजन करण्यात आले.

शिबिराचे उद्घाटन देवस्थानचे मठाधिपती महंत ह.भ.प. अर्जुन महाराज तनपुरे व पोलिस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष राजेंद्र साबळे होते. पांडुरंग महोत्सवानिमित्त दर्शनासाठी आलेल्या हजारो भाविकांची मोफत नेत्र तपासणी करण्यात आली. तपासणीत मोतीबिंदू आढळलेल्या रुग्णांची पुढील शस्त्रक्रियेसाठी निवड करण्यात आली.

निवड झालेल्या रुग्णांची लेन्ससहित मोतीबिंदू शस्त्रक्रिया एच. व्ही. देसाई नेत्र रुग्णालय, हडपसर येथे पूर्णपणे मोफत करण्यात येणार आहे. यासाठी आधार कार्ड, रेशन कार्ड व पासपोर्ट आकाराचा फोटो आवश्यक असल्याची माहिती देण्यात आली.

प्रहार दिव्यांग संघटनेचे जिल्हाध्यक्ष मधुकर घाडगे यांनी रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा असल्याचे सांगितले. डॉ. संकेत घोलप यांनी डोळ्यांची काळजी व नेत्रविकारांपासून बचावाच्या उपायांची माहिती दिली.

यावेळी सलीम शेख, आप्पासाहेब ढोकणे, गौरव तनपुरे, बाळासाहेब मुसमाडे यांच्यासह यात्रा समितीचे सदस्य व पदाधिकारी उपस्थित होते. शिबिरासाठी कैलास हारदे, योगेश लबडे, रवींद्र भुजाडी, विजय म्हसे, नानासाहेब खपके आदींनी परिश्रम घेतले.

# हर घर तिरंगा उपक्रमांतर्गत तिरंगा रॅली व विविध उपक्रमांचे आयोजन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : नेवासाफाटा येथील त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान संचलित त्रिमूर्ती कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत 'हर घर तिरंगा' उपक्रमाचे आयोजन त्रिमूर्ती कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालयाच्या वतीने उत्साहात करण्यात आले. या उपक्रमांतर्गत महाविद्यालय परिसरामध्ये तिरंगा रॅली, तिरंगा प्रतिज्ञा, स्वच्छता अभियान व वृक्षारोपण असे विविध उपक्रम राबविण्यात आले. यावेळी स्वातंत्र्य सैनिकांना श्रद्धांजली अर्पण करून त्यांच्या त्यागाचे स्मरण करण्यात आले.



तिरंगा रॅलीदरम्यान विद्यार्थ्यांनी भारत माता की जय!, वंदे मातरम्!, हर घर तिरंगा!अशा देशभक्तीपर घोषणांनी संपूर्ण महाविद्यालय परिसर दणाणून सोडला. विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम, राष्ट्रीय एकात्मता आणि सामाजिक बांधिलकीची भावना निर्माण करण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. एस. आरसुळे,उपप्राचार्य निकिता बर्गे,कार्यक्रम अधिकारी प्रा. साईनाथ भवर,सहकार्यक्रम अधिकारी प्रा.आशुतोष पल्हारे यांच्यासह सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी महाविद्यालयीन विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विखे कुटुंबाची विठ्ठलभक्तीची परंपरा अखंड

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर** :विठ्ठलनामाचा गजर, टाळ–मृदंगाचा निनाद आणि भक्तिमय वातावरणात लोणी बुद्रुक येथील संत महिपती महाराज देवस्थानातून श्रीक्षेत्र ताहाराबादकडे पायी दिंडीचे प्रस्थान झाले. विठ्ठलभक्तीची ही परंपरा पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांनी सुरू केली असून आजही ती अखंडपणे सुरू आहे. आषाढी वारीनंतर धाकट्या एकादशीला पांडुरंग श्रीक्षेत्र ताहाराबाद येथे येतात, अशी भाविकांची श्रद्धा आहे. त्यामुळे विविध भागांतून दिंड्या ताहाराबादकडे दाखल होतात. यंदा राज्याचे जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील यांच्या वतीने दिंडीचे आयोजन करण्यात आले.लोणी बुद्रुकहून निघालेली दिंडी पाथरे, सोनगाव, दुकरेवाडी, कानडगाव, वरशिंदे मार्गे ताहाराबादकडे रवाना झाली.

मार्गात ग्रामस्थांनी वारकऱ्यांचे उत्स्फूर्त स्वागत करून चहा, नाश्ता व महाप्रसादाची व्यवस्था केली. कानडगाव येथे ओम गागरे यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. पावसाच्या सरी, हिरवाईने नटलेले शेतशिवार आणि 'विठ्ठल–विठ्ठल' नामघोषामुळे वातावरण भक्तिमय झाले.

ह.भ.प. भारत महाराज धावणे व ह.भ.प. परशुराम विखे यांच्या मार्गदर्शनाखाली दिंडी पार पडली. युवकांनी शिस्तबद्ध नियोजन केले, तर यंदा महिलांचा सहभाग लक्षणीय होता. सुष्मिता विखे पाटील यांच्या पुढाकाराने वारकऱ्यांसाठी बसची, तर पोपट विखे यांनी साहित्य वाहतुकीसाठी ट्रॅक्टरची व्यवस्था केली.

# जिल्ह्यात कर्जमाफीतील शेतकऱ्यांना तात्काळ खरीप पीककर्ज वाटप करा ; मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर ।** अहिल्यानगर जिल्ह्यातील पहिल्या यादीत कर्जमाफ झालेल्या पात्र शेतकऱ्यांना तात्काळ बेबाकी प्रमाणपत्र देऊन नव्याने खरिप पीककर्ज वाटप करावे, अशी मागणी शेतकरी संघटना स्वतंत्र, भारत पक्षाच्या वतीने करण्यात आली आहेत. शासनाच्या पीककर्ज वाटपाच्या मुदतीपूर्वी हे कर्जवाटप पूर्ण करण्यासाठी जिल्हा सहकारी बँकेने शाखांना अतिरिक्त मनुष्यबळ पुरवावे, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.



शेतकरी सघटनेने प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेच्या एका शाखेकडे ४ ते ५ सेवा सोसायट्या संलग्न असल्याने कर्ज मंजुरीच्या प्रक्रियेला विलंब होत आहे. सध्या दिवसाला केवळ दोन–तीनच कर्ज प्रकरणे मंजूर होत आहेत. या धिम्या गतीमुळे शासनाने खरीप पीककर्ज वाटपासाठी दिलेली ३१ ऑगस्ट ही मुदत निघून जाण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. वेळेत कर्जवाटप होण्यासाठी जिल्हा बँकेच्या सर्व शाखांना तातडीने जास्तीचे मनुष्यबळ उपलब्ध करून द्यावे. सेवा सोसायट्यांनी जिल्हा बँकेशी योग्य समन्वय साधून शेतकऱ्यांना तत्काळ पीककर्ज वाटप सुरू करावे.

या महत्त्वपूर्ण मागण्यांचे निवेदन अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँक (श्रीरामपूर) अधिकारी शिवाजीराव पवार यांना, तसेच सहायक निबंधक सहकारी संस्था श्रीरामपूर नामदेव ठोंबळ यांना देण्यात आले आहेत.

निवेदनावर शेतकरी संघटना स्वतंत्र भारत पक्षाचे पदाधिकारी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये प्रामुख्याने जिल्हाध्यक्ष नीलेश शेडगे,नवनाथ दिघे,प्रकाश जाधव,मयूर भनगडे,सुनीताताई वानखेडे,

# सावित्रीबाई फुले प्राथमिक विद्यालयाचे शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत एप्रिल २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता ४ थी शिष्यवृत्ती परीक्षेत सावित्रीबाई फुले प्राथमिक विद्यालय ,महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी या शाळेतील ५ विद्यार्थ्यांनी अहिल्यानगर जिल्हा ग्रामीण सर्वसाधारण शिष्यवृत्ती गुणवत्ता यादीत स्थान पटकावले व शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले.कु. आरोही पंडीत पानसंबळ (जिल्ह्यात २ री),चि. आर्य संतोष जाधव (जिल्ह्यात ५वा),चि. सिद्धांतराजे जितेंद्र मेटकर (जिल्ह्यात ५४वा ),चि. समर संतोष पठाडे (जिल्ह्यात १८१ वा),चि. अथर्व महेश घाडगे (जिल्ह्यात ३६३वा) या विद्यार्थ्यांना वर्गशिक्षक विलास देशमुख, गोरक्ष उचाळे, तृप्ती हारदे,मुख्याध्यापक बाळासाहेब खेत्री आदींचे मार्गदर्शन लाभले.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. विलास खर्चे (कुलगुरू, महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी),सभापती डॉ.साताप्पा खरबडे,सचिव सन्मा. डॉ. महानंद माने,सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य अरुण तुपविहिरे, प्रा.जितेंद्र मेटकर तसेच सर्व सन्मा.संचालक,सावित्रीबाई फुले शिक्षण मंडळ, महात्मा फुले कृषी विद्यापीठ,राहुरी यांनी अभिनंदन केले.




हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय –कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

## द•ख•ल

### राष्ट्रीय समाज पक्षाच्या अहिल्यानगर युवक जिल्हाध्यक्षपदी गणेश वाकडे यांची निवड



**राहुरी** : राष्ट्रीय समाज पक्षाचे संस्थापक अध्यक्ष महादेव जानकर यांच्या मार्गदर्शनाखाली युवा जोडो संकल्प अभियान महाराष्ट्र राज्यभर सुरू असून अहिल्यानगर मध्ये नुकतीच युवा जोडो संवाद बैठक आयोजित करण्यात आली होती यामध्ये युवकांचे प्रदेशाध्यक्ष अजित पाटील यांनी अहिल्यानगर युवक जिल्हाध्यक्षपदी ब्राह्मणी येथील गणेश वाकडे यांची निवड केली महाराष्ट्र राज्याचे मुख्य महासचिव माऊली सलगर, प्रदेश उपाध्यक्ष डॉ. प्रल्हाद पाटील, प्रदेश सचिव सय्यदबाबा शेख, राज्य कार्यकारणी सदस्य नानासाहेब जुंधारे, परमेश्वर पुजारी, आशुतोष जाधव, जिल्हाध्यक्ष अमोल साबणे यांचे उपस्थितीत नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी, विलास सैंदोरे, दत्तात्रय कचरे, सुनील चींधे, इनायत आतार, दत्तात्रय गवते, बाळासाहेब ढाकणे, संदीप शिवांभर, अक्षय मासाळ, बिलाल शेख, विशाल नगरे, पप्पू पाटोळे, रेखा नरवडे आदि उपस्थित होते.

### आरडगांव ते ताहाराबाद पायी दिंडी सोहळ्याचे आयोजन



**राहुरी** : श्रीक्षेत्र ताहराबाद येथे दिंडी सोहळ्याचेश्री संत कवी महिपती महाराज देवस्थान ट्रस्टच्या वतीने भव्य स्वागत करण्यात आले. राहुरी तालुक्याच्या पूर्वभागातून गेली १६ वर्षा पासून श्रीक्षेत्र आरडगाव ते श्रीक्षेत्र ताहाराबाद येथे पायी दिंडी सोहळा महेश खाटेकर, योगितातार्इ शेळके, राजु आढाव यांच्या कुशल मार्गदर्शना खाली दिंडी अविरतपणे सुरु आहे. दरवर्षी झेंडेकरी, कलश, तुलसी काकडा, हरिपाठ, संगीत भारुड, प्रवचन, हरीकीर्तन आशा चांगल्या नियोजनात हा दिंडी सोहळा ताहाराबाद येथे जात असतो.

यावेळी श्री संत कवी महिपती महाराज देवस्थान मठाधिपती महंत ह.भ.प. अर्जुन महाराज तनपुरे श्री संत कवी महिपती महाराज देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष राजेंद्र साबळे, देवस्थान ट्रस्टचे सुरसिंग पवार, ज्ञानेश्वर कोळसे, बाळासाहेब मुसमाडे, राजेश वराळे, अशोक देशमुख आदी विश्वस्तांसह पत्रकार शिवाजी झावरे, निवेदक आप्पासाहेब ढोकणे, आदींनी स्वागत करुन कौतुक केले आहे.

### प्रवरा ग्रामीण रुग्णालयात १७ ते ३१ ऑगस्ट दरम्यान मोफत आरोग्य शिबिर

**प्रवरानगर** : प्रियदर्शनी ग्रामीण महिला मंडळाच्या संस्थापक सिंधूताई विखे यांच्या जयंतीनिमित्त प्रवरा मेडिकल ट्रस्टच्या डॉ. विठ्ठलराव विखे पाटील प्रवरा ग्रामीण रुग्णालयात १७ ते ३१ ऑगस्टदरम्यान १५ दिवसीय विशेष मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. प्रवरा इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सेसचे कुलपती डॉ. राजेंद्र विखे यांच्या संकल्पनेतून हे शिबिर होत आहे.

शिबिराचा लाभ रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांना घेता येणार आहे. दाखल रुग्णांच्या नियमित प्रयोगशाळा तपासण्या, सोनोग्राफी व एक्स-रे मोफत करण्यात येणार आहेत. तसेच प्लेन सीटी स्कॅन तपासणीवर ५० टक्के सवलत दिली जाणार आहे. शिबिरासाठी मंजूर यादीतील औषधेही मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. दाखल रुग्णांना चहा, नाश्ता व जेवणाची मोफत सुविधा मिळणार आहे. गरजू रुग्णांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन अधिष्ठाता डॉ. सतीश महाजन, रुग्णालय प्रशासक संचालक डॉ. योगींदर सिंग व वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुरेश जगदाळे यांनी केले आहे.

### १३ ऑगस्ट रोजी शिरसगाव ते शिर्डी पायी दिंडी सोहळा

**शिरसगाव** : श्रीरामपूर तालुक्यातील शिरसगाव येथील सालाबादप्रमाणे दि. १३ ऑगस्ट रोजी श्रावण महिन्याच्या पहिल्या गुरुवारी सकाळी ७ वाजता शिरसगाव ते शिर्डी पायी दिंडी सोहळ्याचे आयोजन श्री साई प्रतिष्ठानच्यावतीने करण्यात आले आहे. त्यासाठी सर्वानी सकाळी ७ वा विठ्ठल मंदिर या ठिकाणी यावे व दिंडीत सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

# शिक्षण खासगीकरणाविरोधात छात्र भारतीचा प्रांताधिकारी कार्यालयावर मोर्चा



**शिक्षणातील बदलांवर विद्यार्थ्यांचा आक्षेप**

शिक्षणाचे खासगीकरण थांबवा कनिष्ठ महाविद्यालयात ४५ मिनिटांचा तास ४० मिनिटांचा करून दररोजचे अध्यापनाचे २० ते २५ मिनिटे कमी करण्याचा निर्णय शासनाने घेतल्याचा आरोप आंदोलकांनी केला. तसेच प्रॅक्टिकलची एक बॅच २० वरून ३० विद्यार्थ्यांची करण्याचा निर्णयही धक्कादायक असल्याचे छात्र भारती विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष अनिकेत घुले यांच्यासह आंदोलन विद्यार्थ्यांनी सांगितले.

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : महाराष्ट्रात हजारो शिक्षकांच्या जागा रिक्त असताना शिक्षकांना अतिरिक्त व रिक्त ठरवून गेल्या अनेक वर्षां पासून शासनाने शिक्षक भरती केली नसल्याचा आरोप करत छात्र भारती विद्यार्थी संघटनेच्या वतीने संगमनेर प्रांताधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला.

शासनाच्या शिक्षण विरोधी धोरणांचा संतप्त झालेल्या आंदोलक विद्यार्थ्यांनी निषेध करत जोरदार घोषणाबाजी केली. राज्य शासनाने कित्येक वर्षांपासून शिक्षक भरती न करता शिक्षण व्यवस्थेतील पदे अतिरिक्त ठरविण्या बाबतचा घाट घातला आहे. त्यामुळे सरकारी शिक्षण व्यवस्था उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न राज्य शासनाचा सुरू असून, शिक्षणाचे खासगीकरण करण्याचे धोरण शासनाने थांबवावे, अशी मागणी आंदोलकांनी केली. शासनाने शिक्षक भरतीकडे दुर्लक्ष केल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे.

मागील १२ वर्षांपासून शिक्षक भरती झालेली नसून, पुढील अनेक वर्षेही भरती न करण्याचा घाट घातला जात आहे असा आरोप केला. सरकारी शिक्षण व्यवस्था मजबूत करण्यासाठी रिक्त शिक्षक पदांवर भरती तातडीने करावी, अशी मागणी यावेळी आंदोलन विद्यार्थ्यांनी केली आहे.

## वाकडी सोसायटी अध्यक्षपदी गोरे तर उपाध्यक्षपदी पांडागळे बिनविरोध




**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वाकडी** : राहता तालुक्यात आर्थिक व राजकीय दृष्ट्या महत्त्वाच्या समजल्या जाणाऱ्या वाकडी विविध कार्यकारी सहकारी सोसायटी नं.२ च्या अध्यक्षपदी व उपाध्यक्ष पदाची निवड बिनविरोध पार पडली. या निवडीच्या अध्यक्षस्थानी श्रीगणेश कारखान्याचे माजी उपाध्यक्ष शिवाजी लहारे व वाकडी सोसायटीचे माजी चेअरमन भिमराज लहारे हे होते. निवडणूक अधिकारी म्हणून संजय पाटील सहकार अधिकारी श्रेणी १ सहायक निबंधक कार्यालय राहाता यांनी काम पाहिले तर सचिव म्हणून विनायक लहारे यांनी कामकाज सांभाळले.

यावेळी सोसायटीचे अध्यक्ष म्हणून तात्यासाहेब रायभान गोरे तर उपाध्यक्ष म्हणून सुभाष एकनाथ पांडागळे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. निवड झालेल्या अध्यक्ष उपाध्यक्ष यांचा सत्कार शिवाजी लहारे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी वाकडी गावातील प्रथम लोकनियुक्त सरपंच रोहिणीताई आहेर यांना राज्यस्तरीय आदर्श सरपंच पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचादेखील सत्कार या निमित्ताने करण्यात आला.

# आकाश दुबैय्या हत्या प्रकरणात 'मोकोका' कारवाईची मागणी

### १५ ऑगस्टपासून दुबैय्या कुटुंबाचे बेमुदत धरणे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : हॉटेल व्यावसायिक आकाश चंद्रशेखर दुबैय्या यांच्या हत्येला महिनाभर उलटूनही संघटित गुन्हेगारीविरोधात अपेक्षित कारवाइ झालेली नसल्याचा आरोप करत दुबैय्या कुटुंबाने १५ ऑगस्टपासून बेमुदत धरणे आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. आरोपींसह संबंधित टोळीवर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यानुसार (मोका) कारवाई करून खटला फास्ट ट्रॅक न्यायालयात चालवावा, अशी मागणी करण्यात आली आहे. याबाबत चंद्रशेखर नारायण व्यंकटराम (दुबैय्या) यांनी जिल्हाधिकारी व जिल्हा पोलिस अधीक्षकांना निवेदन दिले आहे.

१५ ऑगस्ट रोजी सकाळी १०.१० वाजता महात्मा गांधी पुतळ्यासमोर कुटुंबीयांसह धरणे आंदोलन सुरू करण्यात येणार आहे. मागण्या मान्य न झाल्यास आमरण उपोषण, चक्री उपोषण, घेराव व रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशाराही देण्यात आला आहे. ११ जुलै रोजी नेवासा रोडवरील हॉटेल लक्ष्मीनारायण येथे किरकोळ वादातून आकाश दुबैय्या यांची हत्या झाली होती.

घटनेच्या निषेधार्थ श्रीरामपूर चार दिवस बंद ठेवण्यात आले होते. पत्रकार परिषदेत कुटुंबीयांनी आरोपींना राजकीय संरक्षण मिळत असल्याची नागरिकांमध्ये भावना असल्याचा आरोप केला. संबंधितांच्या मालमत्तेची चौकशी करून कठोर कारवाई करावी, अशीही मागणी त्यांनी केली. न्याय मिळेपर्यंत लढा सुरू ठेवण्याचा निर्धार कुटुंबीयांनी व्यक्त केला.

## धनश्री आदमाने सातवी शिष्यवृत्ती परीक्षेत जिल्हा गुणवत्ता यादीत १९८ वा क्रमांक




**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**चितळी** : राहाता तालुक्यातील चितळी येथील न्यू इंग्लिश स्कूल विद्यालयाची इयत्ता सातवीची विद्यार्थिनी आदमाने धनश्री रंगनाथ हिने नुकत्याच पार पडलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहेत.

तिने शिष्यवृत्तीधारक होण्यासोबतच थेट जिल्हास्तरीय गुणवत्ता यादीत झकास मजल मारत १९८ वा क्रमांक पटकावला आहेत. या तिच्या दैदिप्यमान यशाने विद्यालयाच्या शैक्षणिक शिरपेचात मानाचा तुरा रोवला असून सर्वत्र कौतुक होत आहे. तिच्या या उल्लेखनीय व प्रेरणादायी यशाबद्दल विद्यालयाच्या वतीने तिचा सत्कार सोहळा आयोजित करून गौरव करण्यात आला.

या गौरवाच्या प्रसंगी न्यू इंग्लिश स्कूल चितळी विद्यालयाचे मुख्याध्यापक शिरसाठ एन. एन., पर्यवेक्षिका सातव ए. एस., सातवी शिष्यवृत्ती विभागप्रमुख धनवटे पी. ए., तसेच मार्गदर्शक शिक्षक लोहकरे सी. डी, वसावे एम. व्ही. आणि लबडे एस. के. यांसह विद्यालयातील संपूर्ण शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वडगावपान येथील सप्ताहाची काल्याच्या कीर्तनाने सांगता

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : अखंड हरिनाम सप्ताह आणि संतांच्या विचारांच्या माध्यमातून मनाला एक वेगळी ऊर्जा मिळते. ही ऊर्जा घेऊन आपण जीवनात पुढे जात असतो. हीच आध्यात्मिक ऊर्जा आयुष्याला दिशा देणारी ठरते, असे गौरवोद्गार आमदार अमोल खताळ यांनी काढले. तालुक्यातील वडगावपान येथील साईनगरमध्ये आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता ज्ञानेश्वर महाराज मंदिराचे मठाधिपती उद्धव महाराज मंडलिक यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली.



यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर वडगावपानचे सरपंच श्रीनाथ थोरात, ग्रामपंचायत सदस्य सुमित काशीद, सुधाकर काशीद, राहुल काशीद, समीर मोरे, सतीश थोरात, मधुकर थोरात, यांच्यासह साई ग्रुप वडगाव पानचे सर्व पदाधिकारी ज्येष्ठ नागरिक महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. आ. खताळ म्हणाले, मागील वर्षी या सप्ताहाला उपस्थित राहण्याचा योग आला होता. या सप्ताहाच्या माध्यमातून मिळणारा आनंद आणि सकारात्मक ही ऊर्जा मनाला नवी उभारी देणारी आहे. आजच्या काळात तरुण पिढीकडून कळत-नकळत काही चुका होत आहेत. अनेक धार्मिक उत्सवांचे स्वरूपही बदलत चालले आहे. मात्र, साई निर्माण ग्रुपसारख्या संस्था धार्मिक तसेच सामाजिक उपक्रम चांगल्या पद्धतीने राबवत आहेत. त्यांचे हे कार्य कौतुकास्पद आहे. मागील वर्षी पंढरपूरला गेल्यानंतर अनेक दिंड्यांचे दर्शन झाले. यंदाही वारीदरम्यान तब्बल ११ किलोमीटर चाललो मात्र चालताना अजिबात थकवा जाणवला नाही. माणूस सतत चालत राहतो, हीच खरी वारकरी संप्रदायाची व अध्यात्माची ताकद आहे. प्रत्येकाने आयुष्यात एकदा तरी वारीचा अनुभव घ्यावा. त्यातून मिळणारा आनंद खरोखरच वेगळा असतो. संत-महंतांच्या विचारांमुळे महाराष्ट्राची भूमी समृद्ध झाली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांसह अनेक संतमहंतांच्या विचारांचा वसंस्कारांचा समाजावर मोठा प्रभाव आहे. आज आपण सुरक्षित वातावरणात आणि मोकळा श्वास घेत जगत आहोत, त्यामागे संत-महंतांचे मोठे योगदान असल्याचे आ. खताळ यांनी सांगितले.

# मराठा अधिकारी-कर्मचारी संघाच्या राष्ट्रीय अधिवेशनाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : मराठा अधिकारी व कर्मचारी संघ, भारत यांच्या वतीने आयोजित प्रथम राष्ट्रीय अधिवेशन नेवासा तालुक्यातील प्रवरासंगम येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले.




समाज मेळावा, प्रबोधनपर व्याख्याने, गुणवंतांचा गौरव, समाजसेवकांचा सन्मान तसेच रक्तदान शिबिर अशा विविध उपक्रमांनी अधिवेशनाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. अधिवेशनात डॉ. अजय कळमकर, डॉ. बालाजी जाधव, ड. संजय कोतकर व अशोक कुटे यांनी सामाजिक आणि प्रशासकीय विषयांवर मार्गदर्शन केले. सामाजिक एकोपा, शिक्षण, संघटन आणि समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी एकत्रित प्रयत्न करण्याचे आवाहन करण्यात आले.

विविध शैक्षणिक, संशोधन, स्पर्धा परीक्षा, क्रीडा तसेच अन्य क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गुणवंत पाल्यांचा सन्मान करण्यात आला. यामध्ये डॉ. जयदिप रामदास कुंदे, निरज विकास थोरात, गोविंद जगन्नाथराव कदम, मेधांश मुकुंद पवळ, सार्थक शिवाजी काळे, श्रुती संजय सोमवंशी यांच्यासह १४ गुणवंतांचा गौरव करण्यात आला. तसेच समाजासाठी योगदान देणाऱ्या समाजसेवकांचाही सन्मान झाला. रक्तदान शिबिराला छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय रक्त केंद्र व घाटी रुग्णालयातील रक्तपेढीचे सहकार्य लाभले. अधिवेशनाच्या यशस्वी आयोजनासाठी अध्यक्ष लक्ष्मण खटिंग, उपाध्यक्ष पृथ्वीराज वाघाडे, सचिव अनिल पाटील यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रेवणनाथ पवार, अर्चना देशमुख व कल्पना कानडे यांनी केले.

## जाहीर खुलासा

**बँकेच्या लिलाव जाहिरातीतील मालमत्तेच्या वर्णनाबाबत कर्जदाराची हरकत**

सर्व संबंधित नागरिक, मालमत्ता खरेदीदार, बँका, वित्तीय संस्था तसेच इच्छुक निविदाधारक यांच्या माहितीसाठी हा जाहीर खुलासा प्रसिद्ध करण्यात येत आहे.

द्वारकादास मंत्री नागरी सहकारी बँक लि., बीड, शाखा श्रीरामपूर यांनी कर्जवसुलीसाठी स्थावर मालमत्तेचा जाहीर लिलाव काढला असून, सदर लिलावाच्या जाहिरातीत कर्जदार मे. सुपर्ब ऑटो बॅटरीज, प्रो.प्रा. शेख मोहम्मद हुसेन मम्मू, रा. संगमनेर रोड, श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर यांच्या मालमत्तेचे वर्णन करण्यात आले आहे. मात्र, सदर लिलाव जाहिरातीमध्ये नमूद करण्यात आलेल्या मिळकत क्र. ७२१, क्षेत्रफळ २७९८ चौ.फुट (२५९.९१ चौ.मी.) या मालमत्तेबाबत कर्जदाराने स्पष्ट हरकत नोंदविली आहे. सदर मिळकत ही सामाईक क्षेत्रातील असून, बँकेकडून कर्ज घेताना ती कोणत्याही प्रकारे तारण ठेवलेली नाही. तसेच या मिळकतीचे खरेदीखत स्वतंत्र असून, बँकेच्या कर्ज व्यवहाराशी तिचा कोणताही संबंध नाही, असा कर्जदाराचा स्पष्ट दावा आहे.

त्यामुळे बँकेच्या कर्जाच्या वसुलीसाठी तारण ठेवलेल्या मालमत्तेव्यतिरिक्त अन्य मालमत्ता लिलावात विक्रीस काढणे कायदेशीरदृष्ट्या ग्राह्य नाही, अशी आमची ठाम भूमिका आहे. यासंदर्भात जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहिल्यानगर यांच्याकडेही लेखी खुलासा व हरकत सादर करण्यात आली असून, लिलावाच्या मालमत्ता वर्णनातून सदर मिळकत वगळून लिलावाची जाहिरात दुरुस्त करण्याची विनंती करण्यात आली आहे.

इच्छुक खरेदीदारांनी दक्षता घ्यावी

लिलावाच्या जाहिरातीतील मालमत्तेचे वर्णन पाहून कोणत्याही व्यक्तीने मिळकत क्र. ७२१, क्षेत्रफळ २७९८ चौ.फुट (२५९.९१ चौ.मी.) या मालमत्तेसाठी निविदा भरू नये अथवा कोणताही आर्थिक व्यवहार करू नये. सदर मालमत्ता बँकेच्या कर्जासाठी तारण दिलेली नसल्याने तिच्या लिलावास आमची स्पष्ट हरकत आहे.

बँकेने प्रसिद्ध केलेल्या जाहिरातीतील सदर मालमत्तेचा उल्लेख तातडीने दुरुस्त करून, संबंधित मालमत्ता लिलावातून वगळावी, अशी आमची मागणी आहे. सदर प्रकरणात आमचे सर्व कायदेशीर हक्क व हरकती अबाधित असून, आवश्यकतेनुसार संबंधित सक्षम प्राधिकरण व न्यायालयीन स्तरावर कायदेशीर कार्यवाही करण्याचा अधिकार आम्ही राखून ठेवत आहोत. सर्व संबंधितांनी या जाहीर खुलाशाची नोंद घ्यावी व कोणत्याही प्रकारच्या गैरसमजामुळे अथवा अपूर्ण मालमत्ता वर्णनामुळे आर्थिक नुकसान होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

**शेख मोहम्मद हुसेन मम्मू**
**प्रो.प्रा. मे. सुपर्ब ऑटो बॅटरीज**
**रा. संगमनेर रोड, श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर**

# दीपकच्या अवयवदानातून चार रुग्णांना नवजीवनाची आशा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**प्रवरानगर (लो. वा.)** : दुर्गापूर येथील २८ वर्षीय दीपक भानुदास मुळेकर यांच्या कुटुंबीयांनी दुःखाच्या प्रसंगी घेतलेल्या धाडसी निर्णयामुळे चार गरजू रुग्णांना नव जीवनाची आशा निर्माण झाली आहे. अपघातानंतर मेंदूमृत घोषित झालेल्या दीपक यांच्या अवयवांचे दान करण्यात आले. दीपक हे रोजंदारीवर काम करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत होते.

९ ऑगस्ट रोजी घराच्या दुसऱ्या मजल्यावर काम करताना त्यांचा अपघात झाला. डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्यांना डॉ. विठ्ठलराव विखे पाटील प्रवरा ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान वैद्यकीय निकषांनुसार त्यांना मेंदूमृत घोषित करण्यात आले. यानंतर अवयव प्रत्यारोपण समन्वयकांनी कुटुंबीयांचे समुपदेशन केले. पत्नी व भावाने दुःखावर मात करत अवयवदानास संमती दिली. त्यांच्या या निर्णयातून दोन्ही फुफ्फुसे पुण्यातील डी. वाय. पाटील रुग्णालयात, यकृत सह्याद्री रुग्णालयात, तर दोन्ही मूत्रपिंडे नाशिक येथील किंग्स मानवता हॉस्पिटलमध्ये प्रत्यारोपणासाठी पाठविण्यात आली.

अवयव वेळेत पोहोचण्यासाठी लोणी ते पुणे ग्रीन कॉरिडॉरची सुविधा पोलिस प्रशासनाने उपलब्ध करून दिली. या सहकार्याबद्दल प्रवरा मेडिकल ट्रस्ट प्रशासनाने पोलिसांचे आभार मानले. दुःखाच्या प्रसंगी अवयवदानाचा निर्णय घेणाऱ्या मुळेकर कुटुंबाचे हे कार्य मानवतेचा प्रेरणादायी आदर्श ठरले आहे.

## जाहिर प्रगटन

तहसिल कार्यालय नेवासा
क्रमांकः जन्म-मृत्यू/एसआर/१९७/२०२६
नेवासा दिनांक २७/०७/२०२६

अर्जदार श्री श्रीम-दिनकर इंद्रभान यादव रा. गोणेगांव ता. नेवासा यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन श्री/श्रीम. कु. दिनकर इंद्रभान यादव रा. गोणेगांव ता. नेवासा यांचे महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे सदरच्या अर्जात खालील प्रमाणे जन्म नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे.

अ.क्र.१, जन्म नोंद घेण्यात येणा-या व्यक्तीचे नाव-दिनकर इंद्रभान यादव, गावाचे नाव-गोणेगांव, जन्म दिनांक-०१/०६/१९६०

करिता या जाहिर प्रगटनादवारे सुचित करण्यात येते की. वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म-मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटना तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

**तहलिसदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**

**तहसिलदार. तथा कार्यकारी दंडाधिकारी संगमनेर यांचे कार्यालय**
ता. संगमनेर. जिल्हा- अहिल्यानगर
क्र. कावि/मृत्यू नोंद/५९३/२०२६संगमनेर, दिनांक ३१/०७/२०२६

## जाहीरनामा

याद्वारे सर्व लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की. अर्जदार श्री. दत्तात्रय प्रभाकर गुळवे रा. पेमगिरी, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर यांनी दिनांक २०/०७/२०२६ रोजी दाखल केलेल्या अर्जावरुन सुरु करण्यात आले. अर्जदार हे रा. पेमगिरी. ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर येथील रहिवासी असून अर्जदार यांचा/यांची आई नामे विमल प्रभाकर गुळवे यांचा मृत्यू मौजे पेमगिरी ता. संगमनेर जि. अहिल्यानगर येथे दिनांक ०४/०९/२०२४ रोजी झाला असून त्यांचा/त्यांची मृत्यू नोंद निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी पेमगिरी यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्याबाबतची नोंद घेण्याबाबतचे प्रकरण या कार्यालयात दाखल केले आहे.

तरी ज्या व्यक्तींना तक्रारी/हरकती दाखल करावयाच्या असल्यास निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी पेमगिरी यांचे कार्यालयीन नोटीस बोर्डावर जाहीरनामा प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसांचे आंत सुट्टीचे दिवस वगळून लेखी स्वरुपात या कार्यालयात हरकत/तक्रार दाखल करावी, मुदतीनंतर त्या हरकतीचा/तक्रारीचा विचार केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावा.

**तहसिलदार संगमनेर**

## जाहिर नोटिस

ॲड. भाग्यश्री एन. मिसाळ
नेवासा कोर्ट,

नेमलेली तारीख : २३/०९/२०२६
नि.७

नेवासा येथील मे. सिव्हील जज्ज साहेब ज्यु.डी.
यांचे कोर्टात
वा.चौ.अ.नं. ८२/२०२६

**अर्जदार**
१) मिना रमेश तांबे वय-५७ धंदा शेती
२) अमोल रमेश तांबे वय-३० धंदा शेती
३) विकास रमेश तांबे वय-२८ धंदा शेती
४) निशा दिनेश शिंदे वय-३२ धंदा शेती सर्व रा. रांजणगांव देवी ता. नेवासा जि.अ.नगर, मो.नं. ९८५०९५४५४८

**मयत**
रमेश नारायण तांबे (मयत दिनांक ०५/१०/२०२१)

वरील अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार नं.१ ते ४ हे मयत रमेश नारायण तांबे यांचे वारस असुन अर्जदारांना IndusInd Bank शाखा अहमदनगर यांचेकडे जमा असलेली रक्कम मिळणेकामी अर्जदारांनी बँकेकडे रकमेची मागणी केली असता अर्जदारांना मयत रमेश नारायण तांबे यांचे इंडियन सक्सेशन ॲक्ट प्रमाणे वारस प्रमाणपत्राची मागणी करण्यात आली त्यामुळे सदरचा अर्ज मयत रमेश नारायण तांबे यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदरील वादासंबंधी कुणाचेही काही म्हणणे असेल किंवा कुणाची काही हरकत असेल तर या जाहिर नोटिस प्रसिध्द तारखेपासुन एक महिण्याचे आत अथवा दि. २३/०९/२०२६ रोजी या न्यायालयात स्वतः अगर वकिलांमार्फत सर्व कागदपत्रानिशी उपस्थित राहुन आपले लेखी म्हणणे सादर करावे. तसेच उपस्थित राहण्यास कसुर केल्यास सदरील अर्जाची एकतर्फा सुनावणी होवुन योग्य तो हुकुम केला जाईल याची नोंद घ्यावी.

आज दि. १२/०८/२०२६ रोजी माझी सही निशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी नोटिस दिली असे.

नेवासा
नेमलेली तारीख २३/०९/२००२६

शिक्का

**हुकुमावरुन**
**तयार करणार** **सहाय्यक अधिक्षक**
**कनिष्ठ लिपिक** **सह दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, नेवासा**

## पान १ वरुन

### शिरूरजवळ चार वाहनांचा भीषण अपघात

काही काळ घबराटीचे वातावरण निर्माण झाले. अपघातामुळे महामार्गावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली. वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याने प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. घटनेची माहिती मिळताच वाहतूक पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून अपघातग्रस्त वाहने बाजूला केली आणि वाहतूक सुरळीत केली.

दरम्यान, अपघातानंतर कंटेनर चालक कंटेनरसह घटनास्थळावरून फरार झाल्याची माहिती आहे. अपघात नेमका कोणत्या कारणामुळे झाला, कंटेनरची भूमिका काय होती ? फरार चालक कोण आहे? याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे.

शिरूर परिसरातून पुणे-अहिल्यानगर मार्गावर मोठ्या प्रमाणावर वाहनांची वर्दळ असते. या मार्गावर वारंवार होणाऱ्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर वाहतूक सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. दरम्यान, किशोर यादव यांच्या आकस्मिक निधनाची बातमी वाडेगव्हाण गावात समजताच शोककळा पसरली. एक उद्योजक म्हणून परिसरात परिचित असलेल्या यादव यांच्या निधनाने कुटुंबीय, नातेवाईक, मित्रपरिवार आणि ग्रामस्थांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे.

### २०हून अधिक आरोपींच्या मुसक्या आवळल्या

सुतगिरणी फाटा परिसरातील दोन भंगार दुकानांची झडती घेताना अनेक चारचाकी वाहने, ट्रॅक्टर, इंजिने, गिअर बॉक्स, टायर्स, वाहनांचे दरवाजे, काचा, लाईट व रेडिएटर असा मोठा साठा मिळून आला. अन्य दोन दुकानांतही वाहनांचा संशयास्पद साठा आढळला. या प्रकरणी एकूण चार स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले असून, संबंधित वाहने कोठून आली, कोणाकडून खरेदी केली आणि त्यांची कागदपत्रे कुठे आहेत, याचा पुढील तपास केला जाणार आहे.
अवैध दारूची विक्री व वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध ४० गुन्हे दाखल करून मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच मटका व जुगार खेळणाऱ्यांविरुद्ध १८ गुन्हे दाखल करण्यात आले. पोलिसांच्या या एकाच दिवसातील कारवाईमुळे अवैध धंदे करणाऱ्यांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. रस्त्यावर बेशिस्त वाहन चालविणे, फॅन्सी नंबर प्लेट, ब्लॅक फिल्म, सीट बेल्ट न लावणे आदी नियमभंग करणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध ३२२ मोटार वाहन कायद्यान्वये कारवाया करण्यात आल्या. त्यातून २ लाख ५ हजार ५०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. मद्यप्राशन करून वाहन चालविणाऱ्यांविरुद्धही स्वतंत्र कारवाई करण्यात आली. ऑल आऊट ऑपरेशनदरम्यान कोपरगाव तालुका आणि राहुरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत दोन सराईत गुन्हेगारांकडून धारदार लोखंडी तलवारी जप्त करण्यात आल्या. दोघांविरुद्ध शस्त्र अधिनियमांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे, संबंधित उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस निरीक्षक व सर्व पोलीस ठाण्यांच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी ही कारवाई केली.

### उसापासून इथेनॉल निर्मितीवर निर्बंध?

मोलॅसिसपासून इथेनॉल निर्मिती थांबविण्यास कारखान्यांना सांगू शकते. त्याऐवजी कमी साखरेचे प्रमाण असलेल्या सी-हेवी मोलॅसिसपासूनच इथेनॉल निर्मिती करण्याची परवानगी कारखान्यांना मिळण्याची शक्यता आहे. कारखान्यांसाठी यंदा साखरच फायद्याची? केंद्र सरकारने आधीच साखर निर्यातीवर बंदी घातली आहे. तसेच मागील महिन्यात विक्रेत्यांवर साठा मर्यादाही लागू केली आहे. आता इथेनॉल निर्मितीवर निर्बंध येण्याची शक्यता आहे. मात्र या निर्बंधाचा कारखान्यांना फारसा तोटा होण्याची शक्यता नाही. कारण यंदा इथेनॉल निर्मितीपेक्षा साखर उत्पादन करून विकणे अधिक फायदेशीर ठरणार आहे, असे साखर उद्योगातील जाणकारांनी सांगितले.

इथेनॉल निर्मितीसाठी मका, तांदळाचा पर्याय इथेनॉल निर्मितीसाठी उसाच्या वापरावर निर्बंध आल्यास पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल मिश्रणाचे अर्थात ई-२० धोरण कायम ठेवण्यासाठी मका आणि तांदळाचा वापर वाढवावा लागणार आहे. उसाचा वापर जेवढा कमी होईल, तेवढ्या प्रमाणात मका आणि तांदळाची गरज वाढेल. देशात सध्या मका आणि तांदळाचा साठा मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे.

### धीरज परदेशी खुनातील आरोपीचे घर पाडण्यास हायकोर्टाची स्थगिती

उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली. संबंधित इमारतीच्या बांधकामाच्या आवश्यक परवानग्या उपलब्ध असून ग्रामपंचायतीचा कर नियमितपणे भरत असून, आवश्यक परवानग्या प्रशासनाकडे सादर केलेल्या असतानाही, मंगळवारी सकाळी जेसीबी मशीनच्या साहाय्याने कथित अतिक्रमण काढण्यासाठी प्रशासनाकडून कार्यवाही सुरू करण्यात आली होती, असा युक्तिवाद याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी न्यायालयात केला. याची दखल घेत न्यायमूर्ती नितीन बी. सूर्यवंशी आणि न्यायमूर्ती आबासाहेब डी. शिंदे यांच्या खंडपीठाने पुढील आदेश येईपर्यंत याचिकाकर्त्याच्या संबंधित मिळकतीवर पाडकामासारखी कोणतीही सक्तीची कारवाई करू नये, असे आदेश दिले आहेत. पुढील सुनावणी दि. ८ सप्टेंबर रोजी होणार आहे.

### महाराष्ट्रात १ कोटी ८० लाख मतदार अपात्र?

जाणार आहे. राजकीय पक्षांच्या बूथस्तरीय प्रतिनिधींनी तसेच नागरिकांनी या याद्यांची पाहणी करावी. यादीत आपले किंवा परिचित पात्र मतदाराचे नाव चुकीने समाविष्ट झाले असल्यास त्याबाबत तातडीने संबंधित निवडणूक अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून देता येणार आहे. गणना पत्र भरून देण्यासाठी सध्या संबंधित नागरिक त्या ठिकाणी वास्तव्यास असणे महत्त्वाचे आहे. २००२ च्या मतदार यादीतील मॅपिंग किंवा जुळवणी झाली नसली अथवा आवश्यक कागदपत्रे सध्या उपलब्ध नसली तरी गणना पत्र भरून देण्यास नागरिकांनी टाळाटाळ करू नये. आवश्यक कागदपत्रे नंतर सादर करण्याची संधी उपलब्ध आहे. गणना पत्रातील वैयक्तिक माहितीमध्ये नाव, मोबाईल क्रमांक, आई-वडिलांची नावे तसेच उपलब्ध असल्यास आधार क्रमांकाची माहिती भरावी आणि गणना पत्रावर स्वाक्षरी करावी. कुटुंबातील प्रौढ व्यक्तीलाही कुटुंबातील सदस्याच्या वतीने स्वाक्षरी करता येऊ शकते. तसेच या याद्या दररोज अद्ययावत केल्या जाणार असल्याने अंतिम मुदतीपूर्वी त्यांची नियमित पाहणी करण्याचे आवाहन चोक्कलिंगम यांनी केले. प्रारुप मतदार यादी २४ ऑगस्टला प्रसिद्ध होणार असून त्यानंतर महिनाभर प्रारुप यादीच्या अनुषंगाने दावे हरकती दाखल करण्यास संधी दिली जाणार आहे. २७ ऑक्टोबरला अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होणार आहे.

## वाळू वाहतूक करणारी गाडी दंडाविना सुटली महसूल प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी :** दाढ बुद्रुक परिसरातून अवैधरीत्या वाळू वाहतूक केल्याचा आरोप असलेली गाडी पकडल्यानंतर ती कोणताही दंड न करता सोडण्यात आल्याने महसूल प्रशासनाच्या कारवाईवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सदर गाडी प्रवरा बँकेच्या पदाधिकाऱ्यांशी संबंधित असल्याची माहिती असून, आश्वी परिसरातील म्हसे यांच्या मालकीची असल्याचे सांगितले जात आहे. दाढ बुद्रुक परिसरात मोठ्या प्रमाणात अवैध वाळू उपसा सुरू असल्याचा आरोप स्थानिकांकडून केला जात आहे. याच पार्श्वभूमीवर रात्री दाढ बुद्रुक येथील पुलावर वाळू वाहतूक करणारी ही गाडी पकडण्यात आली. त्यानंतर संबंधित गाडी आश्वी पोलीस ठाण्यात जमा करण्यात आली होती. मात्र, काही कालावधीनंतर सदर गाडी सोडण्यात आल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे, तहसीलदारांकडून कोणताही दंड वसूल न करता गाडी सोडण्यात आल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे ही गाडी नेमकी कोणाच्या आदेशावरून सोडण्यात आली? तहसीलदारांना गाडी सोडण्यासाठी कोणाचा फोन आला होता? महसूल प्रशासनाने कारवाई न करण्याचा निर्णय कोणत्या आधारावर घेतला? असे प्रश्न उपस्थित झाले आहेत. एकीकडे अवैध वाळू उपशावर कारवाई करण्याचे प्रशासनाकडून सांगितले जाते, तर दुसरीकडे पकडलेली वाळू वाहतुकीची गाडी दंडाविना सोडली जात असल्याने महसूल प्रशासनाच्या भूमिकेबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. या प्रकरणाची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी चौकशी करून गाडी कोणाच्या आदेशावरून सोडण्यात आली आणि संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली, याचा खुलासा करावा, अशी मागणी होत आहे. दरम्यान, सदर गाडी वाळू वाहतुकीसाठी वापरली जात होती की नाही, तसेच गाडी सोडण्याबाबत नेमका कोणता आदेश देण्यात आला, याबाबत महसूल प्रशासनाची अधिकृत भूमिका अद्याप स्पष्ट झालेली नाही.

# एसटी बसमधील ३० प्रवाशांचा जीव मुठीत!

## संभाजीनगर-गारज मार्गावर सात-आठ वेळा अपघाताचा प्रसंग ; वैजापूरात चालक पोलिसांच्या ताब्यात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** सुरक्षित आणि विश्वासार्ह प्रवासाचे साधन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या एसटी बसमधून प्रवास करणाऱ्या २५ ते ३० प्रवाशांना बुधवारी अक्षरशः जीव मुठीत धरून प्रवास करावा लागला. वाशिम-नालासोपारा मार्गावरील बसने छत्रपती संभाजीनगर ते गारज या सुमारे ४० किलोमीटरच्या अंतरात सात ते आठ वेळा अपघाताची परिस्थिती निर्माण केल्याचा आरोप प्रवाशांनी केला. वैजापूर बसस्थानकात बस पोहोचताच संतप्त प्रवाशांनी चालक व वाहकाला जाब विचारला. एमएच १४ एमएच ९८३६ क्रमांकाची ही बस दुपारी दोन वाजता वैजापूरला पोहोचणे अपेक्षित होते. मात्र ती सायंकाळी चारच्या सुमारास दोन तास उशिराने दाखल झाली. प्रवाशांच्या म्हणण्यानुसार, बस भरधाव वेगाने चालविण्यात आली. काही वेळा अन्य वाहनांना धडकण्याची परिस्थिती निर्माण झाल्याने प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण होते. गारज परिसरात चालक प्रशांत कोलसे यांच्याकडून वाहकाने बस चालविण्याची जबाबदारी घेतल्याचे प्रवाशांनी सांगितले. दरम्यान, चालकाच्या तोंडातून दारूचा वास येत असल्याचा आरोप काही प्रवाशांनी केला. त्यानंतर महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी अल्कोहल टेस्टरद्वारे तपासणी करण्याचा प्रयत्न केला. मात्र चालकाने तपासणीस सहकार्य केले नसल्याने त्याला वैजापूर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. या घटनेनंतर प्रवाशांनी बसने पुढील प्रवास करण्यास नकार दिला. अखेर एसटी प्रशासनाने सर्व प्रवाशांची दुसऱ्या बसने व्यवस्था केली.

> **चालकाने मद्यप्राशन तपासणीस सहकार्य केले नाही. त्याला पोलिसांच्या ताब्यात देऊन वैद्यकीय तपासणीसाठी रुग्णालयात पाठविण्यात आले आहे. प्रवाशांना दुसऱ्या बसने रवाना केले.**
> **- गोपाल पगारे,**
> **सहायक वाहतूक अधीक्षक, वैजापूर**



## श्री शनैश्वर मुलांच्या वसतिगृहास वाढदिवसानिमित्त ७० झाडांची भेट

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनई :** श्री क्षेत्र शनिशिगंनापूर येथील शनैश्वर मुलांच्या वसतिगृहास सामाजिक कार्य म्हणून बाबासाहेब सातकर यांनी वाढदिवसानिमित्त पर्यावरण संवर्धनाचा अनोखा संदेश देत सामाजिक विचारावत बाबासाहेब सातकर यांनी आपल्या वाढदिवसाच्या निमित्त साधून एक उपक्रम म्हणून शिक्षक दत्तात्रय जायगुडे व शिक्षक सीताराम तुवर यांच्या प्रमुख उपस्थित वसतिगृहास भेट स्वरूपात ७० झाडे देण्यात आली.वाढदिवसाचा आनंद केवळ उत्सवापुरता मर्यादित न ठेवता पर्यावरण संवर्धनासाठी योगदान देण्याच्या उद्देशाने कार्यकर्ते बाबासाहेब सातकर यांनी हा स्तुत्य उपक्रम राबविला. भेट स्वरूपात देण्यात आलेल्या ७० झाडांमुळे वसतिगृह परिसर अधिक हिरवागार व पर्यावरणपूरक होण्यास मोठी मदत होणार आहे. यावेळी विद्यार्थ्यांना झाडांचे महत्त्व, पर्यावरणाचे संरक्षण तसेच वृक्षांचे संगोपन करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी या झाडांची योग्य काळजी घेऊन त्यांचे संगोपन करण्याचा संकल्प यावेळी केला.वाढदिवसानिमित्त झाडे भेट देण्याचा हा उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी असून, पर्यावरण संवर्धनाचा सुंदर संदेश देणारा ठरला. बाबासाहेब सातकर यांच्या या सामाजिक व पर्यावरणपूरक योगदानाचे वसतिगृह प्रशासन, कर्मचारी व विद्यार्थ्यांकडून कौतुक करण्यात आले.



## लाडक्या 'काळुबाई'चा दशक्रिया विधी मुक्या जीवाला कुटुंबीयांची भावपूर्ण श्रद्धांजली

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** माणूस आणि प्राणी यांच्यातील जिव्हाळ्याचे नाते अधोरेखित करणारी घटना नेवासाफाटा येथे घडली. ज्येष्ठ पत्रकार आबासाहेब शिरसाठ यांच्या कुटुंबातील लाडकी 'काळुबाई' या कुत्रीचे रविवार, दि. २ ऑगस्ट रोजी अपघाती निधन झाले. तिच्या निधनाने शिरसाठ कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला. कुटुंबातील सदस्याप्रमाणे जपलेल्या काळुबाईचा मंगळवार, दि. ११ ऑगस्ट रोजी विधिवत दशक्रिया विधी करण्यात आला.

आबासाहेब शिरसाठ यांच्या पत्नी हिराताई यांनी काळुबाईला मुलीप्रमाणे जपले होते. घरातील प्रत्येक व्यक्तीशी तिचे जिव्हाळ्याचे नाते होते. कुटुंबीय बाहेर जाणार असल्याचे समजताच गाडीत सर्वांत आधी जाऊन बसणे, तसेच हिराताई बाजारात जाताना त्यांच्या सोबत जाण्याचा हट्ट करणे, अशा तिच्या अनेक सवयी कुटुंबीयांच्या कायम स्मरणात राहिल्या आहेत.



काळुबाई कुत्री नव्हे, तर आमच्यासाठी लेकच होती. ती आमचे शब्द आणि भावना समजून घ्यायची. तिच्यासारखी प्रेमळ आणि हुशार कुत्री पुन्हा होणार नाही, अशी भावनिक प्रतिक्रिया आबासाहेब शिरसाठ यांनी व्यक्त केली.
दशक्रिया विधीवेळी कुटुंबीयांनी काळुबाईला भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. विधीनंतर परिसरातील भटक्या कुत्र्यांना भोजन देण्यात आले. काळुबाईच्या स्मृतीप्रित्यर्थ केलेल्या या उपक्रमातून शिरसाठ कुटुंबीयांची मुक्या प्राण्यांप्रती असलेली संवेदनशीलता दिसून आली.

## अण्णासाहेब कदम प्रतिष्ठानचे अध्यक्षपदी शेळके उपाध्यक्ष डॉ. कुलकर्णी बिनविरोध

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** राहुरी तालुक्यातील देवळाली प्रवरा येथील 'अण्णासाहेब कदम पाटील शेती व ग्राम विकास प्रतिष्ठान'च्या अध्यक्षपदी अनंत जगन्नाथ शेळके यांची, तर उपाध्यक्षपदी डॉ. भास्कर चंद्रकांत कुलकर्णी यांची बिनविरोध निवड झाली. तसेच प्रतिष्ठानच्या कार्यवाहपदी प्रा. गणेश सोपान भांड आणि कोषाध्यक्षपदी रवींद्र रंभाजी कराळे यांची बिनविरोध निवड झाली आहे.

प्रतिष्ठानच्या सन २०२६ ते २०३१ या पाच वर्षांच्या कार्यकाळासाठी निवडलेल्या कार्यकारी मंडळाच्या पहिल्या मासिक बैठकीत या निवडी करण्यात आल्या. या निवडणुकीसाठी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून अनिल देशपांडे यांनी काम पाहिले.

या बैठकीला जिल्हा संघचालक किशोर आण्णा निर्मळ आणि जिल्हा कार्यवाह प्रा. दीपक जोंधळे यांची प्रमुख उपस्थिती होती.
या वेळी प्रतिष्ठानच्या विश्वस्त मंडळाच्या सदस्यपदी जगदीश कदम, विनायक ढूस, किरण सूर्यवंशी, देवदत्त तांबे आणि अनुराधाताई भुजाडी यांचीही बिनविरोध निवड झाली. हे सर्व नवनिर्वाचित सदस्य या बैठकीला उपस्थित होते. बैठकीच्या शेवटी सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

## नेवासा येथे संत सावता महाराजांची पुण्यतिथी भक्तिमय वातावरणात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** माऊली ज्ञानोबारायांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या नेवासानगरीत दांडाईत मळा येथे श्री संत शिरोमणी सावता महाराजांची पुण्यतिथी भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. श्री संत शिरोमणी सावता महाराज मंदिर प्रतिष्ठाण व सर्व समाजबांधवांच्या वतीने मंगळवारी (दि. ११) या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्त सकाळी ८ ते १० या वेळेत सजविलेल्या ट्रॅक्टरमधून संत सावता महाराजांच्या प्रतिमेची मिरवणूक काढण्यात आली. चौकाचौकात फटाक्यांची आतषबाजी करत मिरवणुकीचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. मिरवणुकीचा समारोप दांडाईत मळ्यातील संत सावता महाराज मंदिराच्या प्रांगणात झाला. यानंतर ह.भ.प. दत्तात्रय महाराज व्यवहारे यांचे प्रवचन झाले. संत सावता महाराजांच्या जीवनकार्याचा आढावा घेत त्यांनी चांगले कर्म करत भगवंताचे नामस्मरण व भक्ती करण्याचा संदेश दिला.सोहळ्यास संत सेना महाराज मंदिराचे प्रमुख सचिन महाराज पवार, बालब्रह्मचारी स्वामी ज्ञानेश्वरजी महाराज, बाजार समितीचे सभापती नंदकुमार पाटील, नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले, दत्तात्रय गायकवाड, केशव महाराज डौले, भानुदास गटकळ, नगरसेवक स्वप्नील मापारी, दिनेश व्यवहारे, जालिंदर गवळी, संभाजी धोत्रे, नितीन जगताप, राम घोलप यांच्यासह प्रतिष्ठाणचे पदाधिकारी व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संतसेवक संभाजी व्यवहारे व मोहन व्यवहारे यांच्या वतीने भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

## निधन वार्ता

### शिवाजीराव विधाटे



**नेवासा :** तालुक्यातील बाभूळखेडे येथील प्रगतशील शेतकरी शिवाजीराव आसाराम पाटील विधाटे यांचे मंगळवारी (दि.११) अकस्मात निधन झाले. त्यांच्या पश्चात पाच भाऊ, दोन बहिणी, पत्नी, दोन मुले, तीन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

## दोन लाखांपर्यंतच्या कर्जमाफीबाबत माजी आ. राणे यांचा शेतकऱ्यांशी संवाद

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** महालगाव परिसरात माजी आमदार तथा भाजपचे प्रदेश सरचिटणीस सुनील राणे यांनी बुधवारी (दि. १२) थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर दोन लाखांपर्यंतच्या शेतकरी कर्जमाफी योजनेबाबत शेतकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी कर्जमाफीचा लाभ मिळताना येणाऱ्या अडचणी, पात्रता, अर्ज प्रक्रिया तसेच प्रत्यक्ष लाभ मिळाला आहे की नाही, याची सविस्तर माहिती शेतकऱ्यांकडून जाणून घेतली.

शेतकरी संवादादरम्यान अनेक शेतकऱ्यांनी कर्जमाफीसंदर्भातील विविध समस्या मांडल्या. काहींनी तांत्रिक अडचणी, अपात्र ठरणे, बँक स्तरावरील अडथळे तसेच कर्जमाफीची रक्कम अद्याप खात्यात जमा न झाल्याच्या तक्रारी मांडल्या.



यावेळी सुनील राणे यांनी शेतकऱ्यांचे प्रश्न शासन व संबंधित अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचवून त्यांचे निराकरण करण्यासाठी पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. शासनाच्या कर्जमाफी योजनेचा लाभ प्रत्येक पात्र शेतकऱ्याला मिळावा, यासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात येतील, असे त्यांनी सांगितले.

यावेळी मराठवाडा संयोजक नितीन काळे, किरण पाटील, नगराध्यक्ष दिनेश परदेशी, भाजप जिल्हाध्यक्ष संजय खंबायते, जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश गलांडे, तालुकाध्यक्ष संदीप ठोंबरे, पंचायत समिती सदस्य देविदास सामसे, राहुल आल्हाट, बाजार समितीचे संचालक रजनिकांत नजन, सिताराम भराडे, नितीन जोशी, भीमाशंकर तांबे,गणेश चव्हाण, संदिप गायकवाड,अमोल मलिक, नवनाथ गायकवाड, अमोल गलांडे, विशाल शेळके, गणेश शेळके,जिल्हा बँकेचे भागचौकसनीस कल्याण तांबे, महालगाव सोसायटीचे चेअरमन बापुसाहेब शेळके, उपाध्यक्ष दौलत आहेर, संचालक मंडळाचे सदस्य, ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच, सदस्य, परिसरातील शेतकरी, स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गजानन थोरात यांच्या जातवंत गाईची किंमत तब्बल २ लाख २१ हजार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** शेतीला जोडधंदा म्हणून केला जाणारा दुग्ध व्यवसाय वाढत्या खर्चामुळे परवडत नसल्याची ओरड असताना, राहुरी तालुक्यातील मानोरी येथील तरुण शेतकरी गजानन थोरात यांनी आपल्या मेहनतीतून आणि योग्य नियोजनातून दुग्ध व्यवसायात वेगळी ओळख निर्माण केली आहे. थोरात यांच्या जातवंत गाईला तब्बल २ लाख २१ हजार रुपयांचा भाव मिळाला. या गाईला निरोप देताना ग्रामस्थांनी वाजतगाजत मिरवणूक काढत आनंद व्यक्त केला.

गजानन थोरात यांनी गाईचे योग्य संगोपन, संतुलित आहार, नियमित आरोग्य तपासणी आणि स्वच्छतेची विशेष काळजी घेतली. जातवंत आणि अधिक दूध देणाऱ्या या गाईची दूध देण्याची क्षमता तब्बल ४० लिटरपर्यंत असल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे या गाईला बाजारात चांगली मागणी मिळाली आणि खरेदीदाराने गाईला तब्बल २ लाख २१ हजार रुपये मोजले. गाईच्या विक्रीची माहिती समजताच मानोरी ग्रामस्थांनी



मोठी गर्दी केली. गाईची विधिवत पूजा करण्यात आली. फुलांचा हार घालून तिचा सन्मान करण्यात आला. त्यानंतर डीजेच्या तालावर गुलालाची उधळण करत गावातून गाईची भव्य मिरवणूक काढण्यात आली.
दुग्ध व्यवसायात केवळ जनावरांची संख्या वाढवण्यापेक्षा चांगल्या जातीची निवड, संतुलित आहार, स्वच्छता, आरोग्याची काळजी आणि नियमित संगोपन महत्त्वाचे असल्याचे पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. बाबासाहेब आढाव, डॉ.योगेश आढाव यांनी सांगितले. जिद्द, चिकाटी आणि योग्य नियोजनातून दुग्ध व्यवसायातून चांगले उत्पन्न मिळू शकते. गजानन थोरात यांचे यश तरुण शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी असल्याचे त्यांनी नमूद केले.
वाढत्या खर्चामुळे अनेक शेतकरी दुग्ध व्यवसायाकडे पाठ फिरवत असताना थोरात यांनी जातवंत पशुधनाचे योग्य संगोपन करून या व्यवसायातून चांगले उत्पन्न मिळवता येते, हे दाखवून दिले आहे. त्यांच्या या यशाची परिसरात चर्चा होत आहे.
या मिरवणुक प्रसंगी बापुसाहेब वाघ, नवनाथ थोरात, अशोक थोरात, आण्णासाहेब तोडमल, किरण भिंगारे, मनोज ठुबे, भाऊसाहेब वाकचौरे, सिकंदर पठाण,सोमनाथ वाघ, ज्ञानेश्वर थोरात, बालु भिंगारे, आब्बास पठाण, कार्तिक घाडगे,अमोल पिले,अभिजीत चोथे आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शिवा ट्रस्ट शैक्षणिक संकुलात व्यसनमुक्ती जनजागृतीला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वडाळा महादेव :** भारत सरकारच्या नशामुक्त राष्ट्रीय जनजागृती अभियान व 'मिशन स्पंदन' अंतर्गत प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय, श्रीरामपूर यांच्या वतीने शिवा ट्रस्ट शैक्षणिक संकुल, वडाळा महादेव येथे नशामुक्ती जनजागृती व सामूहिक प्रतिज्ञा सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संचालक दिलीपदादा पवार होते.यावेळी प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाचे काकडे दादा, मंदादीदी, हेमलतादीदी व छायादीदी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. व्यसनांपासून दूर राहून राजयोग व नैतिक मूल्यांच्या आधारे सक्षम होण्याचे आवाहन त्यांनी केले. विद्यार्थ्यांनी स्वतः जागरूक राहून परिसर व्यसनमुक्त ठेवण्याचा संकल्प केला. यावेळी विद्यार्थी व शिक्षकांनी 'व्यसनाला नाही म्हणा, जीवनाला हो म्हणा' अशी सामूहिक प्रतिज्ञा घेतली.शिवा ट्रस्ट शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष डॉ. बाळासाहेब पवार यांनी शैक्षणिक संस्थांमध्ये नशामुक्तीविषयी सातत्याने उपक्रम, व्याख्याने व कार्यशाळांचे आयोजन करण्याचे आवाहन केले.या अभियानास संचालक दिलीप पवार, शरदचंद्रजी पवार होमिओपथी कॉलेज अँड हॉस्पिटलचे प्राचार्य डॉ. रिजवान अहमद, अजितदादा पवार पॉलिटेक्निक कॉलेजच्या प्राचार्या पूनम बोधक, प्रतिभाताई पवार कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य वैभव जाधव, सुप्रियादीदी सुळे कॉलेज ऑफ नर्सिंगचे प्राचार्य प्रशांत वाघमारे, शिवांजली कॉलेज ऑफ फिजिओथेरपीच्या डॉ. तमन्ना खान यांच्यासह विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन खान मुस्कान यांनी केले.




सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

**गुरुवार दि . १३ ऑगस्ट २०२६**

### मिलनम डे

| उदय-अस्त | | | सिंगल ५-१-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १५९<br>२३०<br>७८० | ५-२ | १२९<br>४८०<br>६६० | जोड<br>५९-९२-१८-७०-२४ |

### कल्याण

| उदय-अस्त | | | सिंगल ९-४-५ मजबुत |
|---|---|---|---|
| १९०<br>१२५<br>११६ | ०-८ | १९०<br>२८०<br>४६० | जोड<br>८४-१०-२५-९७-०३ |

### मुंबैम (मेन)

| उदय-अस्त | | | सिंगल ४-७-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १२६<br>४५०<br>९०६ | ९-१ | १३७<br>३८०<br>११९ | जोड<br>९७-२१-३४-०८-१५ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 20/04/2026 to 27/04/2026 | 578 00 127 | 889 58 459 | 122 53 355 | 557 71 380 | 349 68 378 |
| 27/04/2026 to 04/05/2026 | 358 63 120 | 440 85 780 | 160 71 128 | 679 29 199 | 688 27 250 |
| 04/05/2026 to 11/05/2026 | 179 71 399 | 148 34 680 | 239 48 279 | 246 25 258 | 240 66 259 |
| 11/05/2026 to 18/05/2026 | 566 79 270 | 370 09 234 | 600 68 233 | 190 01 128 | 477 85 159 |
| 18/05/2026 to 25/05/2026 | 890 79 450 | 568 96 178 | 147 22 129 | 788 30 488 | 289 93 256 |
| 25/05/2026 to 01/06/2026 | 560 11 290 | 346 37 133 | 890 78 468 | 190 05 258 | 460 06 556 |
| 01/06/2026 to 08/06/2026 | 440 89 135 | 990 80 127 | 260 82 570 | 128 11 290 | 590 48 134 |
| 08/06/2026 to 15/06/2026 | 456 56 123 | 556 67 188 | 458 76 466 | 240 69 379 | 689 33 139 |
| 15/06/2026 to 19/06/2026 | 119 15 249 | 348 50 136 | 158 42 390 | 257 41 245 | 126 90 677 |
| 22/06/2026 to 29/06/2026 | 366 21 245 | 118 04 158 | 689 33 779 | 168 55 249 | 579 19 289 |
| 29/06/2026 to 03/07/2026 | 144 95 249 | 127 04 789 | 257 47 269 | 157 34 266 | 255 22 679 |
| 06/07/2026 to 13/07/2026 | 558 84 356 | 120 36 790 | 237 21 470 | 150 60 136 | 277 69 144 |
| 13/07/2026 to 20/07/2026 | 130 41 155 | 680 47 368 | 128 18 350 | 379 90 136 | 150 63 300 |
| 20/07/2026 to 27/07/2026 | 360 96 114 | 277 64 770 | 259 60 145 | 189 81 579 | 179 78 170 |
| 27/07/2026 to 03/08/2026 | 259 60 550 | 590 42 228 | 358 62 390 | 400 47 890 | 160 70 488 |
| 03/08/2026 to 10/08/2026 | 234 90 569 | 170 8 | | | |

# साळवे कुटुंबीय हल्ला प्रकरण : खोटा गुन्हा 'ब फायनल' करण्याची मागणी



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले)चे अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष सुनिल साळवे यांच्या कुटुंबावर झालेल्या हल्ल्याच्या प्रकरणात त्यांच्या कुटुंबीयांना अद्यापही टोळीतील आरोपींकडून जीवितास धोका असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच साळवे कुटुंबाविरुद्ध दाखल करण्यात आलेला कथित खोटा गुन्हा 'ब फायनल' करून जखमी कुटुंबीय व साक्षीदारांना तातडीने पोलीस संरक्षण देण्यात यावे आणि गुन्ह्यातील काही फरार आरोपींना तात्कळ अटक करण्याची मागणी रिपब्लिकन पक्षाच्या शिष्टमंडळाने जिल्हा पोलीस अधीक्षक सुदर्शन मुम्मका यांच्याकडे निवेदनाद्वारे केली. यावेळी जिल्हाध्यक्ष सुनिल साळवे, शहराध्यक्ष किरण दाभाडे, सतीश मगर, अविनाश भोसले, उत्कर्ष भालेराव, शुभम गायकवाड, राजेंद्र मगर, आदेश साळवे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

निवेदनात करण्यात आलेल्या आरोपानुसार, २४ ऑगस्ट २०२५ रोजी रात्री सुमारे ११ वाजता टोळीतील काही व्यक्तींनी सुनिल साळवे यांच्या कुटुंबातील यशदीप संपत साळवे व आदर्श साळवे यांच्यावर हल्ला केला.

# आ. जगताप, कर्डिले, पडळकर, भंडारेंविरोधात कारवाईची मागणी

## धीरजसिंह परदेशी हत्या प्रकरणात एमआयएमची तक्रार

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर : अहिल्यानगर महापालिकेच्या विद्युत विभागातील कंत्राटी कर्मचारी धीरजसिंह राजपूत ऊर्फ परदेशी यांच्या हत्या प्रकरणानंतर झालेल्या सभेत मुस्लिम समाजाविरोधात कथित आक्षेपार्ह आणि भडकावू वक्तव्ये केल्याचा आरोप करत ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन (एमआयएम)ने कायदेशीर कारवाईची मागणी केली आहे. एमआयएमचे अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष डॉ. परवेज अशरफी यांनी यासंदर्भात पोलिस महासंचालक, जिल्हाधिकारी आणि पोलिस अधीक्षकांना पत्र देत आमदार संग्राम जगताप, भाजप आमदार अक्षय कर्डिले, आमदार गोपीचंद पडळकर आणि संग्रामबापू भंडारे महाराज यांच्याविरोधात गुन्हे दाखल करण्याची मागणी केली आहे.**

डॉ. अशरफी यांनी आपल्या पत्रात पोलिस अधीक्षक कार्यालयासमोरील चौकात पोलिस अधिकारी आणि प्रशासनाच्या उपस्थितीत मुस्लिम समाजाविषयी कथित आक्षेपार्ह वक्तव्ये झाल्याचा दावा केला आहे. या वक्तव्यांमुळे दोन समाजांमध्ये तेढ निर्माण होऊन कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

**'धीरजसिंह यांच्या हत्येचा निषेध; मात्र त्याचे राजकारण नको'**

धीरजसिंह राजपूत यांच्या हत्येचा निषेध करताना या प्रकरणात पोलिसांकडून सुरू असलेल्या कारवाईचे स्वागत असल्याचे डॉ. अशरफी यांनी म्हटले आहे. मात्र, हत्येच्या घटनेचे राजकारण करून मुस्लिम अल्पसंख्याक समाजाला लक्ष्य केले जात असल्याचा आरोप त्यांनी केला. धीरजसिंह यांना न्याय मिळायलाच हवा. मात्र, त्यांच्या हत्येसाठी संपूर्ण मुस्लिम समाजाला जबाबदार धरण्याचा प्रयत्न करणाऱ्यांवरही कायदेशीर कारवाई झाली पाहिजे, अशी भूमिका त्यांनी मांडली.

**महामार्ग रोखल्याचा आणि ध्वनीप्रदूषणाचा आरोप**

धीरजसिंह यांच्या हत्येनंतर आमदार संग्राम जगताप, आमदार गोपीचंद पडळकर, आमदार अक्षय कर्डिले, संग्रामबापू भंडारे महाराज यांच्यासह इतरांनी पुणे-अहिल्यानगर-छत्रपती संभाजीनगर राष्ट्रीय महामार्गावर आंदोलन केल्याचा दावा डॉ. अशरफी यांनी केला आहे. हा महामार्ग पाच तासांपेक्षा अधिक काळ रोखण्यात आल्याचा तसेच पूर्वपरवानगी किंवा पूर्वसूचना न देता रस्ता अडवल्याचा आरोपही त्यांनी केला. याशिवाय, आंदोलनादरम्यान ध्वनीप्रदूषण झाल्याचा आरोप करत या संपूर्ण प्रकाराची प्रशासनाने चौकशी करावी, अशी मागणी एमआयएमकडून करण्यात आली आहे.

**'दोन समाजांमध्ये तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न?'**

मुस्लिम समाजाला लक्ष्य करत पाकिस्तान आणि बांगलादेशात पाठविण्याची भाषा, तसेच हिंसक वक्तव्ये करण्यात आल्याचा दावा डॉ. अशरफी यांनी केला आहे. अशा प्रकारच्या वक्तव्यांमुळे दोन धर्मांमध्ये संघर्ष निर्माण होण्याची भीती त्यांनी व्यक्त केली. धीरजसिंह यांना न्याय मिळवून देण्याऐवजी त्यांच्या हत्येचा राजकीय फायदा घेण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोपही त्यांनी केला. जमलेल्या युवकांना अधिक भडकवण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

**प्रशासनाच्या कारवाईकडे लक्ष**

एमआयएमने केलेल्या या तक्रारीनंतर पोलिस आणि प्रशासनाकडून नेमकी कोणती कारवाई केली जाते, याकडे आता लक्ष लागले आहे. तक्रारीतील आरोपांची चौकशी करून संबंधित वक्तव्ये, व्हिडिओ आणि सभेच्या पार्श्वभूमीची पडताळणी झाल्यानंतर पुढील कायदेशीर निर्णय होण्याची शक्यता आहे. दरम्यान, धीरजसिंह राजपूत यांच्या हत्या प्रकरणाचा तपास आणि त्यानंतर निर्माण झालेला राजकीय व सामाजिक तणाव या दोन्ही मुद्द्यांवर प्रशासनासमोर कायदा-सुव्यवस्था राखण्याचे आव्हान निर्माण झाले आहे.

## द•ख•ल

### भाळवणी परिसरात केबल चोरांचा सुळसुळाट

**भाळवणी :** गेल्या पंधरा दिवसांपासून पारनेर तालुक्यातील भाळवणी व परिसरातील वाडीवस्तीवरील विद्युत पंपांच्या केबल चोरीच्या घटना घडत असून पंधरा दिवसांत सलग दुसऱ्यांदा नगर- कल्याण राष्ट्रीय महामार्गावरील नागबेंदवाडी, कपाळे मळा, पिराचा मळा रस्ता या परिसरात अनेक शेतकऱ्यांच्या विहिरीवरील विद्युत पंपांच्या केबल अज्ञात चोरट्यांनी रात्रीच्या सुमारास चोरुन नेल्या असुन चोरट्यांचा तपास लावण्याची मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे. सततच्या या केबल चोरीच्या घटनांमुळे शेतकऱ्यांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले असून आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. पोलीस प्रशासनाने रात्रीची गस्त वाढविण्याची मागणी ग्रामस्थांकडून करण्यात आली आहे.

### राहुल शेलार यांना पी.एच.डी. पदवी प्रदान



**अहिल्यानगर :** येथील 'ड्रम सेंटर' या स्टुडिओचे संचालक तथा 'पडघम' वाद्य संगीताचे ध्वनीमुद्रण आणि तांत्रिक शिक्षण क्षेत्रात कार्यरत असलेले डॉ. राहुल शेलार यांनी मराठी साहित्य संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करीत, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची विद्यावाचस्पती (पी.एच.डी.) पदवी प्राप्त केली आहे. विद्यापीठाकडून पदवी जाहीर झाल्याचे अधिकृत पत्र नुकतेच त्यांना प्राप्त झाले आहे. त्यांच्या या यशामुळे शैक्षणिक, साहित्यिक आणि सामाजिक क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागात त्यांचा नुकताच सत्कार करण्यात आला. यावेळी पेमराज सारडा महाविद्यालय अहिल्यानगरच्या प्राचार्या डॉ. माहेश्वरी गावित, बहिस्त परिक्षक प्रा. डॉ. उमेश मुंडे, मार्गदर्शक प्रा. डॉ. अशोक डोळस, मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. तुकाराम रोंगटे आदि मान्यवर उपस्थित होते.

### बोल्हेगाव येथे जुगार अड्ड्यावर छापा
### ६ जणांवर गुन्हा; ७० हजारांचा मुद्देमाल जप्त

**अहिल्यानगर :** शहर आणि परिसरात अवैध धंद्यांविरुद्ध पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला असून तोफखाना पोलिसांनी बोल्हेगाव परिसरातील जुगार अड्ड्यावर धडक छापा टाकला. या कारवाईत पोलिसांनी रोख रकमेसह मोबाईल फोन असा एकूण ७० हजार ८४० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात सहा आरोपींवर जुगार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस हवालदार शाहीद सलीम शेख यांच्या फिर्यादीवरून ही कारवाई करण्यात आली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बोल्हेगाव येथील चोभे कॉलनी, गांधीनगर भागात काही जण स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी तिरट नावाचा हार-जीतचा जुगार खेळत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी मंगळवारी सायंकाळी साडेचार वाजेच्या सुमारास घटनास्थळी छापा टाकला. या कारवाईदरम्यान भाऊसाहेब राफायल बोर्ड, जुबेर शकिल पठाण, अभिषेक उर्फ पप्पू मोहन देठे, दिपक बाळकृष्ण शिरसाठ, सुशील काशिनाथ वाव्हळ आणि प्रदिप प्रभाकर कदम (सर्व रा. गांधीनगर व बोल्हेगाव, अहिल्यानगर) हे स्वतःच्या फायद्यासाठी पैसे लावून जुगार खेळताना आणि खेळवताना रंगेहात मिळून आले. पोलीस पथकाने घटनास्थळावरून ११ हजार ८४० रुपये रोख आणि ५९ हजार रुपये किमतीचे सहा मोबाईल फोन असा एकूण ७० हजार ८४० रुपयांचा ऐवज जप्त केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार चांगदेव आंधळे करत आहेत. शहरात अवैध धंदे चालवणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा पोलीस प्रशासनाने दिला आहे.

### भिंगारमध्ये दुचाकी पेटवली
### ४० वर्षीय महिलेची तक्रार

**अहिल्यानगर :** कॅम्प पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सदर बाजार परिसरात एका दुचाकीला अज्ञात इसमाने पेटवून दिल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी घरकाम करणाऱ्या पोर्णिमा गौतम आठवले यांनी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सदर बाजार येथील शनिमंदिरा जवळ राहणाऱ्या पोर्णिमा आठवले यांची १० हजार रुपये किमतीची होंडा कंपनीची मोपेड दुचाकी (क्रमांक एम.एच. १६ बी.आर. ०८६८) घरासमोर उभी होती. ११ ऑगस्ट रोजी पहाटे १:२० वाजेच्या सुमारास एका अज्ञात इसमाने या दुचाकीवर ज्वलनशील पदार्थ टाकून तिला आग लावली. या आगीत दुचाकीचे मोठे नुकसान झाले आहे. या घटनेनंतर पोर्णिमा आठवले यांनी कॅम्प पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार नोंदवली. त्यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३२६ (फ) नुसार गुन्हा दाखल केला आहे. सदर प्रकरणाचा पुढील तपास पोलीस अंमलदार गारुडकर करत असून, सहाय्यक पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली आरोपीचा शोध सुरू आहे.

# बेलवंडी बु. प्राथमिक आरोग्य केंद्रास जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांची भेट

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



बेलवंडी : श्रीगोंदा तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र, बेलवंडी बु. येथे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बापूसाहेब नागरगोजे व जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. संदीप पुंड यांनी संयुक्त भेट देऊन केंद्रातील विविध आरोग्य सेवा व राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांच्या अंमलबजावणीचा सविस्तर आढावा घेत आरोग्य कर्मचाऱ्यांच्या कामगिरीचे य विशेष कौतुक केले.

या पाहणीदरम्यान २४÷७ आपत्कालीन सेवा, एमएलसी कामकाज, प्रत्यक्ष रुग्णसेवा, परिसराची स्वच्छता, अभिलेख व्यवस्थापन, औषध साठा आणि प्रयोगशाळा सेवांची बारकाईने तपासणी करण्यात आली. तसेच माता-बाल आरोग्य, लसीकरण, कुटुंब नियोजन, टीबी, एनसीडी, कुष्ठरोग निर्मूलन, ॲनिमिया नियंत्रण, पॅलिएटिव्ह केअर आणि 'माझं गाव - आरोग्यसंपन्न गाव' या अभियानांतर्गत सुरू असलेल्या कामांबाबत अधिकारी व कर्मचाऱ्यांना आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले. जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. संदीप पुंड यांनी एमसीएच अंतर्गत गरोदर मातांची तपासणी, प्रसूतीपश्चात काळजी , बालकांचे लसीकरण, संस्थात्मक प्रसूतीचे प्रमाण, उच्च जोखमीच्या मातांचे विशेष व्यवस्थापन व बाल आरोग्य सेवांचा सविस्तर आढावा घेतला. हे कामकाज अधिक सक्षम व प्रभावीपणे राबविण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. एनक्यूएएस अंतर्गत केंद्रात सुरू असलेल्या गुणवत्ता सुधारणा कामांची पाहणी करून रुग्णांना अधिक सुरक्षित व गुणवतपूर्ण सेवा देण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. अभिमन्यू सोनवणे, डॉ. स्नेहल भोसले, परिचारिका सुनिता जाधव, पद्मा इथापे, प्रशांत ठुबे सह सर्व आरोग्य कर्मचाऱ्यांच्या कामगिरीचे यावेळी विशेष कौतुक करण्यात आले.

# मुकुंदनगर, फकिरवाडा व दर्गा दायरा महापालिका हद्दीतून कायमचे वगळा!

## कंत्राटी कर्मचारी धीरज परदेशी हत्या प्रकरण : कामगार युनियन आक्रमक

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** महापालिकेच्या हद्दीतून मुकुंदनगर, फकिरावाडा आणि दर्गा दायरा या भागांना कायमचे वगळण्यात यावे, अशी मागणी महापालिका कामगार युनियनचे माजी अध्यक्ष अनंत लोखंडे यांनी केली आहे. जुलै १९९९ मध्ये झालेल्या हद्दवाढीच्या वेळी इतर ग्रामपंचायतींसोबत या भागांचा महापालिकेत समावेश करण्यात आला होता. इतर भागांबाबत कोणतीही तक्रार नसताना याच भागातून कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेचे व इतर प्रश्न निर्माण होत असल्याने, येत्या तीन दिवसांत महापालिकेची विशेष सभा बोलावून या भागांना हद्दीतून वगळण्याचा ठराव मंजूर करावा आणि तो शासनाकडे पाठवावा, अशी भूमिका युनियनने घेतली आहे.

मुकुंदनगर येथील मारहाणीत पथदिवे दुरुस्तीचा ठेका असलेल्या संस्थेच्या कंत्राटी कर्मचारी धीरज परदेशी यांच्यावर प्राणघातक हल्ला झाला. यात त्याचा मृत्यू झाला. त्याला श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी महापालिकेत कामगार युनियनची सभा झाली. यावेळी युनियनचे अध्यक्ष बाबासाहेब मुदगल, कार्याध्यक्ष जितेंद्र सारसर आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.

अनंत लोखंडे म्हणाले की, युनियन हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन, बौद्ध, शिख अशा कोणत्याही धर्माच्या विरोधात नसून ती नेहमीच माणुसकीच्या आणि न्यायाच्या बाजूने उभी राहते.

मात्र असे असतानाही, धीरज यांच्या हत्येनंतर काही संघटनांनी मौन बाळगल्याप्रकरणी लोखंडे यांनी संताप व्यक्त केला. केवळ आरोपी एका विशिष्ट धर्माचे असल्यामुळे या संघटना मूग गिळून गप्प का आहेत? मुकुंदनगरमधून निवडून आलेले चार नगरसेवक या घटनेवर अवाक्षरही बोलायला तयार नाहीत. त्यांच्या प्रभागात इतर धर्माचे लोक राहात नाहीत का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. युनियन धीरज परदेशीच्या मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा होईपर्यंत लढा देईल, कुटुंबीयांना नुकसान भरपाई मिळवून देणे आणि कुटुंबातील एका सदस्याला शासकीय नोकरी मिळावी यासाठी युनियन सर्वतोपरी प्रयत्न करेल, असे आश्वासनही यावेळी देण्यात आले.

# खारेकर्जुनेत मेजर अमोल पळसकर यांचा सेवापूर्ती सोहळा



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** नायब सुभेदार अमोल पळसकर हे भारतीय सेनेमध्ये सप्लाय कोरमधून २२ वर्ष सेवा करून मूळ गावी खारेकर्जूने (ता.अ.नगर )येथे ढोल ताशाच्या गजरात डीजेवर देशभक्ती गीतामध्ये पंचक्रोशीतील शेकडो आजी-माजी सैनिक वीरणारी वीरपिता गावकऱ्यांच्या साक्षीने गावांमधून ओपन जीपमध्ये वाजत गाजत मिरवणूक काढून फटाकेंच्या आतीसबाजी मध्ये संपूर्ण गावामध्ये सडा रांगोळी काढून उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी जिल्हा बँक संचालक रावसाहेब पाटील शेळके, आंबेजोगाई पीआय देविदास वाघमोडे,आरोग्य अधिकारी संतोष कराळे,त्रिदल सैनिक संघ अहिल्यानगरचे अध्यक्ष संजय मस्के,जिल्हा सैनिक कृती समिती श्रीगोंदा येथील कॅप्टन धारकुंडे,जयहिंद माजी सैनिक संस्थेचे अध्यक्ष मेजर निळकंठ उल्हारे,पारनेर तालुका भूमापन अधिकारी अविनाश ठोकळ मेजर, पोलीस अंमलदार मनोज खैरे,प्रताप तोडमल,ग्राम महसूल अधिकारी अरुण देवकर,वीरनारी संगीता कातोरे,भावनाताई शिंदे,नारायण झिने यांनी शुभेच्छा देऊन सैनिक जीवनावरती अर्थपूर्ण प्रकाश टाकला.

# आनंद भंडारी यांनी घेतला कर्जत पंचायत समितीचा आढावा

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**कर्जत :** सर्वसामान्य नागरिकांसाठी ग्रामपंचायत प्रशासन सेवा देण्यास बांधील असून यासाठी सर्वांनी लोकसेवेसाठी कायम तत्पर असावे. नागरिकांनी कर रुपी दिलेला पैसा गावाच्या विकासासाठीच वापरावा. जेणेकरून गावचा सर्वांगीण विकास इतर गावांना आदर्श वाटेल. ग्रामपंचायतीचे उत्पन्न वाढल्यास गाव समृद्ध बनते यासाठी नागरिकांनी देखील नियमित कर भरण्याकडे लक्ष द्यावे. काही शासकीय योजनेत अधिकारी-कर्मचाऱ्यांनी देखील विशेष लक्ष देत ते लोकाभिमुख कसे होतील याकडे गांभीर्याने पाहावे अशा सूचना अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी दिल्या. ते मंगळवारी कर्जत दौऱ्यावर असताना पंचायत समिती प्रशासनाशी बोलत होते.

अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी मंगळवारी कर्जत तालुका दौऱ्यावर होते. भंडारी यांनी कुळधरण, कोपर्डी, शिंदे येथे भेटी देत ग्रामपंचायत पातळीवरील कामांची पाहणी केली. यावेळी कर्जत पंचायत समितीचे गटविकास अधिकारी अजिंक्य सुर्यवंशी, प्रकल्प संचालिका श्रीमती ठवकर यांच्यासह पंचायत समितीचे सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते. याप्रसंगी जुलै २०२६ मध्ये कर्जत पंचायत समितीच्या सौजन्याने तालुक्यातील ग्रामपंचायती मार्फत ३८ हजार ९६७ वृक्षारोपण करण्यात आले होते याचा आढावा मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी प्रत्यक्ष पाहणी करीत घेतला. यात ७ ग्रामपंचायतीने प्रत्येकी ५ गुंठ्यात मियावाकी घनवन वृक्षलगवाड करीत त्याचे जतन केले. यासह कापरेवाडी ग्रामपंचायतीने ११ एकर क्षेत्रात तब्बल ४ हजार खड्डे खोदत त्यात वृक्ष लागवड मोहीम हाती घेतली आहे. यासह नांदगावात १० एकर क्षेत्रावर ४ हजारच खड्डे खोदत वृक्षलगवाडीची प्रक्रिया सुरू केली आहे. शिंदे ग्रामपंचायतीने याच धर्तीवर १ एकर क्षेत्रावर ४०० वृक्षांची देवराई तयार केली. या सर्व कामाची पाहणीवर आनंद भंडारी यांनी समाधान व्यक्त करीत कौतुक केले. हरीत गाव एक वेगळी ओळख निर्माण करीत असून लागवड केलेली झाडे जतन करण्याबाबत आवश्यक त्या सूचना देखील उपस्थितांना दिल्या.

**शासकीय योजना जनसामान्यांपर्यंत पोहचवा.**

माझ गाव, आरोग्य संपन्न गाव हे आरोग्य विभागाचे अभियान प्रभावीपणे प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये राबवा. ग्रामपंचायत विकास आराखडयात ज्या ठिकाणी अंगणवाडीला विज कनेक्शन नाहीत त्या तात्काळ द्यावी. यावेळी कुळधरण येथील प्राथमिक शाळेस भेट देत विद्यार्थीसह शिक्षकांशी संवाद साधत त्यांच्या अडी-अडचणी मुख्य कार्यकारी अधिकारी भंडारी यांनी समजून घेतल्या.

# आनंदऋषीजी हॉस्पिटल आरोग्याचे मंदिर : अभय पारख

## कान नाक घसा शिबीरास रुग्णांचा प्रतिसाद

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर :** ज्याप्रमाणे माणूस मंदिरात गेल्यानंतर आपले सर्व दु:ख विसरतो त्याप्रमाणेच या आरोग्य मंदिरात रूग्णांना त्याचा प्रत्यय येत आहे. हॉस्पिटलमध्ये मिळणार्या सोयी-सुविधा व मानसिक आधारामुळे रूग्णांचा आजार लवकर बरा होतो, त्यामुळे आज आनंदऋषीजी हॉस्पिटल आरोग्याचे मंदिर झाले आहे. सातत्याने रुग्णांचा मोठा विश्वास या हॉस्पिटलवर वाढत आहे. दुसर्याला मदत करण्याची इच्छा असणे व मदत करणे यात फरक आहे आणि मदत करण्याचे काम आनंदऋषीजी हॉस्पिटल करत आहे. असे प्रतिपादन कॅमल साबुदाणा नगरचे वितरक अभय पारख यांनी केले. जैन सोशल फेडरेशन द्वारा संचलित श्री आनंद ऋषीजी हॉस्पिटल अँड हार्ड सर्जरी सेंटर मध्ये राष्ट्रसंत आचार्य श्री आनंदऋषीजी म.सा. यांच्या १२६ व्या जन्मदिनानिमित्त सौ. इंदुमती अशोक पारख व परिवार प्रायोजित कान नाक घसा शिबीराचे उद्घाटन अभय पारख यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी अतुल पारख, संतोष बोथरा, माणकचंद कटारिया, सुभाष मुनोत, वसंत चोपडा, डॉ.वसंत कटारिया,प्रकाश छल्लानी, डॉ.अतुल तुपे, डॉ.सुकेशिनी गाडेकर, ऑडिओमैटी डॉ.सुरज कर्डीले आदि उपस्थित होते.

याप्रसंगी अतुल पारख म्हणाले, आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये रुग्णांना मिळत असलेल्या सेवेत विश्वासार्हता आहे. त्यामुळे हे हॉस्पिटल गरीब - गरजु रुग्णांकरीता मोफत शिबीरे घेतात त्यामुळे रुग्णांकरीता हे एक वरदान ठरत आहे. ही समाजाच्या दृष्टीने एक चांगली बाब आहे. समाजातील दु:ख निवारण्याचे काम जैन सोशल फेडरेशनच्यावतीने होत आहे. या कार्याची व्याप्ती आणखी वाढून त्याचा जास्तीत जास्त गरजूंना लाभ व्हावा. फेडरेशन करत असलेल्या या मानवसेवेच्या कार्यात आमचाही खारीचा वाटा आहे यापुढेही आमचे नेहमीच सहकार्य राहील, असे सांगितले.

संतोष बोथरा म्हणाले, आम्ही राबवत असलेल्या या शिबीराच्या माध्यमातून दानशूरांच्या पाठींब्यामुळे एक प्रेरणा मिळते. आणि नव्या उमेदीने शिबीरे घेण्यास मदत होते. पारख परिवाराचे काम मोलाचे आहे. या आरोग्य मंदिरात होणार्या शिबिरांमुळे गरीब व गरजु रुग्णांना जो लाभ मिळतो, त्यांचे मोठ समाधान आम्हाला मिळत आहे. रुग्णसेवेत सातत्याने भर पडत आहे, अत्याधुनिक मशिनरीद्वारे उपचार करुन रुग्णांना दिलासा देण्याचे काम सुरु आहे.

याप्रसंगी डॉ.अतुल सुपे म्हणाले, हॉस्पिटलमध्ये कान नाक घसा यासाठी लागणारे सर्व आधुनिक मशिनरी, सर्वोत्तम आयसीयु सेंटर, एच.डी. कॅमेरा, मॉनेटर असून पेशंटची योग्य प्रकारे काळजी घेतली जाते, कानातून पाणी येणे,ऐकू कमी येणे कान, नाक,घसाच्या सर्व शस्त्रक्रिया दुबिणीव्दारे सवलतीच्या दरात केल्या जातात असे सांगितले. या शिबीरात ९० रुग्णांची तज्ञ डॉक्टरांनी तपासणी करुन मार्गदर्शन केले. यावेळी जैन सोशल फेडरेशनतर्फे मान्यवरांचा सत्कार करुन आभार मानले.

## दखल

# कृषी विभागामार्फत पीकस्पर्धा जाहीर

**पुणे :** राज्यामध्ये पिकाची उत्पादकता वाढविण्याच्या उद्देशाने सन २०२६-२७ साठी कृषी विभागामार्फत ९ खरीप पिकांसाठी अन्नधान्य, कडधान्य व गळीतधान्य राज्यांतर्गत पीकस्पर्धा जाहीर करण्यात आली आहे. भात, ज्वारी, बाजरी, मका, नाचणी (रागी), तूर, सोयाबीन, भुईमुग व सुर्यफुल पिकांसाठी ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत अधिकाधिक शेतकऱ्यांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संजय काचोळे यांनी केले आहे.

सर्वसाधारण व आदिवासी गटासाठी तालुकास्तरावरील पिकस्पर्धेमध्ये सहभाग घेऊन शेतकऱ्यांची आलेली उत्पादकता आधारभूत धरून राज्य, जिल्हा व तालुका स्तरावरील स्पर्धेसाठी विजेत्या शेतकऱ्यांची निवड करण्यात येणार आहे. पीक स्पर्धेतील विजेत्यांना तालुकापातळीवर ५ हजार, ३ हजार व २ हजार, जिल्हा पातळीवर १० हजार, ७ हजार व ५ हजार तर राज्य पातळीवर ५० हजार, ४० हजार व ३० हजार रुपये अनुक्रमे पहिले, दुसरे व तिसऱ्या क्रमांकाचे बक्षीस देण्यात येईल. पीकस्पर्धेबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना कृषी विभागाच्या ु.ज्ञअ‍ॅळीहळ.ारहरअ‍ॅरीहींअ‍ॅर.सीं. ळप या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत, असे कृषी विभागामार्फत कळविण्यात आले आहे.

# युवा दिन, हत्ती दिन आणि सूर्यग्रहणामुळे १२ ऑगस्ट विशेष




**कवठे येमाई :** १२ ऑगस्ट हा दिवस आंतरराष्ट्रीय युवा दिन आणि जागतिक हत्ती दिन म्हणून साजरा केला जातो. यंदा याच दिवशी होणाऱ्या संपूर्ण सूर्यग्रहणामुळे दिवसाला विशेष खगोलीय महत्त्व प्राप्त झाले आहे.

तरुणांच्या शिक्षण, रोजगार, कौशल्यविकास, आरोग्य, उद्योजकता आणि सामाजिक सहभागाबाबत जनजागृती करण्यासाठी दरवर्षी १२ ऑगस्ट रोजी आंतरराष्ट्रीय युवा दिन साजरा केला जातो. संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने १९९९ मध्ये या दिवसाला मान्यता दिली. देशाच्या विकासात युवा शक्तीचा सकारात्मक सहभाग वाढविण्याचा संदेश या दिनातून दिला जातो.

जागतिक हत्ती दिनानिमित्त हत्तींचे संरक्षण, नैसर्गिक अधिवासाचे संवर्धन, बेकायदा हस्तिदंत व्यापाराला आळा आणि मानव-हत्ती संघर्ष कमी करण्याबाबत जनजागृती केली जाते. जंगलातील जैवविविधता आणि पर्यावरणाचा समतोल राखण्यात हत्तींची म हत्त्वाची भूमिका असल्याने त्यांच्या अधिवासाचे संरक्षण आवश्यक आहे.दरम्यान, १२ ऑगस्ट २०२६ रोजी संपूर्ण सूर्यग्रहण होत असून त्याचा संपूर्णतेचा पट्टा ग्रीनलँड, आइसलँड, उत्तर रशिया, उत्तर स्पेन आणि पोर्तुगालच्या ईशान्य भागातून जाणार आहे. मात्र हे सूर्यग्रहण भारतातून दिसणार नाही.युवा विकास, वन्यजीव संवर्धन आणि खगोलीय विज्ञानाची जाणीव करून देणारा १२ ऑगस्ट यंदा विशेष ठरत आहे, अशी माहिती प्रा. सुभाष शेटे यांनी दिली.

# अधिक पार्किंग शुल्क आकारणाऱ्या ठेकेदाराला ₹५ हजार दंड

**आळंदी :** येथील चाकण चौक, झाडीबाजार परिसरातील नगरपरिषदेच्या वाहनतळावर निर्धारित दरापेक्षा अधिक पार्किंग शुल्क आकारल्याप्रकरणी वाहनतळ ठेकेदार निशिकांत किरण चव्हाण



यांच्यावर नगरपरिषद प्रशासनाने कारवाई केली आहे. संबंधित ठेकेदाराला पाच हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला असून, दंडाची रक्कम नगरपरिषदेकडे जमा करण्यात आली आहे.

वाहनांच्या प्रकारानुसार नगरपरिषदेने निश्चित केलेल्या दरापेक्षा अधिक शुल्क आकारले जात असल्याच्या नागरिकांच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. तसेच याबाबत दैनिकात प्रसिद्ध झालेल्या वृत्ताचीही नगरपरिषद प्रशासनाने दखल घेतली. त्यानंतर प्रकरणाची चौकशी करून ठेकेदारावर दंडात्मक कारवाई करण्यात आली.

यापुढे वाहनतळावर नगरपरिषदेने निर्धारित केलेल्या दरानुसारच पार्किंग शुल्क आकारण्याच्या सूचना ठेकेदाराला देण्यात आल्या आहेत. पुन्हा अधिक शुल्क आकारल्याचे आढळल्यास वाहनतळाचा ठेका रद्द करून अनामत रक्कम जप्त करण्यात येईल, अशी नोटीसही बजावण्यात आली आहे.

आळंदी नगरपरिषद प्रशासनाचे मुख्याधिकारी माधव खांडेकर यांनी नागरिकांनी वाहनतळावर निर्धारित दरापेक्षा अधिक शुल्क आकारले जात असल्याचे निदर्शनास आल्यास तातडीने नगरपरिषद प्रशासनाला माहिती द्यावी, असे आवाहन केले आहे. नागरिकांकडून अधिक शुल्क आकारले जाऊ नये यासाठी वाहनतळाची नियमित तपासणी करण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

# अल्पवयीनांना वाहन देऊ नका; सुरक्षिततेला प्राधान्य द्या

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**दौंड :** शहरासह ग्रामीण भागात अल्पवयीन मुलांकडून दुचाकी चालविण्याचे प्रमाण वाढत असून, हा वाहतूक सुरक्षेच्या दृष्टीने गंभीर प्रश्न बनला आहे. शाळा, महाविद्यालये, बाजारपेठा आणि प्रमुख रस्त्यांवर अल्पवयीन मुले भरधाव वेगाने दुचाकी चालविताना दिसून येतात. अनेकांकडे वैध वाहन परवाना नसतानाही ते दुचाकी चालवत असल्याने त्यांच्या स्वतःच्या तसेच इतर नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण होत आहे.



शाळा सुटल्यानंतर सकाळी व सायंकाळी अल्पवयीन विद्यार्थी दुचाकीवरून प्रवास करताना दिसतात. काही ठिकाणी एकाच दुचाकीवर तीन-चार जण प्रवास करतात, तर हेल्मेटचाही वापर केला जात नाही. त्यामुळे अपघात झाल्यास गंभीर दुखापत किंवा जीवितहानी होण्याची शक्यता वाढते.

मुलाला वाहन चालविता येते म्हणून तो कायदेशीरदृष्ट्या वाहन चालविण्यास पात्र ठरत नाही. अनुभवाचा अभाव, वाहतूक नियमांची अपुरी माहिती आणि वेगावर नियंत्रण नसल्याने अपघाताचा धोका वाढतो. मुलांच्या हट्टापोटी किंवा सोयीसाठी पालकांनी त्यांच्या हातात दुचाकीची चावी देणे टाळावे. एखादी दुर्घटना घडल्यास त्याचे गंभीर परिणाम संपूर्ण कुटुंबाला भोगावे लागू शकतात.

पालकांनी अल्पवयीन मुलांना वाहन चालविण्यास प्रोत्साहन न देता त्यांच्या सुरक्षिततेला प्राधान्य द्यावे, असे आवाहन नागरिकांकडून करण्यात येत आहे. तसेच वाहतूक पोलिसांनी शाळा, महाविद्यालये आणि प्रमुख चौकांमध्ये विशेष तपासणी मोहीम राबवून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करावी. संबंधित वाहनमालक आणि पालकांची जबाबदारीही निश्चित करावी, अशी मागणी होत आहे.

# भुलेश्वर श्रावणी यात्रेसाठी सज्ज

प्रतिनिधी : राष्ट्र सह्याद्री

माळशिरस : पुरंदर तालुक्याच्या पूर्व भागातील माळशिरस डोंगरावर वसलेले भुलेश्वर देवस्थान श्रावणी यात्रेसाठी सज्ज झाले आहे. १३ ऑगस्ट ते ७ सप्टेंबरदरम्यान होणाऱ्या या यात्रेसाठी लाखो भाविक येण्याची शक्यता असल्याने प्रशासनाने सुरक्षितता व भाविकांच्या सुविधांना प्राधान्य दिले आहे.



निवासी नायब तहसीलदार संदीप पाटील यांच्या अध्यक्षतेखाली भुलेश्वर देवस्थान येथे अधिकारी व ग्रामस्थांची यात्रा नियोजन बैठक झाली. यात्रेदरम्यान मंदिर परिसरातील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी वाहने वन विभागाच्या कमानीबाहेर अडविण्याचा निर्णय घेण्यात आला. वन विभागाच्या कमानीपासून मंदिराकडे जाणारा रस्ता खराब झाल्याने त्याची तातडीने दुरुस्ती करण्याच्या सूचना संबंधित विभागाला देण्यात आल्या.

भुलेश्वर घाटातील झाडांच्या फांद्या रस्त्यावर आल्याने वाहतुकीला धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे पुरंदर व दौंड वन विभागाला रस्त्यावर आलेल्या फांद्या हटविण्याच्या सूचना करण्यात आल्या. माळशिरस ग्राम पंचायतीकडून पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात येणार असून, माळशिरस प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत महिनाभर आरोग्य सेवा उपलब्ध करून दिली जाणार आहे.

देवस्थान परिसरात स्वच्छतेची विशेष व्यवस्था करण्यात येणार आहे. अन्न व औषध प्रशासनाकडून खाद्यपदार्थांच्या दुकानांची तसेच प्रसाद विक्री केंद्रांची तपासणी केली जाणार आहे. जेजुरी पोलिसांकडून यात्रेसाठी वाढीव बंदोबस्त ठेवण्यात येणार असून, महिनाभर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

यावेळी गटविकास अधिकारी अविनाथ थोरात, जेजुरी पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक रवींद्र पाटील, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. विक्रम कामे, सासवड आगार व्यवस्थापक वृषाली तांबे, महावितरणचे जीवन ठोंबरे, विस्तार अधिकारी सागर कांबळे, पंचायत समिती सदस्य माऊली यादव, सरपंच आरती यादव, उपसरपंच छाया यादव, पोलिस पाटील पूजा यादव, वैद्यकीय अधिकारी प्रियांका साळुंखे, मंडल अधिकारी एस. एस. निबाळकर, तलाठी रमेश वाघमोडे, ग्रामपंचायत अधिकारी विलास बडधे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.



# पिसर्वे बालवाडी शाळेची सभापती झेंडे यांच्याकडून पाहणी

प्रतिनिधी : राष्ट्र सह्याद्री

माळशिरस : पुरंदर तालुक्याच्या पूर्व भागातील पिसर्वे येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बाळवाडी येथे पंचायत समिती सभापती अमित झेंडे यांनी भेट देऊन शाळेतील विविध उपक्रम व भौतिक सुविधांची पाहणी केली.

जिल्हा परिषद पुणे यांच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या 'वुई लर्न इंग्लिश' कार्यक्रमाची शाळेत प्रभावी अंमलबजावणी सुरू असल्याचे यावेळी दिसून आले. तसेच 'निपुण महाराष्ट्र' अंतर्गत निपुण पुणे परीक्षा आणि शिष्यवृत्ती परीक्षेच्या मार्गदर्शनाचे नियोजन याबाबतही माहिती घेण्यात आली.

शिष्यवृत्ती परीक्षा विद्यार्थ्यांच्या भविष्यातील वाटचालीला दिशा देणारी असल्याचे मत पंचायत समिती सभापती अमित झेंडे यांनी व्यक्त केले. यावेळी बाळवाडी व पिसर्वे ग्रामस्थांच्या वतीने झेंडे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी पिसर्वे सरपंच रवींद्र कोलते, उपसरपंच चंद्रकांत कोलते यांच्यासह संभाजी कोलते, प्रमोद कोलते, मारुती कोलते, विठ्ठल कोलते, संदीप कोलते, प्रशांत कोलते, किरण कोलते, नितीन कोलते व साहिल कोलते उपस्थित होते. प्रास्ताविक महेश कोलते यांनी केले. सूत्रसंचालन मुख्याध्यापक बाळासाहेब जगताप यांनी केले, तर उत्तम पवार यांनी आभार मानले.

## बापूराव शिंदे यांचे निधन

**सोमेश्वरनगर :** करंजे (ता. बारामती) येथील बापूराव साधू शिंदे यांचे अल्पशा आजाराने



निधन झाले. ते ८५ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात तीन विवाहित मुले, एक मुलगी व नातवंडे असा परिवार आहे. पुणे शहर पोलीस कर्मचारी गणेश शिंदे यांचे ते वडील होत.




# शिरदाळेत पशुधन आरोग्य शिबिर

**शिरदाळे :** आंबेगाव तालुक्यातील शिरदाळे येथे पशुवैद्यकीय आरोग्य विभाग व धामणी केंद्राच्या वतीने पशुधन आरोग्य शिबिर घेण्यात आले. शिबिरात परिसरातील पशुपालकांना जनावरांसाठी जंतनाशक औषधे व मिनरल मिक्सरचे मोफत वाटप करण्यात आले.

जंतनाशक औषधांमुळे जनावरांच्या पोटातील जंतांचे नियंत्रण होण्यास मदत होते, तर मिनरल मिक्सरमुळे जनावरांचे आरोग्य सुधारण्यास, गाई माजावर येण्यास आणि दूध उत्पादन वाढण्यास मदत होते. त्यामुळे या उपक्रमाचा पशुपालकांना मोठा फायदा होणार असल्याचे सांगण्यात आले.

यावेळी धामणी केंद्राचे पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. संजय पांडे यांनी जनावरांची नियमित आरोग्य तपासणी व लसीकरण, रोगप्रतिबंधक उपाययोजना, संतुलित आहार, गोठ्याची स्वच्छता तसेच दूध उत्पादन वाढीसाठी आवश्यक उपाययोजनांबाबत पशुपालकांना मार्गदर्शन केले.

शिबिरास शिरदाळे गावचे माजी उपसरपंच मयूर सरडे, सोसायटी संचालक सुहास रणपिसे, दुग्ध व्यावसायिक स्वप्नील तांबे, माऊली कृपा डेअरीचे चेअरमन भूपेंद्र तांबे, तसेच अनिकेत चौधरी, प्रगतशील शेतकरी संदीप मिंडे, राघू रणपिसे, कुणाल तांबे, ओम रणपिसे यांच्यासह शेतकरी व दुग्ध व्यावसायिक उपस्थित होते.

# कवठे येमाई शाळेला २५ हजारांची मदत

प्रतिनिधी : राष्ट्र सह्याद्री

**कवठे येमाई :** पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत कवठे येमाई जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी २५ हजार रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली. माजी आमदार अशोक पवार यांच्या हस्ते शाळेला धनादेश प्रदान करण्यात आला.



शाळा व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्षा डॉ. आरती उचाळे यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत धनादेश स्वीकारण्यात आला. विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविणे आणि विविध शैक्षणिक उपक्रमांना चालना देणे, हा मदतीमागील उद्देश आहे. यावेळी पंचायत समिती सदस्या कांचन सांडभोर, माजी पंचायत समिती सदस्य डॉ. सुभाष पोकळे, जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक शांताराम पोकळे, तंटामुक्त समिती अध्यक्ष बबुशा पाटील कांदळकर, पीडीसीसी बँक व्यवस्थापक राजेंद्र चाटे, मलठणचे माजी सरपंच नानासाहेब फुलसुंदर, कवठे विविध कार्यकारी सोसायटीचे अध्यक्ष रितेश शहा, सामाजिक कार्यकर्ते पांडुरंग भोर यांच्यासह ग्रामस्थ, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या मदतीबद्दल शाळा व्यवस्थापन समिती व ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.

# आंबळे शाळेत भूजल पुनर्भरण प्रकल्प

प्रतिनिधी : राष्ट्र सह्याद्री

**माळशिरस :** आंबळे येथील श्री शिवाजी विद्यामंदिर शाळेत पावसाचे पाणी जमिनीत मुरवून भूजलपातळी वाढविण्यासाठी रेन वॉटर हार्वेस्टिंग प्रकल्प उभारण्यात आला आहे. शाळेच्या छतावरून वाहणारे पाणी फिल्टरद्वारे बोअरवेलमध्ये सोडून भूजल पुनर्भरण केले जाणार आहे.

गावात दरवर्षी पाणीटंचाई निर्माण होत असल्याने हा उपक्रम जलसंवर्धनासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. प्रकल्पासाठी इनरव्हील क्लब ऑफ मुंबई नॉर्थच्या अध्यक्षा जयश्री लखोटीया, सेक्रेटरी डॉ. विद्या मुकुंद, जिओ रोटी क्लबच्या संस्थापक पी.पी. धनलक्ष्मी गांधी आणि लायन्स क्लब ऑफ सायनचे अध्यक्ष राजेश रसिकलाल शहा यांनी आर्थिक मदत केली.तांत्रिक काम पर्जन्य रेन वॉटर हार्वेस्टिंग कन्सल्टन्सीचे संचालक कर्नल शशिकांत दळवी, एमएपीएस इंडस्ट्रीजचे संचालक अनिरुद्ध तोडकर आणि राष्ट्रधर्म फाऊंडेशनचे अध्यक्ष विनेंदर सिंग यांच्या सहकार्याने झाले.ग्रामविकास फाऊंडेशनचे अध्यक्ष राजेंद्र दरेकर यांनी उपक्रमाचे कौतुक केले. पल्लवी दरेकर यांनी संपूर्ण गावातील घरांवर रेन वॉटर हार्वेस्टिंग प्रकल्प राबविण्यासाठी कंपन्यांनी पुढाकार घ्यावा, अशी मागणी केली. यावेळी शाळा परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. मिसशेफ इंडिया कंपनीने शाळांना २५ हजार रुपयांची सफाई यंत्रे भेट दिली.



# एमआयटी आर्ट, डिझाईन अँड टेक्नॉलॉजी विद्यापीठात ११वा विद्यारंभ समारंभ संपन्न

## नवोन्मेष, कौशल्ये आणि नैतिक मूल्ये आत्मसात करा– राज्यपाल जिष्णु देव वर्मा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** आजच्या गुंतागुंतीच्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी पारंपरिक शैक्षणिक शाखांच्या सीमा ओलांडणारे बहुविषयक शिक्षण आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी ज्ञान, कौशल्ये, नवोन्मेष, चिकित्सक विचार आणि नैतिक मूल्ये आत्मसात करून भविष्यातील आव्हानांसाठी स्वतःला सक्षम करावे, असे आवाहन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केले.

लोणी काळभोर येथील एमआयटी आर्ट, डिझाईन अँड टेक्नॉलॉजी विद्यापीठात आयोजित ११व्या विद्यारंभ समारंभात ते बोलत होते. यावेळी एमआयटी समूह संस्थांचे संस्थापक व कुलपती डॉ. विश्वनाथ डी. कराड, महाराष्ट्राचे माजी अतिरिक्त पोलीस महासंचालक जे. डी. लक्ष्मीनारायण, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, प्र-कुलपती प्रा. डॉ. मंगेश कराड, उषा कराड, कुलगुरू प्रा. राजेश एस., कार्यकारी संचालक डॉ. सुनीता कराड आदी उपस्थित होते.

विकसित भारत २०४७ चे स्वप्न साकारण्यात विद्यापीठे आणि युवा शक्तीची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे नमूद करीत राज्यपाल वर्मा म्हणाले, पूर्वीच्या तुलनेत विद्यार्थ्यांना विविध विषय एकत्रितपणे शिकण्याची संधी उपलब्ध झाली आहे. परस्परांशी जोडलेल्या आजच्या जगात बहुविषयक शिक्षणामुळे विद्यार्थ्यांना गुंतागुंतीच्या प्रश्नांकडे व्यापक दृष्टिकोनातून पाहता येते आणि त्यावर आत्मविश्वासाने उपाय




शोधता येतात.

कृत्रिम बुद्धिमत्ता, रोबोटिक्स, क्वांटम संगणन, जैवतंत्रज्ञान, प्रगत उत्पादन तंत्रज्ञान आणि डिजिटल तंत्रज्ञानामुळे प्रत्येक क्षेत्रात वेगाने बदल होत आहेत. मात्र तंत्रज्ञानासोबत नैतिकता, मूल्ये आणि करुणेचा अभाव असल्यास हीच तंत्रज्ञाने विनाशकारी ठरू शकतात. विज्ञानाचा वापर मानवजातीच्या कल्याणासाठी झाला पाहिजे, इतर मानवांच्या विनाशासाठी नव्हे. त्यामुळे तंत्रज्ञानाच्या वापरासोबत मानवता आणि करुणा जपणे अत्यावश्यक आहे, असे श्री.वर्मा म्हणाले.

एमआयटी समूह संस्थांचे संस्थापक व कुलपती डॉ. विश्वनाथ डी. कराड यांनी आपल्या मनोगतात एमआयटीच्या स्थापनेपासून आजवरच्या वाटचालीचा आढावा घेतला. शिक्षणाच्या माध्यमातून समाज आणि राष्ट्रनिर्मितीत योगदान देण्याच्या प्रेरणेतून एमआयटीची उभारणी झाल्याचे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षणासोबत भारतीय संस्कृती, मूल्ये, विज्ञान, तंत्रज्ञान आणि नवोन्मेषाची जोड देऊन सक्षम व जबाबदार नागरिक घडविणे हा संस्थेचा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी नमूद केले.

प्र-कुलपती प्रा. डॉ. मंगेश कराड यांनी प्रास्ताविकात एमआयटी आर्ट, डिझाईन अँड टेक्नॉलॉजी विद्यापीठाची शैक्षणिक वाटचाल, विविध उपक्रम आणि भविष्यातील उद्दिष्टांची माहिती दिली.

## जाहिर नोटीस

तमाम लोकांना कळविण्यात येते की श्रीमती.शहनाज मोहम्मद इक्बाल खान व मयत श्री. मोहम्मद इक्बाल खान हे क्लास मेमरी हौसिंग सोसायटी लि., सी.टी.एस. नं. 179, रविवार पेठ, पुणे येथील इमारतीतील फ्लॅट नं. 101, यांचे मालक/धारक आहेत. मयत श्री. मोहम्मद इक्बाल खान यांचे दिनांक 23/06/2022 रोजी निधन झाले असून, त्यांच्या पश्चात श्रीमती.शहनाज मोहम्मद इक्बाल खान, कु. मीझनाह इक्बाल खान व श्री. अझलान मोहम्मद इक्बाल खान हे कायदेशीर वारस असल्याचे नमूद आहे. श्री. अमीनुद्दीन इमामुद्दीन शेख यांना सदर फ्लॅट खरेदी करावयाचा असून, त्यासाठी Vastu Housing Finance Corp. Ltd. यांचेकडून गृहकर्ज घेण्यात येत आहे. सदर मालमत्तेबाबत किंवा मयत श्री. मोहम्मद इक्बाल खान यांच्या वारसाहक्काबाबत कोणासही हक्क, दावा किंवा हरकत असल्यास, आवश्यक कागदपत्रांसह ७ दिवसांच्या आत अधोहस्ताक्षरीस कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास, पुढील व्यवहार करण्यात येईल.

ॲड. वनश्री क्षीरसागर
वास्तु हाऊसिंग फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड,
३६३/३, एफ पी नं -७१५/३, अपार्टमेंट
नं ३,दुसरा मजला,ए विंग, ;प्रतिसाद जोग कॉंडोमिनियम,
शिवाजीनगर, पुणे -४११००४ -
मोब नं -९८२३५९८८०१,
ईमेल - vanashree.kshirsagar@vastuhfc.com

दिनांक:
13/08/2026

# अभुतपूर्व वाहतूक कोंडीने सर्वांनाच आठवले देव!

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**पाथर्डी : दीप अमावस्या महत्त्वाची पर्वणी असल्याने श्रीक्षेत्र मढी, मायंबा, वृद्धेश्वर व मोहटादेवी येथे राज्यातील लाखो भाविकांची गर्दी होऊन सुरक्षा व वाहतूक कोंडी सोडविण्याच्या सर्व यंत्रणा कोलमडून पडल्या. लाखो भाविकांना वाहतूक कोंडीचा व बेशिस्त वाहनचालकांचा प्रचंड मनस्ताप झाला. देवस्थान समिती, ग्रामपंचायत, पोलीस प्रशासन, यांच्यामधील विसंवादाने सर्व त्रास निमुटपणे सहन करत कानिफनाथांचे दर्शन घेण्याचा प्रयत्न भाविकांनी केला.**

प्रत्येक अमावस्येला राज्यातील सर्वच भाविकांकडून दर्शनासाठी एवढीच गर्दी होते. यापूर्वी सर्वाधिक चोरीच्या घटना मढी येथे झाल्या आहेत. आजही चोरीच्या घटना घडल्या. पाथर्डी शहरात आज आठवडे बाजारच्या दिवशी भाजपच्या वतीने तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले. आठवडे बाजार टाळून रॅली चा कार्यक्रम आयोजित करणे शक्य होते. सर्व शाळकरी मुलांना रॅलीमध्ये निमंत्रित करत तालुका प्रशासनही दिमतीला होते. हातावर पोट भरणाऱ्या माणसांचा हक्काचा वार बाजारचा दिवस असतो. त्यातच आज अमावस्या असल्याने राज्यातील नाथ भक्तांची गर्दी मोहटादेवी येथेही झाली. देवी कडे जाणारे रस्ते पाथर्डी शहरातूनच जातात. राष्ट्रीय महामार्गाच्या बाजूला असलेली अतिक्रमणे, बाजारमुळे रस्त्यावर पथारी मांडून बसलेले विक्रेते, रॅलीचे कौतुक, यामुळे नागरिकांना चालण्यासाठी रस्ता राहिला नाही. सकाळच्या वेळी सर्वांचीच गडबड असल्याने कुणी कुणाचे ऐकायला तयार नाही. वाहतूक कोंडी तर नगर रस्त्याला बाबूजी आव्हाड महाविद्यालयापर्यंत, कोरडगाव रस्त्याला अमरधाम पर्यंत, शेवगाव रस्त्याला वीज उपकेंद्र पर्यंत तर मोहटादेवी रस्ता व बाजारातून अजंठा चौकाकडे येणारा रस्ता इतका वाहतूक कोंडी मध्ये हरवून गेला की गावातल्या लोकांना सुद्धा लवकर मार्ग सापडेनासा झाला. भाजपवाल्यांनी सायंकाळी पाच नंतर रॅलीचे आयोजन केले असते तर नागरिकांनाही यामध्ये सहभागी होत आले असते. केवळ हुजूर आदेश म्हणून रॅली कशीबशी पार पडली. साधनसामुग्रीचा अभाव असल्याने मिरवणुकीच्या प्रारंभी असलेले वाहन रॅली बाबत वातावरण निर्मिती करणारे ठरत असले तरी शेवटपर्यंत



मात्र कसल्याही प्रकारची वाहन व स्पीकर व्यवस्था नव्हती. अजंठा चौक पासून पुढे रॅली निघाल्यानंतर वाहतूक कोंडीला सुरुवात झाली. अनेक नाथ भक्त जेवणापूर्वी मढी, मायंबा, वृद्धेश्वर, मोहटादेवीचे दर्शन घेतात. यापैकी कुठेतरी एका ठिकाणी महाप्रसाद घेतात. अशा पद्धतीने अमावस्या उत्सवाची सांगता होते.

वाहतूक कोंडीमुळे शहरातील व्यावसायिकांचे सुद्धा व्यवसाय समाधान कारक झाले नाहीत. दर महिन्याला अमावस्येच्या दिवशी शहरासह तालुक्यात अशाच पद्धतीने वाहतूक कोंडी होते. स्थानिक पोलिसांना शहर, तिसगाव येथे वाहतूक कोंडीचे नियोजनासाठी प्राधान्य द्यावे लागते. याचे कारण राष्ट्रीय महामार्ग सुरळीत राहिला पाहिजे यावर भर दिला जातो. मढी येथे चार-पाच बाजूने रस्ते येतात. रस्त्यावर पथारी मांडून बसणाऱ्या लोकांवर ग्रामपंचायत अथवा देवस्थान समितीचे नियंत्रण नाही.

# हातगावात संत सावता महाराज यांची पुण्यतिथी उत्साहात साजरी



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**हातगाव :** शेवगाव तालुक्यातील हातगाव येथे श्री संत सावता सत्संग मंडळाच्या वतीने सालाबादप्रमाणे या ही वर्षी श्री संत शिरोमणी सावता महाराज यांची पुण्यतिथी संत सावता मंदिरामध्ये तसेच पैठण - पंढरपूर राष्ट्रीय महामार्गावरील महात्मा फुले चौक या ठिकाणी उत्साहात साजरी करण्यात आली आहे. गावातील माळी गल्लीमध्ये असणाऱ्या संत सावता महाराज मंदिरामध्ये २९ जुलै पासून गुरुपौर्णिमेनिमित्त बापू भागूजी अभंग यांच्या वाणीतून सुरू केलेल्या पोथीचे दररोज सायंकाळी वाचन करण्यात आले असून मंगळवार रोजी संत सावता महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त सकाळी ११ ते १२ या वेळेत ह भ प कृष्णा महाराज पाटील लाडजळगावकर यांची अमृततुल्य कीर्तन सेवा पार पडली असून त्यानंतर महाप्रसादाचा कार्यक्रम झाला आहे. तर सायंकाळी ५ ते ७ या वेळात पोथीची मिरवणूक काढण्यात आली आहे. तर पैठण - पंढरपूर या राष्ट्रीय महामार्गावर असणाऱ्या महात्मा फुले चौकातही या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या ठिकाणी लक्ष्मण शिंदे (गुरव) यांनी ७ दिवस सावता महाराज यांच्या पोथीचे दररोज सायंकाळी वाचन केले असून मंगळवार रोजी दुपारी संत सावता महाराज यांच्या पवित्र प्रतिमेचे पूजन करून त्यानंतर महाप्रसादाचा कार्यक्रम पार पडला आहे.

## द•ख•ल

### मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज मूल्यमापन समितीवर पद्मश्री पोपटराव पवार

**नगर तालुका :** मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाच्या राज्यस्तरीय मूल्यमापन समितीवर पद्मश्री पोपटराव पवार यांची सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे. ग्रामविकास व पंचायतराज विभागाच्या अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव यांच्या अध्यक्षतेखाली गठित करण्यात आलेल्या या समितीवर निवडीचे अधिकृत पत्र नुकतेच



त्यांना प्राप्त झाले. राज्यस्तरीय मूल्यमापन समितीत संचालक, राज्य ग्रामीण विकास संस्था (यशदा), पुणे; मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद); संचालक, पंचायतराज; संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष ग्रामीण गृहनिर्माण; बेला ग्रामपंचायत, ता. व जि. भंडारा येथील सरपंच शारदा गायधने; मंत्रालय पत्रकार संघाच्या वतीने नामनिर्देशित एक पत्रकार तसेच ग्रामविकास विभागाचे उपसचिव यांचा समावेश आहे. ग्रामविकास, लोकसहभाग आणि आदर्श ग्रामनिर्मितीच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे पद्मश्री पोपटराव पवार यांची या समितीवर झालेली निवड ही हिवरे बाजारसह पंचक्रोशीसाठी अभिमानाची बाब मानली जात आहे. त्यांच्या निवडीचे हिवरे बाजार व पंचक्रोशीतील ग्रामस्थांच्या वतीने स्वागत करण्यात येत असून, या जबाबदारीतून राज्यातील ग्रामपंचायतींच्या उत्कृष्ट कार्याला अधिक प्रोत्साहन मिळेल, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे.

### आ. पवारांचा गुरुवारी कर्जतला सन्मान

**कर्जत :** शेतकरी आणि युवकांच्या प्रश्नांवर आक्रमक भूमिका घेत राज्य आणि केंद्र सरकार विरोधात आंदोलनाची धार तीव्र करीत त्याचे फलित देणारे आमदार रोहित पवार यांचा गुरुवारी कर्जतमध्ये सन्मान होणार असून सर्वसामान्य शेतकरी आणि नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन रघुआबा काळदाते यांनी केले. गुरुवारी कर्जतच्या शिवपार्वती मंगल कार्यालयात दुपारी एक वाजता कर्जमाफी आणि कांदा प्रश्नावरील आंदोलनाच्या यशाबद्दल शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस आय, शिवसेना (उबाठा) तसेच कर्जत तालुक्यातील विविध शेतकरी संघटनांच्या वतीने हा सत्कार आयोजित करण्यात आला आहे. आमदार रोहित पवार यांनी सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या कर्जमाफी प्रश्नांवर जाचक अटी रद्द करीत सरसकट २ लाखापर्यंतची कर्जमाफी मिळवून देण्यात राज्य सरकारला धारेवर धरीत आक्रमक भूमिका घेतली होती. यासह राज्यातील कांदा प्रश्नावर देखील ते आक्रमक झाले होते. ४०० ते ५०० दर त्यांच्या आंदोलनाने अडीच हजारापर्यंत गेला. याचा लाभ कांदा उत्पादक शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात झाला. याच अनुषंगाने आमदार रोहित पवार यांचा सन्मान सोहळा कर्जतमध्ये पार पडणार असल्याची माहिती बुधवारी आयोजकांनी पत्रकार परिषदेत दिली.

### दहेश्वर विद्यालयात नशामुक्तीची प्रतिज्ञा



**अमरापूर :** श्री मारुतरावजी घुले पा. शिक्षण संस्थेच्या दहेश्वर माध्यमिक विद्यालय, प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय, शेवगाव शाखेच्या वतीने 'नशामुक्ती प्रतिज्ञा महाअभियान २०२६' अंतर्गत विद्यार्थ्यांना नशामुक्तीची प्रतिज्ञा देण्यात आली. प्रीती म्हणाल्या, देशाला सामर्थ्य देण्याचे काम तरुण पिढीच करू शकते. मात्र, आजची तरुणाई विविध व्यसनांच्या विळख्यात अडकत असल्याने देशाच्या भविष्यापुढे मोठे आव्हान निर्माण झाले आहे. विद्यार्थ्यांनी मोबाईलचा वापर केवळ आवश्यक कामापुरता करावा. विद्यार्थ्यांमध्ये नशामुक्तीचे संस्कार रुजविणे ही काळाची गरज असून, शाळा-महाविद्यालयांच्या माध्यमातून योग्य संस्कार घडविण्याचे कार्य प्रभावीपणे होऊ शकते. यानंतर प्रीती दीदी यांनी उपस्थित विद्यार्थी व शिक्षकांना नशामुक्तीची प्रतिज्ञा दिली. यावेळी डॉ. सोनाजी लांडे, डॉ. रमेश गोरे, लोखंडे माता, राऊत विकास, बोडखे, बर्डे भाऊसाहेब, वाघमारे यशोदास, जाधव रणजित, व्यवहारे विकास, नन्नावरे अंबादास, लिंभोरे राजाराम, लिंभोरे गोरख यांच्यासह शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

### साईदास परिवारच्यावतीने आज नगर ते श्री क्षेत्र शिर्डी पायी पालखी सोहळा

**पारनेर :** दरवर्षी प्रमाणे याही वर्षी श्रावणमासा निमित्त साईदास परिवार ट्रस्टच्या वतीने नगर ते श्री क्षेत्र शिर्डी पायी पालखी दि.१३ ऑगस्ट रोजी सकाळी ७ वा.शमी गणपती मंदिर, दिल्लीगेट, नगर येथून निघणार आहे. पालखीत अंदाजे ५०० ते ७०० साईभक्त शिर्डीस पायी जाणार आहेत. ही पालखी दि.१६ ऑगस्ट रोजी शिर्डीस पोहचणार आहे. यावेळी खा.डॉ. सुजय विखे पाटील राहणार असून आ.संग्राम जगताप आहेत. रथाचे पुजन महापौर ज्योती गाडे, ाती उपमहापौर धनंजय जाधव तसेच यावेळी सुभाष लोंढे नगरसेवक संजय शेंडगे, गणेश कवडे, शितल ढोणे, मयुरीताई जाधव, सुनिल त्रिंबके, पुष्पाताई बोरुडे, संदिप दातरंगे, सागर मुर्तडकर, अप्पा नळकांडे, महेश लोंढे, अभिजीत बोरुडे, भैय्या जाधव, महेंद्र गंधे, सुरज अग्रवाल, बाळासाहेब सातपुते, सुधीर लांडगे, ॲड युवराज शिंदे, धनेश बोगावत, दत्ताशेठ जाधव, सचिन बोरा, विकीशेठ इंगळे, योगीराज गाडे, किरण धारक, निता लोखंडे, महेश गुगळे हे उपस्थित राहणार आहेत.

# पारनेर शहर विकास आराखड्याचे नोटिफिकेशन जारी



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**उपमुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे यांनी दिले निर्देश**

**टाकळी ढोकेश्वर :** दीर्घकाळापासून प्रलंबित असलेल्या पारनेर शहराच्या विकास आराखड्याचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. या विकास आराखड्याचे अंतिम नोटिफिकेशन प्रसिद्ध करण्याचे स्पष्ट निर्देश राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नगरविकास विभागाला दिले व विभागाने तात्काळ नोटीफिकेशन जारी केले आहे. काही दिवसापुर्वी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पारनेर शहराच्या विकास आराखड्याला मंजुरी दिली होती मात्र तांत्रिक कारणांमुळे अंतिम नोटिफिकेशन प्रसिद्ध होणे बाकी होते.या पार्श्वभूमीवर आज सुजित झावरे पाटील आणि अनिलराव शिंदे यांनी उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांची प्रत्यक्ष भेट घेऊन पारनेर नगरपंचायतीच्या प्रलंबित नोटिफिकेशन लवकरात लवकर प्रसिद्ध करण्याची आग्रही मागणी केली या मागणीची दखल घेत उपमुख्यमंत्री शिंदे यांनी तात्काळ नगरविकास विभागाचे प्रधान सचिव असीम गुप्ता यांच्यासोबत बैठक घेतली या बैठकीत त्यांनी पारनेर शहराच्या विकासाची गरज लक्षात घेता नगरविकास विभागाने तात्काळ हे नोटिफिकेशन प्रसिद्ध करावे असे स्पष्ट निर्देश दिले.उपमुख्यमंत्र्यांच्या या निर्णयामुळे पारनेर शहराच्या रस्ते, पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन आणि पायाभूत सुविधांच्या विकासाचा मार्ग सुकर झाला आहे. नोटिफिकेशन प्रसिद्ध झाल्यानंतर प्रत्यक्ष विकासकामांना गती मिळणार असल्याने पारनेरकरांमधून आनंद व्यक्त केला जात आहे.



# मोबाईलद्वारे घरबसल्या खत खरेदीची सुविधा

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**एरंडगाव :** शेतकरी बांधवांना मोबाईलद्वारे घरबसल्या खत खरेदी करता यावे, यासाठी 'फ्रेमवर्क फॉर फर्टिलायझर सेल' या प्लिकेशनच्या माध्यमातून खत खरेदी-विक्रीची प्रक्रिया कशी राबवायची, याबाबत कृषी सेवा केंद्र चालकांना प्रशिक्षण देण्यात आले. पंचायत समिती, शेवगाव येथे या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षणादरम्यान शेतकऱ्यांनी मोबाईलमध्ये खत विक्रीसाठीची डिजिटल प्रणाली हे प्लिकेशन डाउनलोड करून फार्मर आयडी अथवा आधार क्रमांकाच्या माध्यमातून लॉगिन करण्याची प्रक्रिया समजावून सांगण्यात आली. लॉगिन केल्यानंतर संबंधित शेतकऱ्याच्या जमिनीचे क्षेत्रफळ पमध्ये आपोआप उपलब्ध होणार आहे. त्यानंतर शेतकऱ्याने आपल्या पिकाची निवड केल्यानंतर त्या पिकासाठी आवश्यक असलेल्या खताची मात्रा पमध्ये दर्शविली जाणार आहे. तसेच तालुक्यातील कोणत्या कृषी सेवा केंद्रावर संबंधित खत उपलब्ध आहे, याची माहितीही पद्वारे पाहता येणार आहे. शेतकरी आपल्या सोयीच्या कृषी सेवा केंद्राची निवड करून घरबसल्या खत खरेदीची प्रक्रिया पूर्ण करू शकणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा वेळ वाचण्याबरोबरच खताची उपलब्धता, वितरण आणि खरेदी प्रक्रिया अधिक सुलभ व पारदर्शक होण्यास मदत होणार आहे. या प्रशिक्षणास ज्ञानेश्वर शिंदे, सुनील गोडसे, प्रीतम शिंदे, बंडू सागडे, सौरभ पवार, रामनारायण लाहोटी, पांडुरंग मोटकर, संजू लांडे, सारंग दुगम, सुनील होडशीळ यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. शेवगाव तालुक्यातील मोठ्या संख्येने कृषी सेवा केंद्र चालकांनी प्रशिक्षणास उपस्थित राहून नव्या प्रणालीची माहिती घेतली.

# आखेगाव तितर्फा ग्रामपंचायतीला 'सुकन्या ग्राम' मानाचा गौरव



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**कोरडगाव :** भारत सरकारच्या सुकन्या समृद्धी योजनेअंतर्गत गावातील पात्र मुलींची खाती उघडून 'सुकन्या ग्राम' हा बहुमान मिळविणाऱ्या आखेगाव तितर्फा ग्रामपंचायतीचा अहिल्यानगर डाक विभागाच्या वतीने ट्रॉफी व प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. दि. १७ जुलै रोजी अहिल्यानगर येथे झालेल्या बक्षीस वितरण समारंभात वरिष्ठ डाक अधीक्षक विकास पालवे यांच्या हस्ते ग्रामपंचायतीला ट्रॉफी व प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात आले. त्यानंतर शेवगाव उपविभागाचे डाक निरीक्षक विनायक शिंदे व अनिल माळशिकरे यांच्या हस्ते ग्रामपंचायतीचे सरपंच श्रीमती अयोध्या शंकरराव काटे, ग्रामपंचायत अधिकारी सुरेंद्र जरांगे यांच्यासह उपस्थितांचा सत्कार करण्यात आला.

या यशामागे आखेगाव तितर्फा शाखा पोस्ट कार्यालयाचे पोस्टमास्तर डोंगरे व पोस्टमन संदीप काटे यांचे विशेष मार्गदर्शन आणि सातत्यपूर्ण प्रयत्न महत्त्वाचे ठरले. तसेच ग्रामपंचायत, अंगणवाडी सेविका सुनंदा कोल्हे, सर्व मदतनीस, शाळा, पोस्ट विभाग आणि ग्रामस्थांनी दिलेल्या सहकार्यामुळे हा उपक्रम यशस्वी झाला. गावातील पात्र मुलींची सुकन्या समृद्धी योजनेअंतर्गत खाती उघडून त्यांच्या भविष्यासाठी आर्थिक सुरक्षिततेचा पाया मजबूत करण्याचे काम करण्यात आले. ग्रामपंचायत, अंगणवाडी, शाळा व डाक विभागाच्या समन्वयातून राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे मुलींच्या आर्थिक सक्षमीकरणाबाबत जनजागृती होण्यास मोठी मदत झाली. आखेगाव तितर्फा ग्रामपंचायतीच्या या उल्लेखनीय कामगिरीचे अहिल्यानगर डाक विभागाने कौतुक केले.

# बोधेगाव, हातगाव परिसर पावसाच्या प्रतीक्षेत

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**हातगाव :** चालू हंगामातील पावसाळ्याचा अर्धा काळ संपत आला असून शेवगाव तालुक्याच्या पूर्व भागात अजूनही मोठ्या प्रमाणात पावसाने हजेरी लावली नसल्याने अनेक गावातील अनेक विहिरीनी तळ गाठले असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. तालुक्याच्या पूर्व भागात खरीप पिकांच्या मोठ्या प्रमाणात पेरण्या झाल्या असून पेरणी वेळी जेमतेम झालेल्या पावसावर शेतकऱ्यांनी पेरण्या केल्या होत्या .त्यानंतर थोड्या - फार पडलेल्या पावसाने पिकेही उगऊन आली सध्या पिकातील कोळपणीचे कामही शेतकऱ्यांकडून युद्ध पातळीवर सुरू असून अनेक गावात मजुरांचा मोठ्या प्रमाणात अभाव जाणवत असल्याने मजुराअभावी शेतातील कामे विलंबाने होताना दिसून येत आहेत.मात्र बोधेगाव ,हातगाव कांबी, मुंगी,चापडगाव, लाडजळगाव, राणेगाव, बाळमटाकळी या मोठ - मोठी क्षेत्र असणाऱ्या गावाच्या परिसरात पावसाळ्याचा जून, जुलै हे दोन महिने ओलांडले असून ऑगस्ट महिनाही अर्धा झाला तरी अजून नदी - नाले वाहून न गेल्याने परिसरातील सर्वच विहिरींनी तळ गाठले असून थोड्याच दिवसात पावसाने मोठ्या प्रमाणात हजेरी लावली नाही तर अनेक गावातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याचेही चित्र दिसून येत आहे.

# 'ग्रंथालय' हे संस्कृती विचारांचे केंद्र : डॉ धनवटे

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री




**ढोरजळगांव :** जीवनात ज्यांनी स्व:ताची क्षमता ओळखली त्यांना जग ओळखते यतार्थ ज्ञान हे ग्रंथालयात मिळते.जो व्यक्ती स्व:ताची क्षमता ओळखतो तो भविष्यात यशस्वी होतो ग्रंथ हे निर्जीव असुन त्यांना सजीव हे ग्रंथपाल करतात.जो व्यक्ती सातत्यपूर्ण वाचन करतो तो वाचतोच तो कधीच वाईट विचार अंगीकार करत नाही.शिक्षण घेत असताना वैचारिक असणे गरजेचे असुन शिक्षकांनी शिकविताना विद्यार्थांच्या मनात प्रश्न निर्माण करणे गरजेचे आहे. जीवनाचा खरेपणा हा पुस्तकांत असुन पुस्तकातील विचार मस्तकात गेल्यानंतर आचरणात येतात या प्रक्रीयेला शिक्षण प्रक्रिया संबोधले जाते.वर्तनामध्ये बदल म्हणजे शिक्षण पुर्वीच्या काळी गुरूकुल शिक्षण प्रक्रिया होती. सध्याची शिक्षण व्यवस्था ही भावी पिढीतील विद्यार्थावर अवलंबून आहे.त्यासाठी जीवनात सातत्यपूर्ण वाचन महत्वाचे आहे.पुस्तक जीवनातमध्ये नवीन विचार निर्माण करतात.ज्ञानेश्वरी व गीता हे ग्रंथ वेळोवेळी वाचन करूनही त्या ग्रंथांचे महत्त्व आजही टिकुन आहे. ज्ञान मिळविण्यासाठी ग्रंथाचे वाचन महत्वाचे आहे भविष्यात फिरते ग्रंथालय तसेच वाढदिवसाच्या निमित्ताने पुस्तके उपक्रम भविष्यात राबविण्यावर भर द्यावा लागणार आहे पुस्तकांचे वाचन हे व्यक्तीमत्वात वृध्दी करून पुस्तकांतुन ज्ञान मिळवुन जीवन समृध्द करते ग्रंथालय हे ज्ञान संस्कृती विचारांचे केंद्र आहे आसे प्रतिपादन शब्दगंध साहित्यिक परीषदचे नेवासा तालुकाध्यक्ष प्रा.किशोर धनवटे यांनी बोलताना व्यक्त केले. त्रिमूर्ती महाविद्यालय ढोरजळगांव येथे राष्ट्रीय ग्रंथपाल दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला त्यावेळी धनवटे बोलत होते. यावेळी सुनिल चोळके, आशिष भारती, संजय बुधवंत, प्रदीप नवल, संगिता झिंर्जुडे, संदीप घोडेचोर, अशोक गाढे, नवनाथ रकटे, कृष्णा पाडळे, नरेंद्र घोडेचोर, हरी मोरे आदी उपस्थित होते.

# ढोरानदी पात्रात रात्रीस खेळ चाले!

## बेकायदा वाळु उपसा जोमात अन् महसूल विभाग कोमात

दिपक खोसे । राष्ट्र सह्याद्री

**ढोरजळगाव :** शेवगाव तालुक्याच्या पश्चिम भागातील गावांची प्रमुख नदी म्हणून ओळख असलेल्या ढोरा नदीपात्रात वाळू तस्करांनी हौदोस घातला असून दररोज शेकडो ब्रास वाळू उपसा होत आहे. महसूल व पोलीस प्रशासनाचे दुर्लक्ष दिसून येत आहे.

वृद्धेश्वराच्या डोंगर रांगेत उगम पावणाऱ्या ढोरा नदीच्या काठी वाघोली, वडूले, निंबे नांदूर, ढोरजळगाव, आपेगाव, आखतवाडे, मळेगाव, सामनगाव,ही गावे वसली असून ढोरा नदीवरील बंधाऱ्यांच्या मालिकांमुळे ही गावे जलसमृद्ध झाली आहेत. मात्र सर्व गावांमध्ये ढोरा नदी पात्रात ट्रॅक्टर, डंपर, जेसीबी च्या साह्याने तसेच इतर अवैध प्रकारे राजरोसपणे दैनंदिन मोठ्या प्रमाणावर वाळू उपसा सुरू असून. दररोज या साधनांच्या



साह्याने शेकडो ब्रास वाळू उपसा होत आहे. हा प्रकार गेल्या अनेक दिवसांपासून सुरू असून यांच्यावर प्रशासनाचा कुठलीही वचक राहीली नसुन संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांच्या चुप्पीच्या भुमिकेमुळे कारवाई होत नसल्याने यांचे धाडस वाढून रात्रभर वाळु तस्करी जोमात सुरू आहे. शेवगाव नगर मार्गावरील ढोरजळगाव येथे रस्त्याच्या पूला खाली मंगळवारी रात्री १० वा ऐन रोडवर डंपर व ट्रॅक्टरच्या साह्याने वाळू उपसा होत असल्याचे निदर्शनास आले असून कारवाई होत नसल्याने बाहेरगावाहून डंपर येथे वाळू भरण्यासाठी येत आहेत.संबंधित गावातील संबंधित अधिका-यांच्या डोळ्या देखत ही वाहतूक सुरू असते. मुरूम वाहतुकीचे दिवसा ढवळ्या डंपर सुरू असून. काहींकडून कमी रॉयल्टी भरून अनेक पटींनी मुरूम उपसा होत आहे.आखतवाडे, दिंडेवाडी,आव्हाने, येथे देखील शेकडो ब्रास मुरूम उपसा होत असून लाखो रुपयांचा शासनाचा महसूल यामुळे बुडत आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या व जिल्हा पोलीस प्रमुखांच्या आदेशाला देखील या कर्मचाऱ्यांकडून केराची टोपली दाखवली जात आहे.या वाळू व मुरूम उपशामुळे पुरेसा पाऊस न झाल्याने मोठे जलसंकट भविष्यात उभे राहणार असून सुजलाम् सुफलाम् असलेला हा परिसर पुन्हा एकदा भकास व्हायला वेळ लागणार नसल्याने या वाळू तस्करीस प्रशासनाने पायबंद घालावा अशी मागणी ग्रामस्थांमधून होत आहे.

# कोरडे-सावंत वादाचे पिंपळनेरमध्ये पडसाद



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**पारनेर :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अजित पवार गटाचे अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष अशोक सावंत यांच्या समर्थनार्थ श्रीक्षेत्र पिंपळनेर येथे ग्रामस्थ आणि ज्येष्ठ वारकऱ्यांच्या वतीने त्यांच्या प्रतिमेला दुग्धाभिषेक घालून समर्थन व्यक्त करण्यात आले. संत निळोबारायांच्या पावन भूमीमधे असलेल्या श्रीक्षेत्र पिंपळनेर येथे वारकरी संप्रदायाची परंपरा अधिक वृद्धिंगत व्हावी, धार्मिक व सांस्कृतिक उपक्रमांना चालना मिळावी तसेच गावातील विविध विकासकामांना गती मिळावी,यासाठी अशोक सावंत यांनी सातत्याने प्रयत्न केले असल्याचे यावेळी उपस्थित ग्रामस्थांनी सांगितले. दरम्यान, दोन दिवसांपूर्वी देवीभोयरे येथील कार्यक्रमांमध्येभाजपचे प्रदेश कार्यकारणी सदस्य विश्वनाथ कोरडे आणि राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष अशोक सावंत यांच्यात वाद झाले होते. या दुग्धाभिषेक कार्यक्रम भाऊसाहेब लटांबळे, गोरख गाजरे, आर. बी. रासकर, सुरेश होले, हनुमंत रासकर, बाळासाहेब गाडे, ह.भ.प. भारत हजारे, लक्ष्मण रासकर, संजय सालके, गोकूळ रासकर, ह.भ.प. गहिनाथ लोंढे, बाळासाहेब सावंत, उत्तम जेक्टे, पप्पू लटांबळे, सुनील कळसकर, अमोल जेक्टे, गोरख जेक्टे, विकी गाजरे, गोरक्ष सावंत, कुंदन रासकर, शशी पोटे, आकाश चव्हाण, संदीप गाजरे यांच्यासह ग्रामस्थ आणि वारकरी मंडळी उपस्थित होती.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

गुरुवार दि.१३ ऑगस्ट २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८

## श्रीरामपुरात रात्री १० नंतर हॉटेल्स आणि हातगाड्या बंदचा निर्णय

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : शहरात वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी पोलिसांनी कडक पावले उचलली असून, आता रात्री दहा वाजेनंतर शहरातील सर्वच प्रमुख हॉटेल्स आणि रस्त्यावरील 'खाऊच्या हातगाड्या' बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. विशेषतः चायनीज कॉर्नर, वडापाव आणि अंडापावच्या गाड्यांवर रात्रीच्या वेळी मद्यधुंद अवस्थेत होणारे वाद, हाणामारी व गंभीर गुन्ह्यांच्या घटना वाढल्या होत्या. या प्रकारांना पायबंद घालण्यासाठी शहर पोलीस निरीक्षक विशाल खैरे यांनी हा निर्णय घेतला आहेत. या निर्णयामुळे हॉटेल चालकांनी व्यवसायाचे नुकसान होत असल्याची नाराजी व्यक्त केली आहेत. मात्र, गेल्या १० ते १५ दिवसांत या निर्णयामुळे हाणामारीच्या घटनांमध्ये लक्षणीय घट झाली असून, कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी व्यावसायिकांनी पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस निरीक्षक खैरे यांनी केले आहे.

# धरण क्षेत्रात मत्स्य व्यवसाय विकासासाठी संयुक्त सर्वेक्षण करणार : ना. विखे पाटील

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहील्यानगर** : जलसंपदा विभागाच्या धरणांमध्ये मत्स्य व्यवसाय विकास विभागाशी सहकार्य आणि समन्वय वाढवण्यात येणार आहे. स्थानिक मच्छीमारांना प्राधान्य देता यावे यादृष्टीने दोन्ही विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश असलेली संयुक्त समिती सर्वेक्षण करण्यात येईल, अशी माहिती जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली. जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली यावेळी मत्स्य व्यवसाय विकास मंत्री नितेश राणे, आमदार प्रकाश सावंत, प्रधान सचिव रामास्वामी एन, सचिव लाभक्षेत्र विकास प्रकाश मिसाळ,



मत्स्य व्यवसाय विकास आयुक्त प्रेरणा देशभ्रतार , जलसंपदा आणि मत्स्य व्यवसाय विकास विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

मंत्री विखे पाटील पुढे म्हणाले या दृष्टीने विभागाने आधीच पावलं टाकले असून उजनी धरणातील मासेमारी विकास साठी प्रक्रिया राबविण्यासाठी सुरुवात केली गेली आहे. मराठवाडा पश्चिम महाराष्ट्र विभागातील अशा धरणांची माहिती देखील एकत्रित केली जाईल या दृष्टीने त्यांनी यावेळी निर्देश दिले. जलसंपदा मंत्री विखे पाटील म्हणाले जलसंपदा आणि मत्स्यव्यवसाय विकास विभागाच्या वतीने संयुक्तरित्या अशा धरणांच्या माहितीचा सर्वेक्षण आणि विश्लेषण करून कार्यवाही करण्यास गती देण्यात येईल.

यासाठी जलसंपदा विभागाच्या चारही मुख्य अभियंता यांना जबाबदारी देण्यात येत असून गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ आणि कृष्णा खोरे विकास महामंडळ यामधील धरणांमध्ये मासेमारीच्या दृष्टीने आवश्यक माहिती एकत्रित केली जाईल. मत्स्य व्यवसाय विकास मंत्री नितेश राणे म्हणाले, जलसंपदा विभागाशी समन्वय राखण्यासाठी मत्स्य व्यवसाय विकास आयुक्त यांना जबाबदारी देण्यात येत आहे. मत्स्य व्यवसाय विभागाच्या वतीने जवळपास २५०० धरण आणि तलाव यातील मासेमारीसाठी मच्छीमारांच्या सहकारी संस्थांना संधी दिली जाते. विभागाने याबाबत पारदर्शक व आधुनिकता आणण्यासाठी डिजिटायझेशन, मॅपिंग केले गेले आहे आणि रियल टाईम डाटा सर्विसलेन्स प्रणाली कार्यरत केली आहे. जलसंपदा विभागाच्या विविध धरणांमध्ये देखील स्थानिक मच्छीमारांना मासेमारीसाठी संधी मिळावी यादृष्टीने विभाग प्रयत्नशील आहे असे मंत्री श्री राणे म्हणाले. यासह जलसंपदा विभागाच्या अंतर्गत धरणांमधील गाळ काढण्यासाठी व जल साठवण क्षमता वाढविण्यासाठी कार्यवाही केली जाते त्या मध्ये मत्स्य व्यवसाय विभागाच्या अखत्यारीत असलेल्या धरणातील व तलावातील गाळ काढण्यासाठी देखील सहकार्य मिळावे असे राणे म्हणाले.

यावेळी गोड्या पाण्यातील मासेमारी, सहकारी मच्छीमार संस्था, तलावातील मासेमारीसाठी ठेका पद्धती, दोन्ही विभागांशी संबंधित विविध बाबी, मासेमारीसाठी राबविण्यात येणारी प्रक्रिया आदी विषयाबाबत चर्चा झाली.

## राहाता पोलिसांची मोठी कारवाई

### क्लब चालक चावरे च्या साम्राज्याला धक्का

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी** : राहाता जुगार अडड्यावर छापा टाकून बेकायदेशीर तीन पत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या आणि खेळवणाऱ्या १२ आरोपींना रंगेहात पकडले आहे. या कारवाईत पोलिसांनी हजारो रुपयांची रोख रक्कम आणि जुगाराचे साहित्य जप्त केले आहे. ११ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ४:३० वाजण्याच्या सुमारास टाक गल्ली गट नंबर ३४० भागात ही कारवाई करण्यात आली. आरोपी विनापरवाना बेकायदेशीररीत्या पैशांवर 'तिरट' नावाचा हार-जितीचा जुगार खेळत होते. पोलिसांनी घटनास्थळावरून एकूण ४,८३० रुपयांची रोख रक्कम आणि जुगाराचे पत्ते जप्त केले आहेत. सदर छापा वेळी क्लब चालक विकी विष्णू चावरे, विलास आनंदा वाघमारे, विशाल दयानंद क्षेत्रे, राजू चिमाजी गायकवाड, रुपयेउत्तम रामराव कोळगे, सिंकदर आदाम शेख, राकेश जगन्नाथ लोखडे, सुनिल अरुन लोखंडे ,नितीन बाळासाहेब सोनवणे, भरत सुभाष वराडे, लोखंडे आतिष बाबासाहेब, विकी विष्णू चावरे, रमजान सलीम शेख, यांचे विरुद्ध राहाता पोलीस ठाण्यात गुन्हा दाखलयाप्रकरणाची फिर्याद राहाता पोलीस स्टेशनचे पोलीस अंमलदार संदीप काशिनाथ गडाख यांनी दिली आहे. त्यानुसार आरोपींविरुद्ध राहाता पोलीस ठाण्यात गु.र.नं. ३१८/२०२६ नुसार मुंबई जुगार कायदा कलम १२ अ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सदर कारवाई राहाता पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दीपक सरोदे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबलशिरसाठ करत आहेत

## वळणमधे परिसरात १० दिवसांपासून बिबट्यांचा सुळसुळाट

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : राहुरी तालुक्यात पुन्हा एकदा बिबट्याचा वावर वाढल्यामुळे बिबट्यांचा सुळसुळाट झाला आहे. तालुक्यातील वळण परिसरात गेल्या दहा दिवसांपासून एकाच ठिकाणी बिबट्याचा वावर होत असल्याचे अनेक शेतकऱ्यांच्या निदर्शनास आले आहे. वळण परिसरातील राहुरी-मांजरी रस्त्यावर अनिल मुसमाडे-भाऊसाहेब आढाव यांच्या शेतात वआजूबाजूच्या परिसरात गेल्या १० दिवसांपासून हा बिबट्या याच परिसरात फिरत असल्याने अनेक शेतकऱ्यांनी आपल्या मोबाईल मध्ये व्हिडिओ व्हिडिओ चे चित्रीकरण करून सोशल मीडियावर प्रसारित केले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, शेतात जाणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. दरम्यान, वन विभागाने या घटनेची तातडीने दखल घेऊन वळण परिसरात पिंजरा लावून बिबट्याचा बंदोबस्त करावा, अशी मागणी शेतकरी व ग्रामस्थांकडून करण्यात आली आहे.

## टाकळीभान टेल टँक (गोविंद सागर)च्या आउटलेट रॅम्पचे पिलर ढासळले

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**टाकळीभान** : श्रीरामपूर तालुक्याच्या पूर्व भागाला वरदान ठरलेला टाकळीभान टेल टँक (गोविंद सागर) च्या आउटलेट रॅम्प खालील सिमेंट काँक्रीटचा पिलर ढासाळला असून यामुळे आउटलेट रॅम्पला धोका निर्माण झाला आहे. तरी याची जलसंपदा विभागाने लक्ष घालून तातडीने दुरुस्ती करावी अशी मागणी येथील शेतकरी ग्रामस्थांनी केली आहे. सविस्तर माहिती अशी की टाकळीभान व परिसरासाठी संजीवनी असलेला टाकळीभान टेल टँक (गोविंद सागर) याची निर्मिती १९७२ च्या दुष्काळ मध्ये तालुक्याचे माजी मंत्री स्व. गोविंदरावजी आदिक यांच्या दूरदृष्टीतून व प्रयत्नातून झाली असून यास ५० वर्षे पूर्ण झालेली आहे.

सध्या त्याच्या आउटलेट रॅम्प खालील सिमेंट काँक्रीट केलेला पिलर ढासाळला आहे. त्यामुळे या लोखंडी रॅम्पला धोका पोहोचून तो खाली पाण्यात पडण्याचा मार्गावर आहे. त्यामुळे आउटलेटचे पाणी सोडण्यासाठी मोठी अडचण उभी राहणार असून या आउटलेट मार्गेच शेतीसाठी पाणी सोडले जाते. टेल टँकचा मुख्य उपयोग या आउटलेट मार्फतच होत असून त्याची



दुरावस्था झाल्याने या अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नाकडे जलसंपदा विभागाने गांभीर्याने लक्ष घालून त्याची तातडीने दुरुस्ती करावी तसेच लोकप्रतिनिधी यांनीही या प्रश्नात लक्ष घालून हा प्रश्न मार्गी लावावा अशी मागणी येथील शेतकरी ग्रामस्थांनी केली आहे.

त्याचप्रमाणे अनेक वर्षांपासून टेल टँक(गोविंद सागर) पिचिंग जवळ अनेक झाडे झुडपे वाढली आहेत. त्याच्याकडेही जलसंपदा विभागाने दुर्लक्ष केलेले आहे. तरी श्रीरामपूरच्या पूर्व भागाला वरदान ठरलेला हा जलाशय सुस्थितीत राहावा यासाठी जलसंपदा विभागाने या टेल टँक (गोविंद सागर) याच्या देखभालीकडे लक्ष द्यावे.

## जेऊरमध्ये 'मावा' अड्ड्यावर पुन्हा 'धाड' १ लाख ४३ हजारांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**नगर** : तालुक्यातील जेऊर बायजाबाई परिसरातील ससेवाडी रोडवर सुगंधीत तंबाखू व सुपारीचे मिश्रण करून मावा तयार करणाऱ्या अड्ड्यावर स्थानिक गुन्हे शाखेने बुधवारी (दि. १२) धाड टाकून तब्बल १ लाख ४३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. विशेष म्हणजे, याच ठिकाणी सुमारे महिनाभरापूर्वी कारवाई करण्यात आली होती. त्यानंतर पुन्हा मावा तयार करण्याचे काम सुरू असल्याचे समोर आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. जिल्ह्यातील अवैध व्यवसायांविरोधात कारवाई करण्याचे आदेश पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी स्थानिक गुन्हे शाखेला दिले आहेत. त्यानुसार पो. नि. संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने नगर तालुक्यातील जेऊर बायजाबाई परिसरात अवैध व्यवसायांची माहिती घेत असताना ससेवाडी रोडवरील एका पत्र्याच्या शेडमध्ये मावा तयार केला जात असल्याची गुप्त माहिती मिळाली. त्या आधारे पोलिसांनी पंचांसमक्ष घटनास्थळी छापा टाकला. यावेळी सुगंधीत तंबाखू व सुपारी एकत्र करून मावा तयार करत असलेला बबल बापू ससे (वय २३, रा. आठरे वस्ती, ससेवाडी) याला पोलिसांनी ताब्यात घेतले. या कारवाईत ३० हजार रुपये किमतीचा १५ किलो तयार मावा, ६३ हजार रुपये किमतीचा ९० किलो सुपारीचा चुरा, १५ हजार रुपये किमतीची १५ किलो सुगंधीत तंबाखू आणि ३५ हजार रुपये किमतीची १७.५० किलो सुगंधीत तंबाखू, असा एकूण १ लाख ४३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पोलिसांनी ताब्यातील व्यक्तीकडे चौकशी केली असता, जप्त केलेला मुद्देमाल हा शशिकांत रामदास मगर (रा. मगर वस्ती, ससेवाडी रोड, जेऊर बायजाबाई) याच्या मालकीचा असून तो छत्रपती संभाजीनगर येथील जितु मालपाणी( पुर्ण नाव माहीत नाही) याने पुरविल्याचे सांगितले. दोघेही फरार असल्याची माहिती पोलिसांनी दिली. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एमआयडीसी पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## साईबाबांच्या बदनामीकारक व्हिडीओंवर ७ दिवसांत निर्णय घ्या

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी** : श्री साईबाबा संस्थानच्या विरोधात तसेच श्री साईबाबांबाबत यूट्यूबसह विविध समाजमाध्यमांवर प्रसारित होणाऱ्या कथित बदनामीकारक व धार्मिक भावना दुखावणाऱ्या व्हिडीओंच्या प्रकरणात दिल्ली उच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण निर्देश दिले आहेत. संस्थानने दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी करताना न्यायमूर्ती डॉ. स्वराणा कांता शर्मा यांच्या खंडपीठाने ग्रीव्हन्स अपिलेट कमिटीला (जीएसी) पुढील सात दिवसांत कारणासहित निर्णय घेऊन १९ ऑगस्ट २०२६ पर्यंत अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. यामुळे आक्षेपार्ह व्हिडीओ व मजकूर समाजमाध्यमांवरून हटविण्याच्या संस्थानच्या मागणीवर सक्षम प्राधिकरणाकडून तातडीने निर्णय होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. यूट्यूबकडे जुलै २०२६ मध्ये वारंवार तक्रारी करूनही अपेक्षित कार्यवाही न झाल्यानंतर संस्थानने हे प्रकरण इलेक्ट्रॉनिक्स व माहिती तंत्रज्ञान मंत्रालय तसेच जीएसीसमोर मांडले. त्यानंतर दिल्ली उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली. सुनावणीदरम्यान न्यायालयाने धार्मिक श्रद्धा व भावनांच्या संरक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच आक्षेपार्ह सामग्रीमुळे भारतीय राज्यघटनेच्या कलम २५ अंतर्गत संरक्षित धार्मिक स्वातंत्र्याशी संबंधित प्रश्न निर्माण होत असल्याचे निरीक्षण नोंदविले. संस्थानचे कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रकरणाचा कायदेशीर पाठपुरावा करण्यात आला. संस्थानच्या वतीने ज्येष्ठ वकील प्रमोद कुमार दुबे यांच्यासह अन्य वकिलांनी बाजू मांडली.

# जिल्हा बँकेसाठी राम शिंदे यांना मुख्यमंत्री फडवणीसांचा फ्री हँड

## थोरात, घुले, गडाख, मुरकुटे सरसावले

शफीक बागवान | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : बळीराजाची मातृसंस्था असलेल्या जिल्हा बँकेच्या निवडणुकीत मोठा रंग भरणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांना 'फ्री हँड' दिल्याने ही निवडणूक भाजपा अंतर्गत दोन प्रमुखांमध्ये लढविली जाणार असल्याचे निश्चित मानले जात आहे. जिल्हा बँकेवर वर्षानुवर्ष पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांचीच सत्ता राहिली आहे. सभापती प्राध्यापक राम शिंदे यांनी बँकेच्या प्रशासकापासून तर आत्तापर्यंत पूर्ण ताकदीनिशी निवडणुकीसाठी फील्डिंग लावली आहे. प्राध्यापक राम शिंदे यांनी नगर जिल्ह्यात विखे यांच्या विरोधातील दिग्गजांची खुलेआम भेट घेत बँकेच्या निवडणुकीत संदर्भात चर्चा केल्याचे काही वृत्तपत्रांमध्ये तसेच सोशल मीडिया मधून प्रसारित झाले आहे.

शिंदे यांनी पहिल्यांदाच बँकेच्या निवडणुकीबरोबरच सहकारात थेट लक्ष घातल्याने जिल्ह्यात अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत सभापती शिंदे हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या खास मर्जीतील समजले जातात. मात्र पालकमंत्री राधाकृष्ण विखे हेही मुख्यमंत्री फडवणीस यांच्या नजीकचे समजले जातात. ही निवडणूक दोन भाजपा अंतर्गत बलाढ्य नेत्यांमध्ये लढविली जाण्याचे संकेत मिळत आहेत. माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, आमदार विवेक कोल्हे, माजी मंत्री शंकरराव गडाख, अकोल्यात सिताराम गायकर, राहात्यामध्ये डॉ. नितीन पिपाडा, आमदार मोनिका राजळे, माजी आमदार भानुदास मुरकुटे अशा दिग्गजांची त्यांनी मोट बांधली आहे. सोशल मीडियामधून या भेटीचे छायाचित्रही झळकले आहे.



### श्रीरामपूर तालुक्यात आव्हान

श्रीरामपूर तालुक्यात विखे-मुरकुटे-ससाणे यांच्याकडे जवळपास समसमान ठराव झालेले आहेत. भानुदास मुरकुटे आणि करण ससाणे यांच्याकडे असलेल्या ठरावाची गोळा बेरीज केल्यास निकालासाठी कोणत्या ज्योतिषाची गरज नाही. आदिक गटाकडे काही ठराव आहेत. दरम्यान, भाजपाचे माजी तालुकाध्यक्ष बबन मुठे हे श्रीरामपूर तालुक्याच्या पूर्व भागात प्रा. राम शिंदे यांच्यासाठी मॉनिटरिंग करीत आहेत.

### ना. राम शिंदे यांचा आज जिल्हा दौरा

राम शिंदे हे १३ ऑगस्ट रोजी नगर जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. या दरम्यान बँकेसाठीच ते काही नेत्यांशी चर्चा करणार असल्याचे समजते. सध्या गावोगावी तालुकास्तरावर आणि जिल्ह्यात या जिल्हा बँकेच्या निवडणुकीबरोबरच प्राध्यापक राम शिंदे आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्यातील सलोख्याच्या मैत्रीची खमंग चर्चा रंगली आहे.

## श्रीरामपुरात तीन कॅफेंवर धडक कारवाई

### नियमांचे उल्लंघन करणाऱ्या कॅफेचालकांवर महाराष्ट्र पोलीस कायद्यानुसार कारवाई

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री




**श्रीरामपूर** : श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत विशेष मोहिमेंतर्गत नेवासा रोड परिसरातील तीन कॅफेंवर पोलिसांनी धडक कारवाई केली. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशानुसार तसेच अपर पोलीस अधीक्षक श्रीरामपूर आणि उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.नेवासा रोड परिसरातील कॅफे चालकांकडून नियमांचे उल्लंघन होत आहे का, तसेच कॅफेच्या आडून कोणतेही गैरप्रकार सुरू आहेत का, याबाबत पोलिसांनी तपासणी व पाहणी केली. या मोहिमेत क्रिस्टल कॅफे, एम.एच. १७ कॅफे आणि स्पायकर कॅफे या तीन कॅफेंवर कारवाई करण्यात आली.

ही तिन्ही कॅफे नेवासा रोड, वॉर्ड क्रमांक ६ परिसरात असून हा भाग शाळा व महाविद्यालयीन परिसरात येतो. त्यामुळे पोलिसांनी संबंधित कॅफे चालकांविरुद्ध महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ११० व ११७ अन्वये कारवाई केली असून, कॅफे चालकांना नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध प्रकार, गैरकृत्य तसेच कायदा व सुव्यवस्थेला बाधा निर्माण करणाऱ्या बाबींविरोधात यापुढेही विशेष मोहिमेद्वारे कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक श्रीरामपूर सोमनाथ वाघचौरे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विशाल खैरे यांच्यासह पोलिसांच्या पथकाने ही कारवाई केली. पुढील तपास श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्याकडून सुरू आहे.

|| भावपूर्ण श्रध्दांजली ||

असा जन्म लाभावा |
देहाचा चंदन व्हावा ||
आयुष्य संपले तरी |
सुगंध सतत दरवळत रहावा ||



कै. माणिकराव भाऊसाहेब पिसाळ

यांचे || प्रथम वर्षश्राध्द ||

गुरुवार दि. १३/०८/२०२६ रोजी सकाळी १०.०० वा.
संपन्न होत आहे तरी या प्रसंगी आपली उपस्थिती प्रार्थनिय आहे.

* आपले नम्र *

गं. भा. लताबाई माणिकराव पिसाळ (पत्नी)
श्री. दत्तात्रय भाऊसाहेब पिसाळ (भाऊ)
चि. अजित माणिकराव पिसाळ (मुलगा)
चि. केतन दत्तात्रय पिसाळ (पुतणे)
सौ. अश्विनी अतुल डौले (मुलगी)
सौ. कोमल भालचंद्र पाटेकर (मुलगी)

समस्त पिसाळ पाटील परिवार

त्यानिमित्त सकाळी १० ते १२

ह.भ.प. उध्दवजी महाराज मंडलिक (नेवासेकर)



(सद्गुरु नारायणगिरीजी महाराज आश्रम सुरेगांव-गंगा)
यांचे जाहिर हरीकिर्तन होईल

ठिकाण - श्री स्वयंभु त्रिवेणीश्वर महादेव देवस्थान हंडीनिमगांव ता. नेवासा, जि.अ.नगर